# येशूचे पराक्रमी नाव



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2025

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi— The Mighty Name of Jesus)

# येशूचे पराक्रमी नाव

*आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल,*
*ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा;*
*आणि त्याच्या द्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा.*

*कलस्सै 3:17*

# अनुक्रमणिका

परिचय

1. सर्व नामांपेक्षा श्रेष्ठ नाव 1
2. त्या नावामागील व्यक्ती 8
3. परमेश्वराच्या नावाची जुन्या कराराची प्रकटीकरणे 18
4. माझ्या पित्याच्या नावात 34
5. येशूच्या नावाचा योग्य उपयोग 44
6. परमेश्वर पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात उपस्थित आहे 51
7. जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो तेव्हा काय होते 55
8. येशूच्या नावावर विश्वास ठेवा 62
9. येशूच्या नावाने 67
10. येशूच्या नावात क्षमा 72
11. येशूच्या नावात तारण 74
12. येशूच्या नावात सार्वकालिक जीवन 76
13. येशूच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले, आणि नीतिमान ठरलेले 78
14. येशूच्या नावात बापतिस्मा 80
15. येशूच्या नावाने प्रार्थना करा 84
16. येशूच्या नावात धन्यवाद द्या आणि उपासना करा 86
17. सर्वकाही येशूच्या नावात करा 89
18. आपण येशूच्या नावाने एकत्र जमतो 92

19. येशूच्या नावात एकमेकाचा स्वीकार करा,
मान राखा आणि आशीर्वाद द्या 94

20. येशूच्या नावात सुवार्ता गाजवा, शिकवा आणि सेवा करा 98

21. येशूच्या नावात रोग बरे करा 101

22. येशूच्या नावात अद्‌भुत कार्ये करा 103

23. येशूच्या नावात भुते काढणे 105

24. येशूच्या नावात महत्कृत्ये करा 108

25. येशूच्या नावाचा अनधिकृत वापर 111

26. येशूच्या नावासाठी छळ 114

27. येशूच्या नावासाठी त्याग 116

28. आपण येशूचे नाव धारण करतो 118

29. येशूच्या नावात समजवा 120

30. येशूचे नाव युगानुयुग आहे 123

# परिचय

प्रत्येक विश्वासणाऱ्याला येशूच्या पराक्रमी नावाचा धावा करण्याचा, त्या नावाने बोलण्याचा आणि त्याचा उपयोग करण्याचा अद्‌भुत विशेषाधिकार मिळाला आहे. येशूचे शिष्य आणि सुरुवातीच्या मंडळीतील विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाच्या उपयोगाद्वारे त्यांच्याजवळ असलेला अधिकार समजला आणि ते त्यात चालले.

हे पुस्तक विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाचे सामर्थ्य पुन्हा शोधण्यात मदत करण्याचा प्रयत्न करते आणि दैनंदिन जीवनात त्या नावाच्या सामर्थ्यात कसे चालायचे ते शिकवते. जेव्हा आपण येशूच्या नावाच्या सामर्थ्याने चालावयास शिकतो तेव्हा आपण अधिकार आणि वर्चस्वात, परिपूर्ण शांततेत आणि देवाच्या सर्व तरतूदींमध्ये चालू शकतो.

*येशू! आपले भय दूर करणारे नाव,*

*ते आमची दुःखे थांबवते;*

*पाप्यांच्या कानात हे संगीत आहे,*

*हे जीवन, आणि आरोग्य आणि शांती आहे.*

(चार्ल्स वेस्लीच्या 1739 मध्ये लिखित *"हजार जिव्हांनी गायलेले"* या गीतातून घेतलेले कडवे)

विश्वासणारे म्हणून आम्हास जीवनात वैयक्तिक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्याचा संबंध जीवनातील परिस्थितीशी असो, उद्भवणाऱ्या गरजा, उठणारी वादळे, आपल्या मार्गात येणारे पर्वत, आपल्यावर येणारे आजार आणि रोग, शत्रू आमच्याविरुद्ध ज्या गोष्टी आणण्याचा प्रयत्न करतो, काहीही का असेना आपण हे जाणून घेतले पाहिजे की आमच्यात निहित अधिकाराद्वारे आपण उठून त्यावर प्रभुत्व

मिळवू शकतो. येशूच्या नावाच्या उपयोगाद्वारे हा अधिकार आपला आहे हे आपण जाणून घेतले पाहिजे.

आपल्या सभोवतालच्या लोकांची सेवा करत असताना, आपण ते येशूच्या नावात धैर्याने केले पाहिजे. प्रभु येशूने आपल्याला त्याच्या नावाचा उपयोग करून त्याची कामे करण्याचा आणि त्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिला आहे.

एकूण चर्च किंवा मंडळी या महत्त्वाच्या सत्यावर फक्त “वरकरणी जाणत असल्याचे” दिसते. येशूच्या नावाने आपले विशेषाधिकार आणि अधिकार शोधणाऱ्या आणि दैनंदिन जीवनात त्यांचा प्रत्यक्षात उपयोग करणाऱ्या विश्वासणाऱ्यांची आपण एक पिढी होऊ या, जसे पूर्वी कधीच नव्हते. आपल्या आधीच्या पिढ्यांपेक्षा आपण येशूच्या पराक्रमी नावाने आपल्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष रूपात उपयोग करून पुढे जाऊ या.

**येशूच्या पराक्रमी नावावरील हा अभ्यास आपले जीवन समृद्ध करू शकेल जेणेकरून आपण आपल्या वैयक्तिक जीवनात त्या नावाच्या सामर्थ्यात चालू लागाल! यामुळे आपण इतर असंख्य लोकांची येशू ख्रिस्तासोबत भेट घडवून त्यांस आशीर्वादित कराल!**

परमेश्वर आपणास आशीर्वादित करो!

आशीष रायचूर

# 1
# सर्व नामांपेक्षा श्रेष्ठ नाव

राजघराण्यात जन्मलेल्या बाळाची कल्पना करा. बाळाला एक नाव दिले जाते. सारखे नाव असलेले इतर अनेक लोक असू शकतात, परंतु हे विशिष्ट बाळ त्या नावाने ओळखले जाते. आणि त्याहीपेक्षा अधिक. राजघराण्यात जन्मलेल्या या मुलाला राजेशाही आणि शाही सिंहासन आणि राजघराण्यातील सर्व गोष्टींचा वारसा मिळतो. मुलाच्या नावासोबत राजेशाही पदवी जोडलेली असते जी वारशाने मिळालेल्या राजपदाची ओळख पटवून देते. राज्याची सर्व संसाधने, प्रभाव आणि सामर्थ्य आता त्या नावामागे आहे. कालांतराने मूल प्रौढ बनते. समजू या की ही प्रौढ व्यक्ती आता एक उल्लेखनीय जीवन जगू लागते, महान गोष्टी साध्य करते आणि त्यासाठी मोठा सन्मान, नावलौकिक आणि कीर्ती मिळवते. आता या नावाच्या महानतेचे आणखी एक परिमाण आहे. लोक आता हे नाव ओळखतात आणि त्याचा आदर करतात. ते केवळ त्याच्यामुळे किंवा त्या नावाशी संलग्न राज्य आणि राजेशाहीमुळेच नव्हे तर त्या नावामागील व्यक्तीच्या महानतेमुळे, कामगिरी आणि कर्तृत्वामुळे आहे.

पवित्र शास्त्रात हे तिन्ही पैलू येशूच्या नावासंबंधाने दिसून येतात.

## जन्माच्या वेळी हे नाव त्याच्या पित्याद्वारे देण्यात आले

**मत्तय 1:21**

**तिला पुत्र होईल, आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील.”**

“येशू” हे नाव परमेश्वराने निवडले आणि अद्वितीय देहधारी

परमेश्वराच्या पुत्राची ओळख व्हावी म्हणून दिले. देवाच्या किंवा परमेश्वराच्या रूपात, सनातन शब्दाने मानव रूप धारण केले आणि तो शब्द देही झाला, पित्याने त्याला एक नाव दिले – नाव "येशू". त्याने योसेफाला हे सांगण्यासाठी एका देवदूताला पाठवले. हे नाव त्याच्या जन्माच्या वेळी पित्याने त्याला दिलेले होते.

येशू हे इब्री नावाचे ग्रीक रूप आहे: *'यहोशुवा,'* ज्याचा अर्थ आहे "तारणकर्ता" किंवा "परमेश्वर जो तारण आहे." म्हणून जेव्हा आपण "येशू" नावाचा उल्लेख करतो तेव्हा आपण अशा नावाची घोषणा करतो जे तारण घेऊन येते.

मत्तय 1:21 मध्ये 'तारील' हा शब्द ग्रीक भाषेत *'सोज़ो'* आहे जो (*'सोटेरिया'*, या नावाप्रमाणे "तारण") सर्वव्यापक शब्द आहे ज्यात सार्वकालिक तारणाचा, पापांच्या क्षमेचा, पापावरील विजयाचा, रोगापासून आरोग्याचा, संघर्षात विजयाचा, शत्रूच्या सर्व कार्यापासून सुटकेचा, हानिपासून बचावाचा, धोक्यापासून संरक्षणाचा, आणि पूर्ण आरोग्याचा समावेश आहे. त्याचा अर्थ "आहे तारण पावणे, रोग बरे होणे, सुटका प्राप्त होणे, विजयी होणे, बचाव होणे, सुरक्षित होणे, आणि आरोग्यवान केले जाणे."

नव्या करारात *'सोज़ो'* हा शब्द अनेक वेगवेगळ्याप्रकारे उपयोग करण्यात आला आहे.

येथे काही उल्लेख आहेत.

- सोजिश उपयोग **तारण** (मत्तय 1:21; इब्री 7:25),
- **सनातन तारण** (योहान 3:16-18; मार्क 16:16; प्रेषितांची कृत्ये 4:12; रोमकरांस पत्र 10:9,10; इफिसकरांस पत्र 2:8);
- **आरोग्य प्राप्ती** (मत्तय 9:22; मार्क 6:56; मार्क 10:52; याकोब 5:15);

- दुरात्म्यांपासून **सुटका** (लूक 8:36; यहूदा 1:5, "निभावून नेले" हा शब्द आहेत *'सोज़ो'*);
- संकटापासून **सुटका / संरक्षण** (मत्तय 8:25; मत्तय 14:30; मत्तय 27:42; 2 तीमथ्य 4:18 "मुक्त करील" हा शब्द आहे *'सोज़ो'*);
- आध्यात्मिक संघर्षापासून / संकटापासून **संरक्षण** (योहान 12:27; 1 तीमथ्य 4:16)
- आणि गुलामीपासून **स्वातंत्र्य** (यहूदा 1:5).

जेव्हा आपण "येशू" या नावाचा उल्लेख करतो आणि त्याला तारणहार म्हणून घोषित करतो, तेव्हा आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की तो केवळ पापापासून वाचवतो असे नाही तर त्या नावात तारण, संरक्षण, सुरक्षा, आरोग्य, मुक्ती, विजय, स्वातंत्र्य आणि संपूर्णता आहे. त्या नामात संपूर्ण तारण आहे. येशूचे नाव तारिते, जतन करते, संरक्षण करते, बरे करते, मुक्त करते, विजय देते, स्वातंत्र्य देते आणि पूर्ण अथवा आरोग्यवान करते!

## त्याला हे नाव वारश्याने मिळाले

**इब्री 1:1-4**

**1 देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला.**

**2 तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले.**

**3 हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि स्वतः आमच्या, पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.**

**4 ज्या मानाने त्याला वारशाने देवदूतांपेक्षा श्रेष्ठ नाव मिळाले आहे त्या मानाने तो त्यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.**

सनातन शब्द परमेश्वर, ज्याद्वारे जग निर्माण केले गेले आणि जो त्याच्या सामर्थ्यशाली शब्दाने सर्व गोष्टींचा सांभाळ करतो, त्याने देहधारी शब्द बनण्याची निवड केली आणि परमेश्वराचा / देवाचा

पुत्र म्हणून वावरला. परमेश्वराचा पुत्र म्हणून तो आपल्याशी बोलत असलेला परमेश्वर होता. तो पित्याच्या गौरवाचे प्रकटीकरण आणि पित्याचे अचूक प्रतिनिधित्व होता. परमेश्वराचा पुत्र या नात्याने, त्याने आपल्या सर्व पापांच्या शुद्धीकरणाची तरतूद केली, तो मरणातून उठविला गेला आणि आता पित्याच्या उजवीकडे बसला आहे, तो सर्व देवदूतांपेक्षा श्रेष्ठ आहे. हा परमेश्वराचा पुत्र आहे ज्याला सर्व गोष्टींचा वारस म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि त्याला वारशाने असे नाव मिळाले आहे जे अतिशय श्रेष्ठ, अत्यंत अद्‌भुत, अतिशयित श्रेष्ठ आणि इतरांपेक्षा सर्वोच्च असे आहे. देवदूतांना अद्‌भुत नावे आहेत (शास्ते 13:18). पण हे नाव, येशूचे नाव त्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे.

आम्ही आधी सांगितल्याप्रमाणे, राज्यामध्ये वारसाला राजेशाही वारसा मिळतो. परमेश्वराचे सर्व राज्य येशूच्या नावाच्या मागे उभे आहे. जे काही परमेश्वर आहे, त्याचे सर्व वैभव, गौरव, प्रभुत्व आणि सामर्थ्य येशूच्या नावामागे आहे. हे नाव स्वर्गीय राजघराण्याचे नाव आहे. हे नाव सर्वोच्च राजघराण्याचे प्रतिनिधित्व करते. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ अधिपति, राजा किंवा राजाधिराज नाही. हे त्या एकाचे नाव आहे जो सर्व वस्तूंचा वारस आहे, त्याचे नाव जो *“धन्य व एकच अधिपति, राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू”* (1 तीमथ्य 6:15) आहे. हे त्या परमेश्वराचे नाव आहे जो *“गौरव आणि थोरवी यांनी मुकुटमंडित केलेला”* (इब्री 2:9) आहे. सर्वोच्च सिंहासन आणि इतरांवर राज्य करणारे शासन या नावामागे आहे. *“परमेश्वराने आपले राजासन स्वर्गात स्थापिले आहे; त्याचे राज्य सर्वांवर आहे”* (स्तोत्रसंहिता 103:19).

## त्याने जे काही साध्य केले त्यामुळे त्याला बहाल करण्यात आलेले नाव

**फिलिप्पैकरांस पत्र 2:5-11**

**5 अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो;**
**6 तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही,**
**7 तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले.**
**8 आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले.**
**9 ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले;**
**10 ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा,**
**11 आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे.**

*"ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले"* (व.9). येशूने त्याच्या देहधारणाद्वारे, पृथ्वीवरील त्याच्या जीवनाद्वारे, मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे जे काही साध्य केले त्यामुळे त्याला *"अत्युच्च"* करण्यात आले. त्याने संपूर्ण जगाच्या पापांसाठी दंडाज्ञा सहन केली. त्याने पतनाच्या परिणामांस उलट केले, सैतानास आणि त्याच्या सर्व दुष्ट सैन्यास निःशस्त्र केले, चिरगळले आणि नष्ट केले आणि तो विजयी होऊन कबरेतून बाहेर पडला. त्याच्याजवळ अधोलोकाच्या आणि कबरेच्या किल्या (अधिकार, प्रभूत्व) आहेत (प्रकटीकरण 1:18).

*"अत्युच्च केले"* (ग्रीक '*हुपेरूपसुओ*') या शब्दांचा अर्थ आहे "इतरांपेक्षा उंच्च करणे, अत्युच्च पदावर उन्नती देणे, सर्वात मोठ्या पदवीस आणि अधिकारास पोहोचविणे, श्रेष्ठ वैभवाच्या ठिकाणी

उंचविणे." पित्याने *"त्याने तीच कृती ख्रिस्ताच्या ठायी दाखवून त्याला मेलेल्यांतून उठवले; आणि सर्व सत्ता, अधिकार, सामर्थ्य, धनीपणा, सांप्रत आणि भावी युगातील कोणतेही नाव घ्या, त्या सर्वांहून त्याला उंच करून स्वर्गात आपल्या उजवीकडे बसवले. त्याने सर्वकाही त्याच्या पायांखाली ठेवले, आणि त्याने सर्वांवर मस्तक असे व्हावे म्हणून त्यास मंडळीला दिले"* (इफिसकरांस पत्र 1:20-22). स्वर्ग आणि पृथ्वीचा सर्व अधिकार येशूच्या हाती आहे (मत्तय 28:18). येशूचे नाव अशा प्रभूस लाभले आहे. हे नाव इतर प्रत्येक नावापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण तो इतर प्रत्येकापेक्षा श्रेष्ठ आहे.

## सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ नाव

**फिलिप्पैकरांस पत्र 2:9-11**

**9 ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले;**

**10 ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा,**

**11 आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे.**

परमेश्वर पित्याने हे ठरविले आहे, जाहीर केले आहे आणि घोषित केले आहे की येशूच्या नावाच्या उल्लेखाने, तिन्ही लोकांत प्रत्येक गुडघा टेकला जावा. स्वर्ग, पृथ्वी आणि अधोलोकातील प्रत्येक सृष्ट प्राणी त्याच्या अधीन होईल, त्याचा मान राखेल आणि प्रत्येक जीभ त्याचे प्रभूत्व कबूल करेल, आणि त्याला राजा म्हणून मान्य करेल.

येशूचे नाव सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ आहे. त्याचे नाव *"सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ आहे"* (वचन 9).

# चिंतन

1) देहधारी शब्द, परमेश्वराचा पुत्र याला "येशू" हे नाव

(अ) त्याच्या जन्माच्या वेळी देण्यात आले,

(ब) त्याला हे नाव वारश्याने मिळाले आणि

(क) त्याने केलेल्या कामगिरींमुळे हे नाव त्याच्यावर बहाल करण्यात आले.

या तीन पैलूंपैकी प्रत्येकाच्या महत्वावर चर्चा करा आणि ते या नावास सर्व नावांपेक्षा सर्वश्रेष्ठ कसे ठरविते या विषयी चर्चा करा.

# 2
# त्या नावामागील व्यक्ती

आपण ओळखतो की एखाद्या नावाची महानता त्या नावामागील व्यक्तीच्या महानतेतून प्राप्त होते. नाव जितके महान असते तितकेच नावामागील व्यक्ती महान असते. जेव्हा आपण नावामागील व्यक्तीचे मोठेपण ओळखतो तेव्हा आपण त्यांच्या नावाचे मोठेपण ओळखू शकतो. जेव्हा आपण येशू ख्रिस्त या व्यक्तीला ओळखता तेव्हा आपणास त्याच्या नावावर खूप विश्वास वाटेल.

या अध्यायात आपण येशू ख्रिस्ताच्या महानतेवर विचार करतो, जो त्या नावामागील व्यक्ती आहे. हा निश्चितपणे येशू कोण आहे यावर एक संपूर्ण निबंध नाही, परंतु एक संक्षिप्त सारांश आहे, ज्यामुळे आपण ज्याच्या नावाचा अभ्यास करीत आहोत त्या व्यक्तीची आपल्याला आठवण होते. "येशू" नावाच्या मागे उभे असलेल्याच्या महानतेवर विचार करण्यासाठी यात आपण आणखी भर घालू शकता.

येशूचे नाव ज्याचे प्रतिनिधित्व करते त्यामुळे थोर आहे – व्यक्ती येशू, तो कोण आहे, त्याने काय साध्य केले आहे आणि तो येणाऱ्या काळात काय साध्य करणार आहे.

**यहोवा**–"येशूचे" नाव त्याचे नाव आहे जो त्रिएक परमेश्वरातील एक आहे. त्याला समर्थ देव *('अल गिब्बोर')*, "सनातन पिता" म्हटलेले आहे (यशया 9:6). तो पित्याच्या बरोबरीचा, पिता आणि आत्म्यासोबत एक आहे (1 योहान 5:7). तो त्रिएक परमेश्वराचे पूर्ण प्रतिनिधित्व करतो (कलस्सै 1:19; कलस्सै 2:9). तो पित्याप्रमाणे तसेच आत्म्याप्रमाणे यहोवा आहे (योहान 1:1-3; योहान 20:28; रोमकरांस पत्र 9:5;

1 तीमथ्य 3:16; तीत 1:3,4; इब्री 1:8). तो थोर **मी आहे** आहे (योहान 8:58); तो इम्मानुएल आहे, परमेश्वर आम्हासोबत (यशया 7:14; मत्तय 1:23). येशूच्या नावाचा धावा करणे म्हणजे यहोवा परमेश्वराच्या नावाचा धावा करणे होय, जो सनातन, स्वयंभू, न बदलणारा परमेश्वर आहे जो कराराचे पालन करतो.

---

येशूच्या नावाचा धावा करणे
म्हणजे यहोवा परमेश्वराच्या नावाचा धावा करणे होय,
जो सनातन, स्वयंभू, न बदलणारा परमेश्वर आहे
जो कराराचे पालन करतो.

---

**सनातन शब्द**–"येशू" हे नाव सनातन शब्दाचे नाव आहे जो परमेश्वरासोबत होता आणि जो परमेश्वर होता (योहान 1:1,2). तो युगानुयुग परमेश्वराचा शब्द आहे (प्रकटीकरण 19:13). दृश्य आणि अदृश्य जगातील सर्व गोष्टी त्याच्याद्वारे, त्याच्या माध्यमाने आणि त्याच्यासाठी उत्पन्न करण्यात आल्या होत्या (योहान 1:3; इफिसकरांस पत्र 3:9; कलस्सै 1:16). आरंभ, आरंभकर्ता, प्रत्येक गोष्टीचे उगम, कारण सर्व वस्तू त्याजपासून, त्याच्या माध्यमाने आणि त्याच्याद्वारे आल्या (प्रकटीकरण 3:14). तो सर्व वस्तूंच्या आधी आहे, आणि सर्व वस्तूंना उचलून धरतो, सांभाळ करतो, नियमन करतो, आणि पूर्ण करतो (कलस्सै 1:17; इब्री 1:3). येशूच्या नावात दृश्य आणि अदृश्य क्षेत्रातील प्रत्येक वस्तू (स्वाभाविक आणि आत्मिक) उत्पन्न करण्याचे, सांभाळून धरण्याचे, उचलून धरण्याचे, नियमन करण्याचे, नियंत्रण करण्याचे, व्यवस्था लावण्याचे सामर्थ्य आहे.

**परमेश्वराचा पुत्र**–"येशू" हे नाव त्या परमेश्वराचे नाव आहे जो मनुष्य बनला आणि परमेश्वराचा पुत्र म्हणून पृथ्वीवर वावरला. त्याच्यासारखा

दुसरा कोणताही व्यक्ती झाला नाही आणि होणार नाही. तो आम्हास प्रगट करण्यात आलेल्या अदृश्य परमेश्वराचे प्रतिरूप आहे (2 करिंथ 4:4; कलस्सै 1:15; इब्री 1:3). तो आम्ही पाहावे म्हणून पित्याच्या गौरवाची अभिव्यक्ति आहे (योहान 1:14; इब्री 1:3). तो पित्यासोबत एक आहे यासाठी की जेव्हा आम्ही त्याला पाहतो, तेव्हा आम्ही परमेश्वराला पाहावे (योहान 10:30; योहान 14:7,9). तो पित्याचे शब्द बोलला, त्याने पित्याचे कार्य केले, पित्याची इच्छा पूर्ण केली (इब्री 10:7). तो येथे पृथ्वीवर परमेश्वराचे राज्य घेऊन आला (मत्तय 4:17). तो सर्व वस्तूंचा वारस आहे आणि असा आहे ज्याने सर्व वस्तू वारश्याने प्राप्त केल्या (इब्री 1:2,8). तो पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे आणि मरणातून उठण्याद्वारे परमेश्वराचा पुत्र असा सिद्ध झाला (रोमकरांस पत्र 1:4). त्याच्या पूर्णतेतून, त्याने आपल्या सर्वांना कृपेवर कृपा दिली आहे (योहान 1:16; रोमकरांस पत्र 5:17). येशूच्या नावाचा उल्लेख पित्याचे गौरव प्रगट करतो, पित्याची इच्छा स्थापन होईल असे करतो आणि आमच्यासाठी पृथ्वीवर स्वर्ग मुक्त करतो.

**परमेश्वराचा कोंकरा**–"येशूचे" नाव निष्पाप, निष्कलंक, सिद्ध असे परमेश्वराच्या कोंकराचे नाव आहे केवळ तोच जगाची पापे दूर करावयास समर्थ होता (योहान 1:29; प्रकटीकरण 5:6). तो जगाच्या उत्पत्तीच्या आधीपासून वध करण्यात आलेला परमेश्वराचा कोंकरा आहे (1 पेत्र 1:18-20; प्रकटीकरण 13:8). आमच्यासारखी प्रत्येक बाबतीत त्याची परीक्षा घेण्यात आली, आणि तरीही तो निष्पाप सिद्ध झाला (इब्री 4:15). त्याचे रक्त पवित्र, निष्पाप आणि शुद्ध आहे. त्याचे रक्त जे परमेश्वरासमोर स्वर्गीय परमपवित्र स्थानी अर्पण करण्यात आले, त्याने आम्हास मुक्ती मिळवून दिली (इब्री 9:11,12). त्याने आम्हास आपल्या रक्ताने विकत घेतले आणि सोडविले आणि आम्हास परमेश्वरासाठी राजे आणि याजक असे बनविले (इफिसकरांस पत्र 1:7; कलस्सै 1:13,14; 1 पेत्र 1:18; 1 करिंथ 6:20; प्रकटीकरण 1:5,6). तो वल्हांडणाचा कोंकरा आहे (1 करिंथ 5:7) ज्याचे रक्त आम्हास

झाकून टाकते आणि आमचे रक्षण करते आणि आमच्यावर अत्याचार करणाऱ्यापासून आम्हास मुक्तता देते. जेव्हा आपण परमेश्वराच्या कोंकराच्या रक्ताने आमच्यासाठी जे काही केले आहे त्याची घोषणा करतो, तेव्हा आपण सैतानावर आणि सर्व दुरात्म्यांवर विजय मिळवितो (प्रकटीकरण 12:11). परमेश्वराच्या कोंकराचे राजासन युगानुयुग असेल (प्रकटीकरण 22:3). येशूच्या नावात आमची पातके क्षमा झाली आहेत. येशूच्या नावात आम्हास स्वच्छ करण्यात आले, पवित्र करण्यात आले, आणि नीतिमान ठरविण्यात आले. येशूच्या नावात आम्ही पूर्णपणे मुक्त आहोत आणि सैतान आमच्यावर दावा करू शकत नाही आणि त्याला आमच्याठायी वाव नाही.

**मशीहा, अभिषिक्त**–"येशू" हे नाव मशीहा, ख्रिस्त, पवित्र अभिषिक्ताचे नाव आहे (दानीएल 9:25; स्तोत्रसंहिता 2:2,7; मत्तय 16:16,17; योहान 4:25,26). तो यशया संदेष्ट्याने सांगितलेला सेवक आहे (यशया 42:1; यशया 49:6; यशया 52:13; यशया 53:11; मत्तय 12:18). तो अभिषिक्त आहे आणि त्याचा अभिषेक दुरात्म्याच्या त्रासाचा प्रत्येक भार दूर करतो आणि सैतानाचा प्रत्येक जू मोडून टाकतो (यशया 10:27). येशूच्या नावात दुरात्म्याच्या त्रासाचे प्रत्येक भार दूर करतो आणि सैतानाचा प्रत्येक जू मोडून टाकले जाते.

**जगाचा प्रकाश**–"येशूचे" नाव त्याचे नाव आहे जो खरा प्रकाश आहे (योहान 1:9). तो उदयप्रकाश, पहाटेचा प्रकाश (लूक 1:78), प्रभात तारा आहे (2 पेत्र 1:19; प्रकटीकरण 2:28; प्रकटीकरण 22:16). तो जगाचा प्रकाश आहे (योहान 8:12). त्याचा प्रकाश अंधार दूर करतो, औदासिन्य, लाचारी आणि निराशा दूर करतो; अंधकार त्याच्या प्रकाशास कमी करू शकत नाही किंवा त्याच्या प्रकाशापुढे उभा राहू शकत नाही. येशूच्या नावात अंधाराचे प्रत्येक कार्य, अंधाराने घडविलेले सर्वकाही नष्ट केले जाते आणि दूर केले जाते. त्याच्या सामर्थी नावापुढे अंधार मागे जातो.

**उत्तम मेंढपाळ**–"येशूचे" नाव त्या उत्तम मेंढपाळाचे (योहान 10:11), मेंढरांच्या महान मेंढपाळाचे (इब्री 13:20), तुमच्या जिवांचा मेंढपाळ आणि संरक्षक (1 पेत्र 2:25) आणि मुख्य मेंढपाळाचे नाव आहे (1 पेत्र 5:4). तो प्रेमाने, त्याच्या मेंढरांचे मार्गदर्शन करतो, पोषण करतो, वाट दाखवितो, सांत्वन करतो, रोग बरे करतो, बहाली करतो, रक्षण करतो, आणि संरक्षण देतो. येशूच्या नावात, आम्ही जी त्याची मेंढरे आहोत सुरक्षित आहोत आणि कोणीही आम्हाला त्याच्या हातून हिसकावून घेणार नाही.

**मार्ग, सत्य, जीवन**–"येशूचे" नाव त्याचे नाव आहे जो परमेश्वराकडे जाणारा मार्ग आहे (योहान 14:6). तो दार आहे (योहान 10:7), राज्यात प्रवेशाचे एकमात्र स्थान. तो सत्य आहे. लबाडी, फसवणूक, वाद आणि तर्क त्याच्यापुढे निर्बळ ठरतात. तो सत्य आहे आणि तो खरोखर लोकांस स्वतंत्र करतो (योहान 8:31,32,36). तो जीवन आहे, जीवनाची भाकर आहे, सार्वकालिक जीवनाचे स्रोत आहे (योहान 6:33,35,48-51). तो जीवनाचे पाणी आहे (योहान 4:10,14; योहान 7:37,38; प्रकटीकरण 21:6; प्रकटीकरण 22:17). तो जीवन देतो आणि विपुल जीवन देतो (योहान 10:10). त्याच्यामध्ये आमची तहान शमते आणि आमची तीव्र इच्छा तृप्त होते. येशूच्या नावाने हरवलेल्यांस मार्ग सापडतो, सत्य विजयी होते, मुक्त होते आणि राज्य करते, आणि पापात मृत झालेल्यांना सार्वकालिक जीवन, परमेश्वरासमान जीवन मिळते.

**तारणारा**–"येशूचे" नाव जगाच्या तारणाऱ्याचे नाव आहे (मत्तय 1:21; लूक 2:11; 1 तीमथ्य 1:15; 1 योहान 4:14). त्याने संपूर्ण जगाची पापे वाहून नेली (यशया 53:4; 1 योहान 2:2), आम्हास जी किंमत चुकवावयाची होती ती त्याने चुकविली आणि आमच्या वतीने तो अधोलोकास गेला, जेणेकरून आम्हास विनामूल्य क्षमा प्राप्त व्हावी. येशूच्या नावात आमच्या पापांची क्षमा करण्यात आली आहे आणि आमचे तारण झाले आहे. त्याच्या नावात तारण आहे!

**रोग बरे करणारा**–"येशूचे"नाव रोग बरे करणाऱ्या थोर वैद्याचे नाव आहे, जो प्रत्येक रोगापासून आणि आजारापासून आम्हास बरे करतो (मत्तय 4:23-25). त्याच्याद्वारे लंगडे चालू लागले, आंधळे पाहू लागले, बहिरे ऐकू लागले, मुक बोलू लागले, लंगडा आणि मुका बरा झाला आणि लोकांस प्रत्येक रोगापासून आणि प्रत्येक आजारापासून मुक्ती मिळाली (मत्तय 15:29-31). त्याने वधस्तंभावर आमचे सर्व रोग, आजार आणि वेदना वाहून नेल्या, त्यांच्या जख्मांनी आम्हास आरोग्य मिळाले (यशया 53:4,5; 1 पेत्र 2:24). तो नीतिमत्वाचा सूर्य आहे जो आपल्या पंखांत आम्हाला झाकून टाकतो (मलाखी 4:2). येशूच्या नावात रोग आणि आजार दूर होतात. रोग अपंगत्व, विकलांगत्व, जुने आजार, असाध्य रोग त्याच्या सामर्थी नावापुढे मान वाकवितात, जेणेकरून लोक बरे होतात.

***शालोमचा* अधिपती**–"येशूचे" नाव त्याचे नाव आहे जो *शालोमचा* अधिपती, शांतीचा अधिपती आहे (यशया 9:6). तो राजा आहे जो त्याच्याकडे येणाऱ्या सर्वांना आरोग्य देतो. आम्हास *शालोम* – शांती, पूर्ण आरोग्य, पूर्णता देण्यासाठी त्याने वधस्तंभावर शिक्षा सहन केली (यशया 53:5). तो पूर्ण शांती देतो, अशी शांती देत नाही जे जग देते (योहान 14:27; योहान 16:33). येशूच्या नावाचा उल्लेख *शालोम* शांती, पूर्ण कल्याण, पूर्ण स्वास्थ्य देतो. त्याचे नाव भिती शांत करते, गोंधळ दूर करते, क्लेश हुसकावून लावते आणि आरोग्य देते.

**अद्‌भुत कृत्ये करणारा**–सर्व आशीर्वादाचा उगम. येशू हे नाव महान चमत्कार करणाऱ्याचे नाव आहे.त्याने मृतांना जिवंत केले, पाण्याचा द्राक्षरस केला, अन्न वाढविले, वारा आणि लाटा शांत केल्या, मोठ्या प्रमाणात मासे पकडले आणि इतर अनेक चमत्कार केले आणि आजही बायबलच्या दिवसांप्रमाणेच तो कार्य करतो (इब्री 13:8). तोच आहे ज्याने आपल्या अवज्ञेचा प्रत्येक शाप काढून टाकला आहे, तो स्वतःच आपल्यासाठी वधस्तंभावर शाप बनला

आहे (गलतीकरांस पत्र 3:13,14). त्याने अब्राहामाचे आशीर्वाद आम्हास दिलेत. ख्रिस्तामध्ये आपल्याला परमेश्वराकडून येणाऱ्या प्रत्येक आशीर्वादाने आशीर्वादित केले जाते (इफिसकरांस पत्र 1:3). येशूच्या नावाने चमत्कार घडतात, परिस्थिती पार पालटून जाते, अशक्य गोष्टी शक्य होतात, प्रत्येक शाप दूर होतो आणि देवाचे आशीर्वाद स्वतंत्रपणे प्राप्त होतात.

**सोडविणारा नातेवाईक, मुक्तिदाता**–“येशूचे” नाव त्या प्रभूचे नाव आहे जो आमचा सोडविणारा नातेवाईक, आमचा मुक्तिदाता बनला (यशया 59:20; रोमकरांस पत्र 11:26). तो आमच्यापैकी एक बनला (इब्री 2:11,14,15; इब्री 10:5), आमचा रक्तबंधू, आमच्या कुटुंबाचा सदस्य यासाठी की त्याला आमच्या परिस्थितीत पाऊल ठेवता यावे आणि आम्हाला त्या परिस्थितीतून बाहेर काढता यावे. येशू शेवटचा आदाम, दुसरा मनुष्य आहे (1 करिंथ 15:45-47). तो मानव ख्रिस्त येशू आहे (1 तीमथ्य 2:5). या मनुष्याने आम्हाला पतनापासून सोडविले. त्याने आम्हाला त्या सर्व गोष्टींतून बाहेर काढले ज्या आदामाने आमच्या जीवनात आणल्या होत्या. त्याने स्वतःस मुक्तीचे मोल, सर्वांसाठी तारणाचे मोल म्हणून दिले (1 तीमथ्य 2:6). आम्ही धनवान बनावे म्हणून तो दरिद्री झाला (2 करिंथ 8:9). आता आम्ही प्रभूद्वारे सोडविलेले आहोत – पापाच्या बंधनातून सोडविलेले (रोमकरांस पत्र 6:14; तीत 2:14), प्रत्येक शापापासून सोडविलेले (गलतीकरांस पत्र 3:13), सैतानापासून सोडविलेले (कलस्सै 1:13,14) आणि साम्प्रत दुष्ट युगापासून सोडविलेले (गलतीकरांस पत्र 1:4). आम्ही जे होतो ते तो बनला, यासाठी की आम्हास तेथून काढून जेथे तो आहे तेथे उचलावे आणि आम्हास परमेश्वराची मुले व मुली, परमेश्वराचे वारस आणि सहवारस बनवावे. आणि त्याच्यामुळे आम्ही नीतिमान ठरलो आहोत, परमेश्वराने आमच्यावर आपली विपुल कृपा प्रगट केली आणि आपण जीवनात राज्य करतो (रोमकरांस पत्र 5:15-19). माझा तारणारा जिवंत आहे! (ईयोब 19:25,26) येशूचे सामर्थी नाम सोडविते, मुक्ती

देते, बंधन तोडते, पीडितांस मुक्त करते, बंदीवानास स्वातंत्र्य देते आणि त्याच्यामुळे आम्ही जीवनात राज्य करतो आणि प्रभूत्व गाजवितो!

**सैतानाचा नाश करणारा**–"येशूचे" नाव त्या व्यक्तीचे नाव आहे जो शापाचे डोके ठेचण्यासाठी स्त्रीचे बीज म्हणून आला (उत्पत्ति 3:15). त्यानेच सैतानास पृथ्वीवरील त्याच्या अधिसत्तेच्या ठिकाणाहून बाहेर काढले (योहान 12:31). याच येशूकडे सैताना आला आणि त्याला त्याच्याठायी जागा मिळाली नाही, प्रवेश मिळाला नाही, आधार मिळाला नाही, अधिकार किंवा काहीही मिळाले नाही (योहान 14:30). या येशूने वधस्तंभावर सैतानाचा न्याय केला, त्याला दंडाज्ञा दिली आणि त्याला शिक्षा सुनावली (योहान 16:11). या येशूने वधस्तंभावर सैतानाला आणि त्याच्या सर्व दुरात्म्यांना निःशस्त्र केले आणि त्यांना नाडून त्यांच्याविरूद्ध जयोत्सव करून त्यांचे उघडउघड प्रदर्शन केले (कलस्सै 2:15). तो अधिक बलवान मनुष्य आहे ज्याने बलवान मनुष्याच्या घरात प्रवेश करून, त्याची शस्त्रे हिसकावून घेतली आणि त्याला लुबाडले (लूक 11:21,22). या येशूने आपल्या मरणाद्वारे सैतानाचा नाश केला (इब्री 2:14). आणि हे त्याने सर्वकाही आमचा प्रतिनिधि बनून आणि आमच्या वतीने केवळ आमच्यासाठी केले. आज, येशूच्या सामर्थ्यवान नावात सैतान आणि त्याचे दुरात्मे कंपित होऊन विश्वासणाऱ्यांपुढून पळ काढतात, भूते काढले जातात, सैतानाची कामे नष्ट केली जातात आणि लोकांस बंधमुक्त केले जाते.

**विजयी विजेता, युगानुयुग राजा**–"येशूचे" नाव अशा व्यक्तीचे नाव आहे ज्याने अधोलोक आणि कबरेवर विजय मिळविला आणि विजयी होऊन कबरेतून उठला, प्रथम जन्मलेला, मरणातून प्रथम उठलेला असा ठरला (प्रकटीकरण 1:5,18; कलस्सै 1:18). त्याजजवळ स्वर्ग आणि पृथ्वीचा सर्व अधिकार आहे (मत्तय 28:18). तो सर्व वस्तूंवर अधिकारी आहे आणि सर्वकाही त्याच्या पायाखाली ठेवण्यात आलेले आहे. तो पित्याच्या उजव्या हातास सर्व सत्ता, अधिकार आणि सामर्थ्य

आणि धनीपणा, साम्प्रत आणि भावी युगाचे कोणतेही नाव घ्या, त्या सर्वाहून उंच करून बसलेला आहे (इफिसकरांस पत्र 1:20-22). आज तो नव्या कराराचा मध्यस्थ आहे (1 तीमथ्य 2:4,5; इब्री 7:25; इब्री 8:6; इब्री 9:16,17), आपण पत्करलेल्या मार्गाचा प्रेषित (इब्री 3:1), अग्रगामी (इब्री 6:20), पवित्र स्थानाचा सेवक (इब्री 8:2), आमचा प्रमुख याजक (इब्री 3:1; इब्री 4:14), मध्यस्थ (इब्री 7:25) आणि कैवारी आहे (1 योहान 2:1). तो पहिला व शेवटला, अल्फा आणि ओमेगा आहे, तो जीवनाधार आहे, आरंभापासून शेवटपर्यंत, आणि त्याचा आरंभही नाही आणि शेवटही नाही, आरंभापासून शेवटपर्यंत सर्वश्रेष्ठ आणि सार्वभौम आहे (प्रकटीकरण 1:8; प्रकटीकरण 2:8; प्रकटीकरण 21:6; प्रकटीकरण 22:13). तो आमेन आहे (प्रकटीकरण 3:14), असे होवो, परमेश्वराच्या सर्व हेतूंची परिपूर्तता आहे (इफिसकरांस पत्र 1:10; इफिसकरांस पत्र 3:10,11). तो इशायाचा धुमारा (यशया 11:1). शाखा आहे (यशया 11:1; जखऱ्या 3:8; जखऱ्या 6:12). दाविदाची संतान (2 तीमथ्य 2:8), दाविदाचा अंकुर आणि मूळ (प्रकटीकरण 5:5; प्रकटीकरण 22:16), यहूदा वशांचा सिंह आहे (प्रकटीकरण 5:5) ज्याने सर्वांस जिंकले आहे. तो पृथ्वीवरील सर्व राजांचा अधिपती आहे (प्रकटीकरण 1:5). तो ख्रिस्त येशू आमचा प्रभू (1 तीमथ्य 1:12), गौरवी प्रभू (1 करिंथ 2:8) आणि सर्वांचा प्रभू आहे (प्रेषितांची कृत्ये 10:36). त्याला सर्वोच्च पद, सर्व बाबतीत प्रथम स्थान लाभलेले आहे, आणि म्हणून त्याला युगानुयुग प्राधान्य मिळाले आहे (कलस्सै 1:18). तो धन्य व एकच अधिपती, राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू, ज्या एकालाच अमरत्व आहे, जो अगम्य प्रकाशात राहतो, सर्व आदर, गौरव व अधिकार त्याचा आहे, तो राज्य करण्यासाठी परत येत आहे. आमेन (1 तीमथ्य 6:15,16; प्रकटीकरण 19:15,16). आम्हास आवश्यक ते सर्वकाही त्याचे नाव पुरविते. त्याचे नाव सर्व क्षेत्रांस आज्ञा देते, आणि त्याच्या नावाने प्रत्येक गुडघा टेकेल आणि प्रत्येक जीभ हे कबूल करते की केवळ तोच प्रभू आहे.

विश्वासाने त्याच्या नावाचा धावा केल्यास ते सर्व काही घडून येईल

जे तो जर शारीरिकरित्या उपस्थित असता तर त्याने केले असते. तो त्याच्या नावाच्या उल्लेखाइतकाच जवळ आहे. तो जो कोणी आहे आणि त्याने जे काही साध्य केले आहे ते त्या नावात, त्याच्या गौरवी नावाद्वारे समाविष्ट आणि अभिव्यक्त आहे.

---

तो जो कोणी आहे
आणि त्याने जे काही साध्य केले आहे
ते त्या नावात,
त्याच्या गौरवी नावाद्वारे समाविष्ट आणि अभिव्यक्त आहे.

---

## चिंतन

1) व्यक्ती येशूवर, तो कोण आहे, त्याने काय साध्य केले आणि तो येणाऱ्या वेळी काय साध्य करणार आहे यावर मनन करा. येशूच्या कमीत कमी तीन गुणांवर विचार करावा ज्यांचा उल्लेख या प्रकरणात करण्यात आलेला नाही जे आपण तो कोण आहे या वर्णनात जोडू शकता.

# 3
# परमेश्वराच्या नावाची जुन्या कराराची प्रकटीकरणे

आम्हांला त्याचे नाव वापरण्याचा अधिकार देऊन येशूने आम्हा विश्वासणाऱ्यांना काय उपलब्ध करून दिले आहे हे शोधून काढण्याची तयारी करीत असताना, दोन महत्त्वाच्या बाबींवर विचार करण्याची आपणास गरज आहे.

प्रथम, आपण हे समजून घेतले पाहिजे की येशू 12 प्रेषितांशी आणि नंतर 70 शिष्यांशी आणि इतरांशी त्याच्या नावाच्या उपयोगाबद्दल बोलला, ते यहूदी लोक होते. त्यांच्या आध्यात्मिक वारशाचा एक भाग म्हणून त्यांना जीवनातील प्रत्येक दैनंदिन बाबींमध्ये परमेश्वर देवाच्या नावाचा वापर करण्याविषयी सखोल समज होती. नवीन कराराचे विश्वासणारे या नात्याने, जुन्या कराराचा अभ्यास करण्याद्वारे हे समजून घेण्यास आपल्याला मदत होईल. आम्ही या प्रकरणात, प्रभू परमेश्वराच्या नावाच्या जुन्या कराराच्या समजाचे आणि उपयोगाचे त्वरित सर्वेक्षण करू या.

दुसरे म्हणजे, आमच्यासाठी प्रभू येशूद्वारे प्रतिनिधित आध्यात्मिक अधिकारात चालण्याचा काय अर्थ आहे याचे परिपूर्ण उदाहरण आणि मूर्त रूप आहे. प्रभू येशू पित्याच्या नावात आला आणि त्याने पित्याच्या नावात त्याची कामे केली. मग त्याने त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आम्हाला त्याच्या नावात बाहेर पाठविले, अगदी त्याचप्रकारे जसा तो पित्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पित्याच्या नावात आला होता. म्हणून पुढील प्रकरणात पित्याच्या नावात येशूच्या येण्याचा काय अर्थ होता

याचे आपण पुढील प्रकरणात अवलोकन करू या. येशूच्या नावात बाहेर जगात जाण्याचा प्रयत्न करीत असताना आपण देखील तेच केले पाहिजे.

हे दोन महत्वाचे पैलू अभ्यासल्यानंतर आपण येशूच्या नावाचा उपयोग करण्याच्या आमच्या विशेषाधिकाराविषयी आणि हक्काविषयी विचार करू या आणि पाहू या की नवा करार आमच्यापुढे काय मांडतो.

प्रथम आम्ही जुन्या करारातील येशूची काही महत्वपूर्ण नावे आणि पदव्या मांडत आहोत. त्यानंतर आपण सर्वेक्षण करू या की इस्राएली लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात परमेश्वराच्या नावाला कसा सन्मान देत.

## *एलोहिम (परमेश्वर)*

**उत्पत्ती 1:1**
**आरंभी देवाने** (*एलोहिम*) **आकाश आणि पृथ्वीची उत्पत्ती केली.**

इब्री शब्द *'एलोहिम'* चा उपयोग जुन्या करारात अत्यंत सामान्य पद्धतीने करण्यात आला आहे आणि त्याचे भाषांतर "परमेश्वर" असे करण्यात आले आहे आणि हा शब्द सर्वसमर्थ, सामर्थ्यशाली, बलवान, आणि पराक्रमी परमेश्वराचा उल्लेख करतो. विशेष गोष्ट ही आहे की *'एलोहिम'* हा इब्री भाषेतील अनेकवचनी शब्द आहे, आणि त्याचा अर्थ "ईश्वर'' अथवा "बलवान'' किंवा "शक्तिशाली'' (एकापेक्षा अधिक) आहे. महत्वाची गोष्ट ही आहे की, जेव्हा परमेश्वरासाठी *'एलोहिम'* हा शब्द वापरला जातो, तेव्हा त्याच्यासोबत नेहमीच एकवचनी क्रियापदे वापरली जातात. म्हणून *'एलोहिम'* जरी अनेकवचनी शब्द असला, तरीही परमेश्वरासाठी त्याचा उल्लेख होत असतांना त्याचा एकवचनी उपयोग केला जातो, अशाप्रकारे हा शब्द ऐक्य आणि सहमती दर्शवितो, कुठलेही विभाजन न करता: *"हे इस्राएला, श्रवण कर; आपला देव (यहोवा) परमेश्वर (एलोहिम) हा अनन्य परमेश्वर (यहोवा) आहे"* (अनुवाद 6:4). *'एलोहिम'* या शब्दाचा उल्लेख बहुधा

एक-बहुवचनी नाम म्हणून केला जातो, सामुहिक नामाप्रमाणे. हा शब्द त्रिएक परमेश्वराकडे, तीन व्यक्तींमध्ये एका परमेश्वराकडे अंगुलीनिर्देश करतो. *"कारण की स्वर्गात साक्ष देणारे तिघे आहेत: पिता, शब्द आणि पवित्र आत्मा आणि हे तिघे एक आहेत"* (1 योहान 5:7). *'एलोहिम'*, बायबलचा परमेश्वर, ज्याने सर्व वस्तूंची उत्पत्ती केली तो परमेश्वर, तीन व्यक्तींमध्ये एक परमेश्वर आहे.

## *एल (परमेश्वर)*

इब्री शब्द *'एल'* ज्याचे भाषांतर "परमेश्वर'' असे करण्यात आले आहे, बलवान, सामर्थ्यवान अथवा शक्तीशाली व्यक्तीस सूचित करतो. हा शब्द दाखवितो की परमेश्वर सामर्थ्यशाली आहे. पहिल्यांदा हा शब्द उत्पत्ती 14:18 मध्ये आला. *एल* हा शब्द परमेश्वराच्या कित्येक गुणांशी निगडीत आहे (खाली पवित्र शास्त्राच्या काही संदर्भांसोबत यादीबद्ध केल्याप्रमाणे). खाली दिलेल्या पवित्र शास्त्रातील संदर्भांचे वाचन करणे योग्य ठरेल, परमेश्वराच्या या नावांवर आणि गुणांवर मनन करणे आणि विचार करणे योग्य ठरेल.

परमेश्वराच्या या गुणांवर मनन करीत असताना आपल्या अंतःकरणात परमेश्वराप्रत उपासनेचा उदय व्हावा.

- ***एल एल्योन:*** परम प्रधान परमेश्वर, सर्वोच्च परमेश्वर (उत्पत्ती 14:18-22)
- ***एल शद्दाय:*** सर्वसमर्थ परमेश्वर, सर्व पर्याप्त, परमेश्वर जो पर्याप्तपेक्षा अधिक आहे, स्तनधारी (उत्पत्ती 17:1)
- ***एल ओलाम:*** सनातन परमेश्वर, अनंतकाळचा परमेश्वर, युगानुयुगचा परमेश्वर (उत्पत्ती 21:33)
- ***एल कन्ना:*** ईर्ष्यावान परमेश्वर (निर्गम 20:5)
- ***एल राखूम:*** दयाळू परमेश्वर, कळवळा करणारा परमेश्वर (अनुवाद 4:31)

- ***एल अमान:*** विश्वासू परमेश्वर (अनुवाद 7:9)
- ***एल गादोल:*** सामर्थ्यवान परमेश्वर, महान ईश्वर (अनुवाद 7:21; अनुवाद 10:17)
- ***एल गिब्बोर:*** सामर्थ्यवान परमेश्वर, योद्धा परमेश्वर (अनुवाद 10:17)
- ***एल यारे:*** भयानक परमेश्वर, भयकारी परमेश्वर (अनुवाद 10:17)
- सत्याचा परमेश्वर (*एल*), अन्याय न करणारा, नीतिमान आणि सरळपणे वागणारा परमेश्वर (अनुवाद 32:4)
- ***एल खाही:*** जिवंत परमेश्वर (यहोशवा 3:10)

परमेश्वराची नावे आणि पदव्या
परमेश्वराच्या स्वभावाचे आणि गुणांचे
विविध पैलू प्रगट करतात.

## मी आहे तो आहे

**निर्गम 3:13-15**

**13 तेव्हा मोशे देवाला म्हणाला, “पाहा, ‘मला तुमच्या पूर्वजांच्या देवाने तुमच्याकडे पाठवले आहे,’ असे मी इस्राएलवंशजांकडे जाऊन त्यांना सांगितले असता ‘त्याचे नाव काय’ असे मला ते विचारतील, तेव्हा मी त्यांना काय सांगू?”**
**14 देव मोशेला म्हणाला, “मी आहे तो आहे; तू इस्राएलवंशजांस सांग, ‘मी आहे’ ह्याने मला तुमच्याकडे पाठवले आहे.”**
**15 आणखी देवाने मोशेला सांगितले, “तू इस्राएल लोकांना सांग, तुमच्या पूर्वजांचा देव, अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव व याकोबाचा देव परमेश्वर ह्याने मला तुमच्याकडे पाठवले आहे; हेच माझे सनातन नाव आहे व ह्याच नावाने पिढ्यानपिढ्या माझे स्मरण होईल.**

जेव्हा मोशेने परमेश्वरास त्याचे नाव विचारले जसे येथे निर्गम 3 मध्ये लिहिलेले आहे, तेव्हा *‘एलोहिम’* न मोशेला म्हटले “मी आहे” (सदैव अस्तित्वात, सदैव असणारा) “तो” “मी आहे” (सदैव अस्तित्वात,

सदैव असणारा), अथवा संक्षिप्त स्वरूप म्हणजे "मी आहे" जो परमेश्वराचा उल्लेख करतो, जो नेहमी अस्तित्वात आहे, जो नेहमी आहे. बायबलचा परमेश्वर तो परमेश्वर आहे ज्याच्यावर वेळेचे बंधन नाही. तो आता सनातन काळात वास करतो. तो आहे. तो वेळे बाहेरील क्षेत्रात वास करतो. आम्ही जाणतो तसे परमेश्वरास वेळेचे महत्व नाही. तो सनातन, स्वयंभू परमेश्वर आहे. हा थोर **मी आहे** *"अब्राहामाचा परमेश्वर, इसहाकाचा परमेश्वर आणि याकोबाचा परमेश्वर आहे."* या पूर्वजांनी या थोर **मी आहे**ची सेवा केली होती.

विशेष म्हणजे, आम्हास माहीत आहे की नव्या करारात, प्रभू येशूने स्वतःसाठी याच पदवीचा उपयोग केला. *"येशू त्यांना म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वी मी आहे"* (योहान 8:58).

## यहोवा (प्रभू)

कदाचित इस्त्राएली लोकांसाठी अत्यंत महत्वाचे नाव, आणि संपूर्ण जुन्या करारात उपयोग करण्यात आलेले जे नाव आहे ते म्हणजे इब्री भाषेतील कराराचे नाव "यहोवा" (किंवा *यहोवाह* अथवा *याहवे*). इंग्रजी बायबलच्या वेगवेगळ्या संस्करणात या नावाचे भाषांतर असे करण्यात आले आहे: प्रभू, यहोवा, याहवे, परमेश्वर, इत्यादी. के.जे.व्ही. आणि एन.के.जे.व्ही.मध्ये "यहोवा"चे भाषांतर प्रभू असे करण्यात आले आहे आणि म्हणून ते सहज ओळखता येते.

**निर्गम 6:2-4**

**2 देव मोशेशी बोलला; तो म्हणाला, "मी परमेश्वर आहे.**

**3 मी अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांना सर्वसमर्थ देव म्हणून प्रकट झालो तथापि परमेश्वर, ह्या माझ्या नावाने मी त्यांना ज्ञात नव्हतो.**

**4 ज्या कनान देशात ते उपरे होते तो परदेश त्यांना वतन देण्याविषयीचा करार मी त्यांच्याशी केला आहे.**

"यहोवा" हे नाव सनातन, स्वयंभू असलेल्या, अपरिवर्तनीय

परमेश्वराचा उल्लेख करते जो कराराचे पालन करतो. जेव्हा परमेश्वर मोशेला त्याच्या कामगिरीवर पाठवत असताना त्याच्याशी बोलला, तेव्हा त्याने त्याच्या “यहोवा” या नावावर जोर दिला आणि यहोवा हा कराराचे पालन करणारा परमेश्वर आहे हे दाखवून दिले. “यहोवा” हे त्याच्या खास लोकांसाठी परमेश्वराचे कराराचे नाव आहे. या नावाद्वारे त्याने त्याच्या लोकांशी करार केला होता आणि तो जे काही आहे ते त्याने आपल्या लोकांसाठी उपलब्ध करून दिले. त्याने अपेक्षा केली की त्याच्या लोकांनी त्याच्या नावाचा आदराने उपयोग करावा आणि केवळ त्याचीच स्तुती करावी. *“मी परमेश्वर (यहोवा) आहे; हे माझे नाम आहे; मी आपले गौरव दुसऱ्यास देऊ देणार नाही; मी आपली प्रशंसा मूर्तींना प्राप्त होऊ देणार नाही”* (यशया 42:8).

आपण जुन्या करारातील शास्त्रवचनात यहोवाच्या अनेक पदव्या वाचतो जी यहोवा परमेश्वर कोण आहे, तो आपल्या लोकांसाठी काय असेल आणि तो त्यांच्यासाठी काय करेल याचे विभिन्न पैलू प्रगट करतात.

- ***यहोवा-एलोहीम:*** सनातन उत्पन्नकर्ता (उत्पत्ती 2:4-25)
- ***अदोनाय-यहोवा:*** प्रभू आमचा सार्वभौम; स्वामी यहोवा (उत्पत्ती 15:2,8)
- ***यहोवा-यिरे:*** प्रभू तरतूद करणारा (उत्पत्ती 22:8-14)
- ***यहोवा-राफा:*** प्रभू आमचा रोग बरे करणारा परमेश्वर (निर्गम 15:26)
- ***यहोवा-निस्सी:*** प्रभू आमची पताका (निर्गम 17:15)
- ***यहोवा-एलोहेका:*** प्रभू माझा परमेश्वर (निर्गम 20:2,5,7)
- ***यहोवा-मकादिशकेम:*** प्रभू आमचा पवित्र करणारा परमेश्वर (निर्गम 31:13; लेवीय 20:8; लेवीय 21:8; लेवीय 22:9,16,32; यहेज्केल 20:12)

- ***यहोवा-शालोम:*** प्रभू आमची शांती (शास्ते 6:24)
- ***यहोवा-सबाओथ:*** सैन्यांचा देव परमेश्वर (1 शमुवेल 1:3; इत्यादी, 284 वेळा)
- ***यहोवा-एल्योन:*** परमप्रधान प्रभू (स्तोत्रसंहिता 7:17; स्तोत्रसंहिता 47:2; स्तोत्रसंहिता 97:9)
- ***यहोवा-रोही:*** प्रभू माझा मेंढपाळ (स्तोत्रसंहिता 23:1)
- ***यहोवा-होसीनू:*** प्रभू आमचा कर्ता (स्तोत्रसंहिता 95:6)
- ***यहोवा-एलोहीनू:*** प्रभू आमचा परमेश्वर (स्तोत्रसंहिता 99:5,8,9)
- ***यहोवा-सिदकेनू:*** प्रभू आमचे नीतिमत्व (यिर्मया 23:6; यिर्मया 33:16)
- ***यहोवा-शम्मा:*** प्रभू उपस्थित आहे (यहेज्केल 48:35)
- ***यहोवा-एलोहाय:*** प्रभू माझा परमेश्वर (जखऱ्या 14:5)

## दैनंदिन जीवनात प्रभूचे नाव

जुन्या करारात परमेश्वराच्या लोकांसाठी प्रभूच्या नावाचा काय अर्थ होता याचे आपण त्वरित सर्वेक्षण मांडत आहोत. आपण हे लक्षात ठेविले पाहिजे की हे प्रकटीकरण अथवा आध्यात्मिक समज क्रमिक होती. अर्थात, परमेश्वराच्या लोकांनी कालांतराने आणि अनेक पिढ्यानंतर हे समजून घेतले.

**लोक परमेश्वराच्या नावाचा धावा करून त्याची उपासना करीत.** अब्राहम हा याचे उत्तम उदाहरण आहे जेथे आपल्या प्रवासात त्याने वेगवेगळ्या ठिकाणी वेद्या उभारल्या आणि प्रभूच्या नावाचा धावा केला (उत्पत्ती 12:8; उत्पत्ती 13:4; उत्पत्ती 21:33; उत्पत्ती 22:14; उत्पत्ती 26:25). कधीकधी त्याला विशेष दर्शन प्राप्त झाले आणि आणि त्याने परमेश्वराच्या नवीन नावाविषयी जाणून घेतले, जो परमेश्वराच्या स्वभावाचा विशिष्ट पैलू प्रगट करतो. **उदाहरण**: *यहोवा यिरे* अर्थात

"प्रभू जो तरतूद करील" किंवा "परमेश्वर पाहून घेईल" (उत्पत्ती 22:14)।

**अनेकदा परमेश्वराने जे केले होते त्या आधारे लोक त्याचे स्तवन करीत.** लाल समुद्र विभागल्यानंतर त्यांनी घोषित केले *"परमेश्वर रणवीर आहे; याव्हे हे त्याचे नाव"* (निर्गम 15:3). अमालेकांवरील विजयानंतर त्यांनी घोषणा केली, *"तेथे मोशेने एक वेदी बांधून तिचे नाव 'याव्हे-निस्सी' (परमेश्वर माझा झेंडा) असे ठेवले"* (निर्गम 17:15).

**त्यांना प्रभू परमेश्वराचे नाव व्यर्थ घेण्याची परवानगी नव्हती.** दहा आज्ञांपैकी तिसरी आज्ञा होती: *"तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नकोस, कारण जो परमेश्वराचे नाव व्यर्थ घेईल त्याची तो गय करणार नाही"* (निर्गम 20:7). *"माझ्या नावाची खोटी शपथ वाहून आपल्या देवाच्या नावाला कलंक लावू नये, मी परमेश्वर आहे"* (लेवीय 19:12).

**जेव्हा नावाची घोषणा केली जात असे तेव्हा परमेश्वराचे गौरव प्रगट होत असे.** नव्या करारात आपणास हे एक महत्त्वाचे प्रकटीकरण पहावयास मिळते. जेव्हा मोशेने विनंती केली की परमेश्वराने आपले गौरव त्याला दाखवावे तेव्हा परमेश्वराने असे म्हणून उत्तर दिले, *"मी आपले सर्व चांगुलपण तुझ्यापुढे चालवीन"* (निर्गम 33:19). ही राजाच्या आगमनाची घोषणा करणारी मिरवणूक आहे *"तो म्हणाला, 'कृपा करून मला तुझे तेज दाखव.' तो म्हणाला, 'मी आपले सर्व चांगुलपण तुझ्यापुढे चालवीन; तुझ्यासमोर 'परमेश्वर' ह्या नावाची मी घोषणा करीन; ज्याच्यावर कृपा करावी असे वाटेल त्याच्यावर मी कृपा करीन आणि ज्याच्यावर दया करावी असे वाटेल त्याच्यावर दया करीन'"* (निर्गम 33:18,19, भी देखें निर्गम 34:5-8).

---

परमेश्वराच्या नावाची घोषणा
परमेश्वराचे गौरव प्रकट करते.

---

**त्याच्या नावाने शपथ घेणे.** विशेष गोष्ट म्हणजे लोकांस सांगण्यात आले होते की त्यांनी गंभीर प्रतिज्ञा कराव्या, प्रभूच्या नावात शपथा घ्याव्या. वस्तुतः ते परमेश्वरास साक्ष म्हणून शपथ घेत होते आणि म्हणून ती एक बंधनकारक प्रतिज्ञा असे जिचे त्यांस पालन करावे लागे. *"तू आपला देव परमेश्वर ह्याचे भय बाळग, त्याची सेवा कर आणि त्याच्याच नावाने शपथ वाहा"* (अनुवाद 6:13). योनाथान आणि दावीद या दोघांनी प्रभूच्या नावात शपथ घेतली (1 शमुवेल 20:42). लक्षात घ्या की प्रभू येशूने आम्हास शिकविले, *"मी तर तुम्हांला सांगतो, शपथ वाहूच नका''* त्याऐवजी *"...तुमचे बोलणे, होय तर होय, नाही तर नाही, एवढेच"* (मत्तय 5:34,37).

**याजक लोकांना प्रभूच्या नावाने आशीर्वाद देत.** प्रभूच्या लोकांची सेवा करण्यासाठी आणि प्रभूच्या नावात लोकांना आशीर्वाद देण्यासाठी याजकांची नेमणूक करण्यात आली होती. *"परमेश्वराच्या कराराचा कोश वाहण्यासाठी परमेश्वरासमोर उभे राहून त्याची सेवा करायला व त्याच्या नावाने आशीर्वाद द्यायला त्या वेळेस परमेश्वराने लेवी वंशाला वेगळे केले; ते आजवर चालू आहे"* (अनुवाद 10:8, अनुवाद 21:5 पाहा). यरूशलेम नगरात कराराचा कोश आणल्यानंतर राजा दाविदाने *"होमबली व शांत्यर्पणे अर्पण केल्यावर दाविदाने सेनाधीश परमेश्वर ह्याच्या नामाने लोकांना आशीर्वाद दिला"* (2 शमुवेल 6:18).

**याजक आणि लेवी प्रभूच्या नावात सेवा करीत.** *"कारण त्याने व त्याच्या वंशजांनी निरंतर परमेश्वराच्या नावाने सेवा करण्यास हजर राहावे म्हणून तुझा देव परमेश्वर ह्याने त्यांना तुझ्या सर्व वंशांतून निवडून घेतले आहे"* (अनुवाद 18:5). म्हणून याजक लोकांसाठी परमेश्वराचे प्रतिनिधी ठरले आणि ते परमेश्वराप्रत लोकांचे प्रतिनिधित्व देखील करीत.

**संदेष्ट्ये त्याच्या नावाने बोलले.** संपूर्ण जुन्या करारात संदेष्ट्ये

प्रभूच्या नावाने बोलणारे लोक होते (याकोब 5:10). म्हणून याजक लोक लोकांसाठी परमेश्वराचे प्रतिनिधी ठरले आणि परमेश्वरासाठी लोकांचे प्रतिनिधी. 1 इतिहास 21:19 यात लिहिले आहे: *"गादाने परमेश्वराच्या नामाने सांगितले त्याप्रमाणे दावीद वरती गेला."*

**जेथे परमेश्वराचे नाव आहे तेथे परमेश्वराचा वास आहे.** दुसरे विशेष सत्य ज्यात लोक चालत ते ठिकाण आहे जेथे परमेश्वराने आपले नाव ठेवले होते, तेथे त्याचा वास होता आणि तेथे ते परमेश्वराची उपासना करू शकत. *"पण तुमचा देव परमेश्वर आपल्या नावाची स्थापना करण्यासाठी तुमच्या सर्व वंशांच्या वतनातून जे स्थान निवडून घेईल तेथे त्याच्या निवासस्थानी तुम्ही त्याला शरण जा व तेथेच जात जा"* (अनुवाद 12:5). नव्या करारात परमेश्वर त्याच्या आत्म्याद्वारे विश्वासणाऱ्यांमध्ये वस्ती करून राहतो. जुन्या कराराविपरीत नव्या करारात प्रभूच्या नावात विश्वास ठेवणाऱ्यांची मंडळी त्याच्या उपस्थितीचे स्थान बने.

**प्रभूच्या नावाने ओळखले जाणारे लोक**. इस्राएली लोक यहोवा परमेश्वराचे नाव घेऊन वावरत. *"परमेश्वराचे नाव तुला दिले आहे हे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे पाहतील तेव्हा त्यांना तुझा धाक वाटेल"* (अनुवाद 28:10). कारण त्यांना त्याचे नाव दिले होते आणि स्वतःच्या नावाच्या सन्मानाप्रीत्यर्थ परमेश्वर आपल्या लोकांचा त्याग करणार नाही. *"परमेश्वर आपल्या थोर नामास्तव आपल्या लोकांचा त्याग करणार नाही, कारण परमेश्वराने कृपावंत होऊन तुम्हांला आपले प्रजाजन केले आहे"* (1 शमुवेल 12:22). या दृष्टिकोनातून त्यांनी क्षमा मागितली आणि विनंती केली की त्यांना प्रभूच्या नावात संजीवित केले जावे, आणि राष्ट्राच्या रूपात त्याने आपला दैवी हस्तक्षेप करावा. *"हे परमेश्वरा, तू आपल्या नावासाठी माझ्या दुष्टाईची क्षमा कर; कारण ती फार झाली आहे"* (स्तोत्रसंहिता 25:11). *"त्यांनी विनंती केली की प्रभूच्या नावात त्यांना संजीवित केले जावे. हे परमेश्वरा, तू आपल्या नावासाठी मला नवजीवन दे"* (स्तोत्रसंहिता 143:11). *"हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर;*

*हे प्रभू, ऐक, कार्य कर; विलंब लावू नकोस; हे माझ्या देवा, तुझे नगर व तुझे लोक ह्यांना तुझे नाम दिले आहे; म्हणून तुझ्याचप्रीत्यर्थ हे मागतो"* (दानीएल 9:19).

**त्यांनी प्रभूच्या नावाने शत्रूला तोंड दिले.** ते *याहवेच्या* नावात युद्ध करावयास गेले. "तेव्हा दावीद त्या पलिष्ट्याला म्हणाला, *"तू तलवार, भाला व बरची घेऊन माझ्यावर चालून आलास; पण इस्राएली सैन्यांच्या देवाला तू तुच्छ लेखले आहेस; त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामाने मी तुझ्याकडे आलो आहे"* (1 शमुवेल 17:45). *"तुला मिळालेल्या तारणामुळे आम्ही उत्सव करू; आमच्या देवाच्या नावाचा ध्वज उभारू; तुझ्या सर्व मागण्या परमेश्वर पूर्ण करो"* (स्तोत्रसंहिता 20:5). *"कोणी रथाची व कोणी घोड्यांची बढाई मारतात; आम्ही तर आमचा देव परमेश्वर ह्याच्या नावाची प्रशंसा करू"* (स्तोत्रसंहिता 20:7).

**त्यांनी प्रभूच्या नावाचे गीत गायले आणि स्तवन केले.** त्याच्या नावाची स्तुतीगीते गाणे त्याचे उपकार स्तवन करीत गाणे होते. *"म्हणून हे परमेश्वरा, मी राष्ट्रांमध्ये तुझे स्तवन करीन, तुझ्या नावाची स्तोत्रे गाईन"* (स्तोत्रसंहिता 18:49). त्याचे नाव अद्‌भुत, उत्तम आणि प्रतापमय होते आणि ते स्तुतीस योग्य होते. *"हे परमेश्वरा, आमच्या प्रभो, सर्व पृथ्वीवर तुझे नाव किती थोर आहे! तू आपले वैभव आकाशभर पसरले आहेस"* (स्तोत्रसंहिता 8:1). ते त्याच्या नावास गौरव देतील (स्तोत्रसंहिता 29:2; स्तोत्रसंहिता 115:1); त्याच्या नावाचा धन्यवाद करतील (स्तोत्रसंहिता 30:4); त्याच्या नावास उंचवितील (स्तोत्रसंहिता 34:3); ते त्याच्या नावाचे स्तवन करतील (स्तोत्रसंहिता 54:6); ते त्याच्या नावास धन्यवाद देतील (स्तोत्रसंहिता 96:2); ते त्याच्या नावाचे भय बाळगतील (स्तोत्रसंहिता 86:11). *"सूर्याच्या उगवतीपासून मावळतीपर्यंत परमेश्वराचे नाव स्तवनीय आहे"* (स्तोत्रसंहिता 113:3). परमेश्वराने त्याच्या नावास आणि त्याच्या शब्दास सर्वात श्रेष्ठ स्थान दिले होते. *"तुझ्या पवित्र मंदिराकडे वळून मी तुझी उपासना करीन, तुझ्या दयेमुळे व तुझ्या सत्यामुळे मी*

*तुझ्या नावाचे उपकारस्मरण करीन; कारण तू आपल्या संपूर्ण नावांहून आपल्या वचनाची थोरवी वाढवली आहेस"* (स्तोत्रसंहिता 138:2, ईएसव्ही).

**त्यांना प्रभूच्या नावात मदत आणि संरक्षण लाभले होते.** *"संकटाच्या दिवशी परमेश्वर तुझे ऐको; याकोबाच्या देवाचे नाव तुला उच्चपदी प्रस्थापित करो"* (स्तोत्रसंहिता 20:1). *"परमेश्वराचे नाम बळकट दुर्ग आहे, त्यात नीतिमान धावत जाऊन निर्भय राहतो"* (नीतिसूत्रे 18:10). *"आकाश व पृथ्वी ह्यांचा निर्माणकर्ता जो परमेश्वर त्याच्या नावामुळे आम्हांला साहाय्य मिळते"* (स्तोत्रसंहिता 124:8).

**प्रभूच्या नावात येणाऱ्यांचा त्यांनी स्वीकार केला.** *"परमेश्वराच्या नावाने येणारा धन्यवादित असो. परमेश्वराच्या घरातून आम्ही तुम्हांला आशीर्वाद देतो"* (स्तोत्रसंहिता 118:26). हे वचन प्रभू येशू ख्रिस्ताविषयी भाकीत सुद्धा आहे.

**प्रभूच्या नावावर विश्वास ठेवणे म्हणजे स्वतः प्रभूवर अवलंबून राहणे आहे.** *"परमेश्वराचे भय बाळगून त्याच्या सेवकाचे ऐकणारा असा तुमच्यामध्ये कोण आहे? जो अंधारात चालतो, ज्याला प्रकाश मिळत नाही त्याने परमेश्वराच्या नामावर भाव ठेवावा, आपल्या देवाचा आश्रय करावा"* (यशया 50:10). *"मी तुझ्यामध्ये नम्र व गरीब लोक राहू देईन, ते परमेश्वराच्या नामावर श्रद्धा ठेवतील"* (सफन्या 3:12).

**राष्ट्रे प्रभूच्या नावाकडे वळतील.** संदेष्ट्ये अशा समयाविषयी बोलले जेव्हा गैरयहूदी लोक प्रभूच्या नावाचा धावा करतील आणि केवळ एकच प्रभू असेल ज्याची उपासना केली जाईल. *"त्या काळी यरुशलेमेस परमेश्वराचे सिंहासन म्हणतील, त्याच्याकडे सर्व राष्ट्रे जमा होतील. कारण परमेश्वराचे नाम यरुशलेमेत आहे; ह्यापुढे ती आपल्या दुष्ट अंतःकरणाच्या हट्टाप्रमाणे चालणार नाहीत"* (यिर्मया 3:17). *"तेव्हा असे होईल की जो कोणी परमेश्वराचा धावा करील तो तरेल; कारण*

*परमेश्वराने म्हटल्याप्रमाणे निभावलेले सीयोन डोंगरावर व यरुशलेमेत राहतील आणि परमेश्वराने ज्यांना बोलावले ते बाकी उरलेल्यांत राहतील"* (योएल 2:32). *"तेव्हा परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या दिवशी परमेश्वर तेवढा व त्याचे नाम तेवढे राहील"* (जखऱ्या 14:9). *"कारण सूर्याच्या उगवतीपासून मावळतीपर्यंत राष्ट्रांमध्ये माझे नाव थोर आहे, माझ्या नावाप्रीत्यर्थ प्रत्येक स्थळी धूप जाळतात व निर्दोष बली अर्पण करतात; कारण माझे नाव राष्ट्रांमध्ये थोर आहे, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो"* (मलाखी 1:11).

**जेव्हा आपण प्रभूच्या नावाचे चिंतन करतो तेव्हा तो त्याकडे लक्ष देतो.** *"तेव्हा परमेश्वराचे भय बाळगणारे एकमेकांशी बोलले; ते परमेश्वराने कान देऊन ऐकले आणि परमेश्वराचे भय धरणारे व त्याच्या नामाचे चिंतन करणारे ह्यांची एक स्मरणवही त्याच्यासमोर लिहिण्यात आली"* (मलाखी 3:16).

## येशू एकाच नावात परमेश्वराचे सर्वस्व

जुन्या कराराच्या त्वरित सर्वेक्षणाद्वारे, हे स्पष्ट होते की प्रभुच्या नावाचा उपयोग करणे हे यहूदी लोकांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग होते. प्रभू त्याच्या नावाच्या उल्लेखाद्वारे आपल्या लोकांच्या जवळ होता. ते प्रभूच्या नावाचे महत्त्व समजत होते.

आता कल्पना करा की प्रभू येशू अशा परिस्थितीत पाऊल टाकतो. देहधारी शब्द, परमेश्वराचा पुत्र, नासरेथच्या एका साध्याभोळ्या आणि नम्र सुताराच्या रूपात येतो. तो आपली सेवा सुरू करतो, बारा पुरुषांना गोळा करतो, हे सर्व यहूदी आहेत, आणि मग त्यांना त्याच्या नावात जाण्यासाठी बाहेर पाठवितो! आता कल्पना करा की येशू आपल्या 12 प्रेषितांस सांगतो *"येशू ख्रिस्त या माझ्या नावाचा जाऊन उपयोग करा"!*

त्याचे शिष्य, प्रथम 12, नंतर 70 लोकांनी बाहेर जाऊन का म्हणून येशूच्या नावात रोग्यांस बरे करण्याचा, भूते काढण्याचा आणि अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करावा? "यहोवा" नावाचे आणि परमेश्वराच्या सर्व कराराच्या नावांचे काय, त्यांच्या यहूदी विश्वासाचा भाग म्हणून त्यांना ही नावे चांगल्याप्रकारे पाठ होती?

येथे दोन महत्वाच्या गोष्टी आहेत ज्याकडे आपण अंगुली निर्देश करू शकतो.

पहिले, 12 प्रेषितांना प्रकटीकरण प्राप्त झाले, त्यांनी येशूमध्ये मशीहा, परमेश्वराचा पुत्र म्हणून विश्वास केला, त्यांनी त्याला ओळखले. याच कारणास्तव ते त्याला अनुसरले. बापतिस्मा करणाऱ्या योहानाने मशीहा म्हणून त्याची घोषणा करीत येशूकडे बोट दाखविले, जो त्याच्या आधी होता, जो पवित्र आत्म्याने बापतिस्मा देतो, देवाचा कोंकरा, देवाचा पुत्र (योहान 1:29-34). अंद्रिया येशूला अनुसरला कारण त्याने बापतिस्मा करणाऱ्या योहानाचे ऐकले. अंद्रिया आपला भाऊ शिमोन पेत्र याला घेऊन आला *"मशीहा (म्हणजे ख्रिस्त) आम्हाला सापडला आहे"* (योहान 1:41). फिलिप्पाला नथनेल सापडला ज्याने येशूला भेटल्यावर म्हटले, *"गुरुजी, आपण देवाचे पुत्र आहा, आपण इस्राएलाचे राजे आहा"* (योहान 1:49). मत्तय 16:16 मध्ये शिमोन पेत्राने घोषणा केली हे देखील आम्हास माहीत आहे *"आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र आहा."* म्हणून हे स्पष्ट आहे की हे यहूदी लोक ज्यांना येशूने त्याचे प्रेषित म्हणून नेमिले होते, परमेश्वराचा पुत्र मशीहा म्हणून त्याच्यावर विश्वास करीत होते.

दुसरे, 12 शिष्यांनी येशूला प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यासमोर अद्‌भुत कार्ये करतांना पाहिले होते. त्यांनी रोग बरे करतांना, लोकांना सोडवितांना, अद्‌भुत कार्ये करतांना पाहिले होते. म्हणून जेव्हा येशूने त्यांना अधिकार दिला आणि त्याच्या नावाचा उपयोग करण्यासाठी,

"नासरेथकर येशू ख्रिस्ताच्या" नावाचा उपयोग करण्यासाठी बाहेर पाठविले, तेव्हा त्यांनी तसे स्वेच्छेने केले. अर्थात त्यांना परिणाम दिसून आले. यामुळे त्यांना जे करण्याची आज्ञा देण्यात आली होती ते करीत राहण्यासाठी आत्मविश्वास प्राप्त झाला. येशू ख्रिस्ताद्वारे आणि बारा प्रेषितांद्वारे जे काही घडत होते ते इतरांनी पाहिले, आणि त्यांनीसुद्धा येशूच्या नावाचा उपयोग करण्यासाठी पाऊल पुढे टाकले आणि येशूने त्यांना थांबवले नाही (मार्क 9:38-41; लूक 9:49,50). येशूने आणखी सत्तर यहूदी अनुयायांस त्याच्या नावात जाऊन सुवार्ता गाजविण्यासाठी आणि अद्‌भुत कृत्ये करण्यासाठी नेमिले आणि त्यांनी तसे केले (लूक 10:1,9,17).

या बारा यहूदी विश्वासणाऱ्यांस येशूच्या नावाच्या सामर्थ्याचा प्रत्यक्ष अनुभव होता. *यहोवाच्या* नावांद्वारे परमेश्वराने स्वतःविषयी जे काही प्रगट केले होते ते आता ह्या एका नावात समाविष्ट करण्यात आले आहे – येशूचे नाव.

आज आमच्यासाठी दोन महत्वाचे पाठ आहेत. पहिला, आपण हे ओळखले पाहिजे की येशू कोण आहे. येशूच्या व्यक्तित्वाच्या थोरवीचे वैय्यक्तिक प्रकटीकरण आपणास लाभले पाहिजे. दुसरे म्हणजे, आम्ही हे जाणले पाहिजे की येशूने त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार आम्हास दिला आहे आणि येशूच्या नावाचा उपयोग करण्यासाठी आपण धैर्याने पाऊल टाकले पाहिजे.

---

परमेश्वर जो आहे,
त्याचे सर्वस्व या एका नावात सामावलेले आहे, येशूचे नाव!

---

# चिंतन

1) जुन्या कराराच्या काळात लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात प्रभूच्या नावाचा कसा उपयोग करीत याचा आढावा घ्या. यापैकी नवीन करारातील विश्वासणाऱ्यांसाठी समान अर्थ असलेली कमीतकमी पाच नावे घ्या. चर्चा करा की आम्ही कशाप्रकारे येशूचे नाव समानरित्या घेतो (अगदी तसेच नसले तरीही).

2) जर आपण 12 प्रेषितांपैकी एक असता अथवा 70 प्रेषितांपैकी एक असता, ज्यांचे संगोपन यहूदी म्हणून झाले होते, ज्यांना यहोवा परमेश्वराच्या नावाची दृढ समज असती,

(अ) तर आपण कसा प्रतिसाद दिला असता जेव्हा नासरेथच्या एका तरुण सुताराने आपणास म्हटले असते की आपण त्याच्या नावाचा उपयोग करून अद्‌भुत कृत्ये करू शकता?

(ब) आपण कोणत्या प्रश्नांशी संघर्ष केला असता?

(क) त्याच्या नावाचा जाऊन उपयोग करण्यासाठी कोणत्या मुख्य कारकांनी आपल्या मनात विश्वास उत्पन्न केला असता?

# 4
# माझ्या पित्याच्या नावात

**योहान 5:43**
**मी आपल्या पित्याच्या नावाने आलो आहे पण तुम्ही माझा स्वीकार करत नाही; दुसरा कोणी स्वतःच्या नावाने आला तर त्याचा तुम्ही स्वीकार कराल.**

**योहान 10:25**
**येशूने त्यांना उत्तर दिले, "मी तुम्हांला सांगितले तरी तुम्ही विश्वास ठेवत नाही; जी कृत्ये मी माझ्या पित्याच्या नावाने करतो ती माझ्याविषयी साक्ष देतात."**

आपण पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे आमच्यासाठी प्रतिनिधी रूपातील आत्मिक अधिकारात चालण्याचा जो अर्थ आहे त्याचे प्रभू येशू परिपूर्ण उदाहरण आणि मूर्त रूप आहे. प्रभू येशू पित्याच्या नावाने आला आणि त्याने पित्याच्या नावाने त्याची कामे केली.

जेव्हा येशूने म्हटले, *"मी आपल्या पित्याच्या नावाने आलो आहे,"* याचा अर्थ हा की तो पित्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करण्यासाठी पित्याद्वारे त्याला प्रतिनिधी म्हणून दिलेल्या अधिकारासह आला. याचा अर्थ त्याच्याजवळ पित्याचे शब्द बोलण्याचा आणि पित्याची कामे करण्याचा, पित्याची इच्छा पार पाडण्याचा आणि पित्याद्वारे त्याला सोपविण्यात आलेले काम पूर्ण करण्याचा आदेश होता.

---

जेव्हा येशूने म्हटले, "मी आपल्या पित्याच्या नावाने आलो आहे," याचा अर्थ हा की तो पित्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करण्यासाठी पित्याद्वारे त्याला प्रतिनिधी म्हणून दिलेल्या अधिकारासह आला.

---

पित्याच्या नावाने कामे करण्याचा अर्थ हा होता की पित्याद्वारे त्याच्याठायी निहित अधिकारामुळे येशू अगदी तेच करेल जो पिता करेल, पित्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करीत, त्याच्या वतीने आणि त्याच्या जागी कार्य करील.

या प्रकरणात आपण विचार करीत आहोत की येशू पित्यासोबत कसा चालला, त्यामुळे तो पित्याच्या नावाने कार्य करू शकला, पित्याच्या वतीने बोलू शकला, पिता जे करील ते करू शकला. पित्याच्या नावाने त्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करण्यासाठी त्याचे आज्ञापालन करण्यासाठी येशू पित्यासोबत कसा चालला याचा बारकाईने अभ्यास करणे आपल्यासाठी चांगले होईल. प्रभू येशूने आपल्याला त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्याच्या नावाने पाठवले आहे, जसे तो पित्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पित्याच्या नावाने आला होता. आपल्याला येशूने त्याच्या नावाने पाठवलेले असल्यामुळे, येशूने आपल्यासाठी ठेवलेले उदाहरण आपण अनुसरले पाहिजे.

## पित्याच्या नावाने जगलेले जीवन

"आपल्या पित्याच्या नावाने" "एजेन्सी पाठविण्याचा" मात्र दावा करण्यापेक्षा हे फार अधिक होते. पृथ्वीवरील येशूच्या जीवनाची प्रत्येक गोष्ट या तथ्याशी संबंधित होती की तो येथे पित्याच्या नावात आहे.

येशूने आपले जीवन अगदी अशाच प्रकारे घालविले "आपल्या पित्याच्या नावात" आलेल्या एखाद्या व्यक्तीप्रमाणेः

**येशू पित्याच्या अंतःकरणात राहत होता, पित्यासोबत अगदी सलगीच्या सहभागित्वात चालत होता आणि त्याने पित्यास प्रगट केले (योहान 1:18).** *"...जसा पिता मला ओळखतो व मी पित्याला ओळखतो..."* (योहान 10:15).

**येशू पित्यासोबत पूर्ण ऐक्यात चालला म्हणून** तो म्हणू शकला:

*"मी आणि पिता एक आहोत"* (योहान 10:30). *"मी कोण आहे हे तुम्ही ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले असते..."* (योहान 14:7). *"ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले..."* (योहान 14:9).

**त्याला पित्याच्या प्रीतीची जाणीव होती आणि त्याच्या प्रीत्यर्थ तो पित्याच्या प्रेमात विसावला होता.** *"पिता पुत्रावर प्रीती करतो"* (योहान 3:35). *"कारण पिता पुत्रावर प्रीती करतो आणि स्वतः जे काही करतो ते सर्व त्याला दाखवतो. तुम्हांला आश्चर्य वाटावे म्हणून तो ह्यांहून मोठी कामे त्याला दाखवील"* (योहान 5:20). योहान 10:17 पाहा.

**पित्यासोबत त्याचे नाते कबूल करण्याची त्याला भिती नव्हती,** जरी त्याचा अर्थ हा होता की त्यामुळे त्याला आपला प्राण द्यावा लागेल (योहान 5:18).

**त्याने ओळखले की जर लोक त्याचा अनादर करीत आहेत अथवा त्याच्या अव्हेर करीत आहे, तर ते त्याला पाठविणाऱ्या पित्याचा अव्हेर करीत आहेत त्याचा अनादर करीत आहेत (योहान 5:23)**. *"जो माझा द्वेष करतो तो माझ्या पित्याचाही द्वेष करतो"* (योहान 15:23).

**पित्याची इच्छा आणि पित्याची कामे करण्याद्वारे त्याला चालना मिळाली, ऊर्जा मिळाली आणि त्याद्वारे तो त्यात स्थिर राहिला.** *"ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे व त्याचे कार्य सिद्धीस न्यावे हेच माझे अन्न आहे"* (योहान 4:34). *"मला स्वतः होऊन काही करता येत नाही ...मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करायला पाहतो"* (योहान 5:30). *"जसे जिवंत पित्याने मला पाठवले आणि जसा पित्यामुळे मी जगतो, तसे जो मला खातो तोही माझ्यामुळे जगेल"* (योहान 6:57). *"जे काम तू मला*

*करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे"* (योहान 17:4).

**त्याने पित्याची कामे केली.** पिता जे करीत होता ते करावयासाठी आणि पाहावयासाठी तो समर्पित होता (योहान 5:17,19).

**येशूला समजले होते की पित्याची कामे जो तो करीत होता, ती या तथ्याची साक्ष, प्रमाणिकरण होते की पित्याने त्याला पाठविले होते (योहान 5:36). त्याच्या जीवनावर पित्याच्या पसंतीची मोहर आहे हा विश्वास त्याला होता (योहान 6:27).**

**जी कामे त्याने केली ती पित्यासोबत त्याच्या एकात्मतेची अभिव्यक्ती होती.** *"...त्या कृत्यांवर विश्वास ठेवा; अशासाठी की, माझ्यामध्ये पिता व पित्यामध्ये मी आहे हे तुम्ही ओळखून समजून घ्यावे"* (योहान 10:38). *"माझ्यामध्ये राहणारा पिता स्वतःची कार्ये करतो"* (योहान 14:10). *"मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना; नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना"* (योहान 14:11).

**येशू तेच बोलला जे पित्याने त्याला शिकविले होते:** *"मला पित्याने शिकवल्याप्रमाणे मी ह्या गोष्टी बोलतो"* (योहान 8:28). *"मी माझ्या पित्याजवळ जे पाहिले ते बोलतो"* (योहान 8:38). *"कारण मी आपल्या मनचे बोललो नाही, तर मी काय सांगावे व काय बोलावे ह्यांविषयी ज्या पित्याने मला पाठवले त्यानेच मला आज्ञा दिली आहे. ...म्हणून जे काही मी बोलतो ते पित्याने मला सांगितल्याप्रमाणे बोलतो"* (योहान 12:49,50). *"...ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही..."* (योहान 14:10). *"...जे वचन तुम्ही ऐकता ते माझे नव्हे, तर ज्या पित्याने मला पाठवले त्याचे आहे"* (योहान 14:24).

**जेव्हा त्याने प्रार्थना केली तेव्हा त्याला पूर्ण विश्वास होता की पित्याने त्याचे ऐकले आहे.** लाजराच्या कबरापुढे उभे राहून येशूने म्हटले: *"पित्या, तू माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानतो"* (योहान 11:41).

**त्याला माहीत होते की तो *"ज्याला पित्याने पवित्र कार्यास्तव नेमून जगात पाठविले..."* तो आहे (योहान 10:36).**

**तो या आश्वासनासोबत चालत होता की *"पिता मला जे देतो ते सर्व माझ्याकडे येईल"* (योहान 6:37).** जे लोक त्याच्याजवळ येण्यासाठी नेमलेले होते ते त्याच्याजवळ येतील. त्याला हे देखील माहीत होते की ते पित्याच्या हाती सुरक्षित होते. *"पित्याने ज्याने मला त्यांस दिले, तो सर्वाहून मोठा आहे; आणि पित्याच्या हातून ते कोणी हिसकून घेऊ शकत नाही"* (योहान 10:29).

**येशूजवळ आश्वासन आणि हा विश्वास होता की पिता सर्व वेळ त्याच्यासोबत आहे:** *"मी एकटा नाही, तर मी आहे व ज्याने मला पाठविले तो ही आहे"* (योहान 8:16). *"ज्याने मला पाठविले तो माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडिले नाही..."* (योहान 8:29). *"...तुमची दाणादाण होऊन तुम्ही सर्व आपापल्या घरी जाल व मला एकटे सोडाल; तरी मी ऐकटा नाही कारण पिता माझ्याबरोबर आहे"* (योहान 16:32).

**येशू नेहमी असे जीवन जगला जे पित्यास प्रसन्न करणारे होते** *"...जे त्याला आवडते ते सर्वदा मी करतो"* (योहान 8:29). तो पित्याच्या आधीन राहिला. *"...पित्या माझ्यापेक्षा थोर आहे"* (योहान 14:28). *"मी पित्यावर प्रीती करितो आणि पित्याने जशी मला आज्ञा दिली तसे करितो"* (योहान 14:31). *"मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतीत राहतो"* (योहान 15:10).

**येशू आपल्या पित्याचे गौरव करण्यासाठी जगला.** त्याने प्रार्थना केली *“हे बापा, आपल्या नावाचे गौरव कर”* (योहान 12:28). *“मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे”* (योहान 17:4).

## तुझे नाव प्रगट केले आणि घोषित केले

योहान 17 मध्ये पित्यास उद्देशून केलेल्या त्याच्या प्रार्थनेत, येशूने पित्याच्या नावाचा उपयोग केल्याचा उल्लेख केला. या विधानांवरून आपण काही अंतर्ज्ञान प्राप्त करू शकतो.

**योहान 17:6,26**

**6 “जे लोक तू मला जगातून दिलेस त्यांना मी तुझे नाव प्रकट केले; ते तुझे होते आणि तू ते मला दिलेस; आणि त्यांनी तुझे वचन पाळले आहे.**

**26 मी तुझे नाव त्यांना कळवले आहे आणि कळवीन; ह्यासाठी की, जी प्रीती तू माझ्यावर केलीस ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे.”**

**योहान 17:6,26 (टीपीटी)**

**6 “पित्या, तू खरोखर कोण आहेस ते मी प्रगट केले आहे आणि जे स्त्री आणि पुरुष तू मला दिलेस त्यांना मी तुला प्रगट केले आहे; ते तुझे होते आणि तू ते मला दिलेस; आणि मी तुझे वचन त्यांच्या हृदयात दृढ केले आहे.**

**26 तू कोण आहेस हे मी त्यांना प्रगट केले आहे आणि मी तुला त्यांस आणखी वास्तविक करेन, यासाठी की, जी प्रीती तू माझ्यावर केलीस ती अमर्याद प्रीती त्यांनीसुद्धा अनुभव करावी, कारण आता तुझी प्रीती त्यांच्यामध्ये असेल, जसा मी त्यांच्यामध्ये आहे!”**

न्यू किंग जेम्स आवृत्तीमध्ये येशूच्या विधानाचे यथातथ्य भाषांतर दिलेले आहेत, *“मी तुझे नाव प्रगट केले आहे,”* द पॅशन भाषांतरात (टी.पी.टी.) त्या विधानाचा अर्थ दिलेला आहे: *“तू खरोखर कोण आहेस ते मी प्रगट केले आहे आणि ती तुला प्रगट केले आहे.”* यावरून हे स्पष्ट होते की पित्याच्या नावाने येण्याचे, बोलण्याचे आणि कार्य करण्याचे येशूचे उद्दिष्ट पिता खरोखर कोण आहे ते प्रगट करणे आणि दाखवून देणे होते. तसेच, येशूच्या नावात जाण्याचे आमचे उद्दिष्ट लोकांस हे दाखविणे आणि प्रगट करणे आहे की येशू खरोखर कोण आहे.

पित्याच्या नावाने येण्याचे, बोलण्याचे आणि कार्य करण्याचे
येशूचे उद्दिष्ट पिता खरोखर कोण आहे ते प्रगट करणे
आणि दाखवून देणे होते.
तसेच, येशूच्या नावात जाण्याचे आमचे उद्दिष्ट लोकांस हे दाखविणे
आणि प्रगट करणे आहे की येशू खरोखर कोण आहे.

## तुझ्या नावात मी त्यांना राखले

**योहान 17:11,12**

**[11] ह्यापुढे मी जगात नाही, पण ते जगात आहेत आणि मी तुझ्याकडे येत आहे. हे पवित्र पित्या, तू मला दिलेल्या तुझ्या नावात त्यांना राख, ह्यासाठी की, जसे आपण एक आहोत तसे त्यांनी एक व्हावे.**

**[12] जोपर्यंत मी जगात त्यांच्याबरोबर होतो तोपर्यंत तू मला दिलेल्या तुझ्या नावात मी त्यांना राखले; मी त्यांचा सांभाळ केला, आणि नाशाच्या पुत्राशिवाय त्यांच्यातून कोणाचा नाश झाला नाही; शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून असे झाले.**

येशू वचन 11 आणि 12 मधील त्याच “राख” (ग्रीक *‘टेरेओ’*) शब्दाचा उपयोग करतो ज्याचा अर्थ “आहे रक्षण करणे, रखवाली करणे, नजर ठेवणे.” येशू शारीरिक रूपात शिष्यांसोबत होता, तेव्हा पित्याच्या नावात, पित्याच्या अधिकाराद्वारे, येशूने त्याला देण्यात आलेल्या लोकांस आध्यात्मिक संरक्षण पुरविले. आणि आता त्याला माहीत होते की त्याची जाण्याची वेळ निकट आहे, तेव्हा त्याने तेच आध्यात्मिक संरक्षण मागितले, जे पित्याच्या नावात उपलब्ध होते की त्याने त्याच्या शिष्यांचे संरक्षण आणि रक्षण करीत राहावे. यावरून आम्हास हे शिकावयास मिळते की आपण येशूच्या नावात त्या लोकांस आध्यात्मिक संरक्षण देऊ शकतो ज्यांची आम्ही काळजी घेतो आणि जे आमच्या हाती सोपविण्यात आले आहेत.

# पित्यासोबत पूर्ण ऐक्यात जगलेले जीवन

**योहान 20:21**

**येशू पुन्हा त्यांना म्हणाला, "तुम्हांला शांती असो. जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवतो."**

येशूने पित्याच्या नावाने कसे कार्य केले याचे निरीक्षण करताना, शिष्य या नात्याने येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा काय अर्थ होतो याविषयी आपल्याला बरीच माहिती मिळते. आपल्यासाठी "येशूच्या नावाने" म्हणणे हे आपण वापरलेल्या वाक्यांशापेक्षा अधिक आहे. "येशूच्या नावाने" असे म्हणण्याचा आम्हाला जो अर्थ लागू होतो तसाच येशूला "माझ्या पित्याच्या नावाने" म्हणण्याचा अर्थ लागू होतो. त्यात सर्वकाही आहे. तो पित्याच्या नावाने  येथे होता या वस्तुस्थितीपासून पृथ्वीवरील सर्व जीवन प्रवाहित होत होते. पित्याशी पूर्ण एकात्मतेने जगलेले ते जीवन होते.

आम्ही *"मी आपल्या पित्याच्या नावात आलो आहे"* हे येशूचे विधान पित्यासोबत त्याच्या वैय्यक्तिक जीवनापासून वेगळे करू शकत नाही. तो पित्याच्या नावात आला या तथ्याचा हा देखील अर्थ आहे की तो पित्यासोबत एका विशिष्ट पद्धतीने चालला – पित्यासोबत पूर्ण ऐक्याने चालला. त्याचप्रमाणे, आम्ही सुद्धा स्वतः प्रभू येशू ख्रिस्तासोबत आपल्या वैय्यक्तिक जीवनास येशूच्या नावाच्या आमच्या उपयोगापासून वेगळे करता कामा नये. आम्ही येशूठायी आहोत आणि तो आमच्याठायी आहे. येशूसोबत ही एकात्मता आणि दररोज आम्ही ते कसे जगतो हे येशूच्या नावाच्या आमच्या उपयोगासाठी महत्वाचे ठरते.

येशू पित्यासोबत पृथ्वीवर ज्या ऐक्याने जीवन जगला, तो या गोष्टीचा आदर्श आहे की आम्ही येशूसोबत ऐक्याने आपले जीवन कसे जगण्याची गरज आहे. *"जसे जिवंत पित्याने मला पाठवले आणि जसा पित्यामुळे मी जगतो, तसे जो मला खातो तोही माझ्यामुळे जगेल"* (योहान 6:57) *"त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या*

*पित्यामध्ये आहे, व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे"* (योहान 14:20). *"मी त्याच्या ठायी राहतो, असे म्हणणाऱ्याने तो जसा चालला तसे स्वतःही चालले पाहिजे"* (1 योहान 2:6).

विश्वासणाऱ्यांद्वारे येशूच्या नावाचा उपयोग आम्हास प्रभू येशूद्वारे प्रतिनिधी म्हणून दिलेल्या अधिकाराची अभिव्यक्ती आहे, त्याचवेळी ती या पलीकडे आहे. तिचा संबंध आम्ही कोण आहोत, आम्ही आपले जीवन कसे जगतो, आम्ही काय म्हणतो आणि करतो याच्याशी आहे. हे असे जीवन आहे जे येशूसोबत पूर्ण ऐक्याने जगले जाते. ते प्रत्येक बाबतीत, सर्व बाबतीत, सर्ववेळी येशूचे प्रतिनिधित्व करणे होय.

येशू पित्याच्या नावाने आला.
त्याने आम्हाला त्याच्या नावाने पाठवले आहे.
जसा येशू पित्यासोबत एकात्मतेत चालला होता तसे
आपण त्याच्या नावाच्या उपयोगाद्वारे येशूसोबत
एकात्मतेने चालले पाहिजे
आम्ही पूर्णपणे येशूचे प्रतिनिधित्व करू.

## चिंतन

1) येशूने जेव्हा *"मी माझ्या पित्याच्या नावाने आलो आहे"* असे म्हटले तेव्हा त्याचा काय अर्थ होतो याचे पुनरावलोकन करा. खालील बाबतीत याचा अर्थ काय होतो:

- त्याच्या अधिकाराचे स्रोत – पित्याने मला अधिकार दिला आहे,
- त्याच्या कार्याचे उद्दिष्ट – पित्याला प्रकट करणे आणि गौरव करणे,

- त्याच्या दैनंदिन जीवनाचे संरेखन – पित्याशी पूर्ण एकात्मतेने जगणे, आणि
- सेवेचा दृष्टीकोन – पिता जे बोलतो ते बोला, पिता जे करतो ते करा.

जेव्हा आपण "येशूच्या नावाने" बाहेर जातो तेव्हा आपण त्याचे अनुकरण कसे करू शकतो?

# 5
# येशूच्या नावाचा योग्य उपयोग

यापूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे प्रभू येशूने आपल्या 12 प्रेषितांस आणि नंतर 70 शिष्यास त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि त्याच्या नावाचा उपयोग करून ज्याचा प्रचार तो करणार होता त्याचा प्रचार करण्यासाठी आणि तो जे करणार होता ते करण्यासाठी बाहेर पाठविले – अर्थात रोग बरे करण्यासाठी, मुक्ती देण्यासाठी आणि अद्‌भुत कृत्ये करण्यासाठी. म्हणून हे लोक मोठमोठी कामे करीत नासरेथकर येशू ख्रिस्ताच्या नावात बाहेर गेले.

## सुरुवातीचे शिष्य

येशूने 12 प्रेषितांना जाऊन तो करीत असलेले काम करण्याची आज्ञा दिल्याची आमच्या शुभवर्तमानात नोंद आहे.

**मत्तय 10:1,7,8 (मार्क 6:7,12,13 भी देखें)**

**1 तेव्हा त्याने आपल्या बारा शिष्यांना जवळ बोलावून त्यांना अशुद्ध आत्म्यांवर सत्ता देऊन ते काढून टाकण्याचा व सर्व विकार व सर्व दुखणी बरी करण्याचा अधिकार दिला.**

**7 जात असताना अशी घोषणा करत जा की, 'स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.'**

**8 रोग्यांना बरे करा, मेलेल्यांना उठवा, कुष्ठरोग्यांना शुद्ध करा, भुते काढा. तुम्हांला फुकट मिळाले, फुकट द्या.**

**लूक 9:1,2,6,10**

**1 मग त्याने बारा प्रेषितांना एकत्र बोलावून त्यांना सर्व भुते काढण्याचे व रोग बरे करण्याचे सामर्थ्य व अधिकार दिला;**

**2 आणि त्याने त्यांना देवाच्या राज्याची घोषणा करण्यास व रोग्यांना बरे करण्यास पाठवले.**

**6 मग ते निघून सर्वत्र सुवार्ता सांगत व रोग बरे करत गावोगावी फिरू लागले.**

**10 नंतर प्रेषितांनी परत येऊन आपण जे जे केले होते ते ते त्याला सविस्तर सांगितले; तेव्हा तो त्यांना बरोबर घेऊन बेथसैदा नावाच्या गावाकडे एकान्त स्थळी गेला.**

येशूने त्याच्या 12 प्रेषितांना त्याचे नाव कसे वापरावे हे स्पष्टपणे शिकवल्याची नोंद आपल्याकडे नसली तरी ते त्याच्या नावाचा उपयोग करून बाहेर पडले हे आपल्याला माहीत आहे. लूकच्या 9 व्या अध्यायात, प्रेषितांना पाठवल्यानंतर लगेचच, आमच्याकडे खालील माहिती नोंदलेली आहे:

**लूक 9:49,50**
**49 योहानाने म्हटले, “गुरूजी, आम्ही एका माणसाला तुमच्या नावाने भुते काढताना पाहिले; तेव्हा आम्ही त्याला मनाई केली, कारण तो आमच्याबरोबर तुम्हांला अनुसरत नाही.”**
**50 येशूने त्याला म्हटले, “त्याला मनाई करू नका; कारण जो तुम्हांला प्रतिकूल नाही तो तुम्हांला अनुकूल आहे.”**

त्यामुळे स्पष्टपणे 12 जणांचा भाग नसलेल्या आणखी एका व्यक्तीने जे घडत होते ते “समजून घेतले.” त्या व्यक्तीने येशूला पाहिले आणि ऐकले असावे, त्याने येशूवर मशीहा, देवाचा पुत्र म्हणून विश्वास ठेवला असावा आणि नंतर भुते काढण्यासाठी आणि अद्‌भुत कृत्ये करण्यासाठी येशूच्या नावाचा उपयोग करण्यासाठी पुढे गेला असावा (मार्क 9:38-40 देखील पाहा). म्हणून आम्हाला माहित आहे की प्रेषितांनी धैर्याने नासरेथच्या येशू ख्रिस्ताच्या नावाचा उपयोग करून त्याची कामे केली होती, तसेच इतर कोणीतरी तसे केले.

येशूने आणखी 70 अनुयायांची नियुक्ती केली आणि त्याने त्यांना 12 जणांप्रमाणेच काम दिले:

**लूक 10:1,9,17-19**
**1 ह्यानंतर प्रभूने आणखी बाहत्तर जणांना नेमून ज्या ज्या नगरात व ज्या ज्या ठिकाणी तो स्वत: जाणार होता तेथे दोघे-दोघे असे त्यांना आपल्यापुढे पाठवले.**

**[9] त्यात जे दुखणाईत असतील त्यांना बरे करा व त्यांना सांगा की, 'देवाचे राज्य तुमच्याजवळ आले आहे.'**
**[17] नंतर ते बाहत्तर1 जण आनंदाने परत येऊन म्हणाले, "प्रभूजी, आपल्या नावाने भुतेदेखील आम्हांला वश होतात."**
**[18] तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले.**
**[19] पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू ह्यांना तुडवण्याचा व शत्रूच्या सर्व शक्तीवरचा अधिकार दिला आहे, तुम्हांला काहीएक बाधणार नाही.**

यावरून हे अत्यंत स्पष्ट होते की हे प्रेषित आणि शिष्य येशूच्या नावात रोग बरे करण्याचा आणि मुक्तता देण्याचा प्रचार करीत होते आणि सामर्थ्यवान कृत्ये करीत होते. येशूच्या नावाचा उपयोग करण्याद्वारे दिसून येणाऱ्या परिणामांमुळे ते उत्साहित होते. *"प्रभूजी, आपल्या नावाने भुतेदेखील आम्हांला वश होतात."* (व.17) मग येशूने त्यांना त्याच्या नावाच्या उपयोगाद्वारे प्राप्त अधिकाराचा व्याप समजाविला. ज्या अधिकारात ते चालणार होते तो अधिकार *"शत्रूच्या सर्व शक्तींवरचा अधिकार होता."* आणि त्यांना शत्रू यशस्वीरित्या त्यांचा सूड घेईल याची भिती बाळगण्याची गरज नव्हती, कारण येशूने म्हटले, *"तुम्हांला काहीएक बाधणार नाही."*

येशूचे नाम सर्व दुरात्म्यांवर
आणि सैतानाच्या सर्व शक्तीवर आम्हास अधिकार देते.

## येशू सर्व विश्वासणाऱ्यांना त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार देतो

योहानाच्या शुभवर्तमानात लिहिले आहे की येशू आपल्या शिष्यांस त्याची कार्ये करण्याच्या आणि प्रार्थनेच्या संदर्भात त्याच्या नावाचा उपयोग करण्याविषयी शिकवित आहे. आम्ही येथे त्या वचनांचा उल्लेख करीत आहोत आणि नंतर सविस्तर त्यांच्यावर पुन्हा विचार करू.

**योहान 14:12-14**
**12 मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मी जी कृत्ये करतो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यांपेक्षा मोठी करील, कारण मी पित्याकडे जातो.**
**13 पुत्राच्या ठायी पित्याचा गौरव व्हावा म्हणून तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन.**
**14 तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन.**

**योहान 16:23,24**
**23 त्या दिवशी तुम्ही मला काही प्रश्न विचारणार नाहीत. मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, तुम्ही पित्याजवळ काही मागाल तर तो ते तुम्हांला माझ्या नावाने देईल.**
**24 तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे तुम्हांला मिळेल, ह्यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.**

कृपया खालील गोष्टींवर विचार करा.

योहान 14:12-14 मध्ये, संदर्भ हा आहे की सर्व विश्वासणारे ती कामे करतात जी येशू करीत होता आणि त्याच्या स्वर्गारोहणानंतर, ज्यानंतर त्याने सर्व विश्वासणाऱ्यांस सामर्थ्य देण्यासाठी पवित्र आत्मा दिला त्यानंतर, आणखी मोठी कामे करीत होते. योहान 16:23,24चा संदर्भ हा देखील आहे की *"त्या दिवशी"* पुनरुत्थानानंतरच्या समयाचा उल्लेख आहे, या समयात आम्ही आहोत.

म्हणून येशूने केलेली कामे आणि त्याहीपेक्षा मोठी कामे करण्यासाठी येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा हक्क प्रत्येक विश्वासणाऱ्यास देण्यात आला आहे. आमच्या विनंत्या थेट पित्याकडे नेण्यासाठी आणि आमच्या प्रार्थनांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार प्रत्येक विश्वासणाऱ्यास देण्यात आला आहे.

प्रभू येशूने त्याच्या नावाचा उपयोग करण्याचे इतर अनेक पैलू आपल्या शिष्यांना शिकविले. आम्ही पुढील प्रकरणांत त्यावर विचार करू.

महान आज्ञेत, त्याच्या पुनरुत्थानानंतर आपण पुन्हा एकदा पाहतो की सर्व विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार देण्यात आला.

**मार्क 16:17,18**
**17 आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील, नवनव्या भाषा बोलतील,**
**18 सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील."**

या आज्ञेत हे सत्य सामावलेले आहे की विश्वास करणारे सर्व लोक, सर्व विश्वासणारे, ते सर्वकाही करण्यासाठी येशूच्या नावाचा उपयोग करू शकतात जे येशूने केले. सर्व विश्वासणारे दुरात्म्यांचा सामना करू शकतात, त्यांच्याविरूद्ध अधिकाराचा उपयोग करून त्यांना काढू शकतात. जर त्यांना खतरनाक गोष्टी करण्याची परिस्थिती उद्भवली (उदाहरणार्थ, सापांस उचलणे, विषारी वस्तू पिणे, इत्यादी) तर त्यांस येशूच्या नावात काहीही इजा होणार नाही. ते येशूच्या नावात रोग्यांस बरे करतील.

## सर्व विश्वासणाऱ्यांस देण्यात आलेले अधिकारपत्र

आजच्या भाषेत आपण म्हणू की येशूने आम्हाला "अधिकारपत्र (पावर ऑफ अटर्नी)" दिले आहे, जे म्हणजे त्याने सांगितलेला हेतू पूर्ण करण्यासाठी त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार आहे.

कायद्याच्या तपशीलात न जाता, सरळ सांगायचे झाल्यास, पावर ऑफ अटर्नी किंवा अधिकारपत्र

(अ) त्या नावामागे असलेल्या व्यक्तीवर अवलंबून असतो – त्यांच्याशी संबंधित असलेल्या बाबींत आपण त्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करीत आहा,

(ब) उपयोगाच्या व्याप्तीवर अवलंबून असतो – आपण अमुक अमुक

गोष्टी करण्यासाठी त्याचा उपयोग करू शकतो, आणि कालावधी ज्यात ते अधिकारपत्र कामी येईल.

येशूने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा विशेष अधिकार आणि हक्क दिलेला आहे. तो त्याच्या नावामागे आहे. ज्याने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार किंवा हक्क दिलेला आहे त्या व्यक्तीची थोरवी जाणून घेण्यास आम्ही वेळ दिला पाहिजे. कदाचित आमची अंतःकरणे व मने कधीही पूर्णपणे समजू शकणार नाहीत, आमचे शब्द त्या थोर अधिकाराचे जो त्याने आम्हास दिला आहे, वर्णन करण्यास अपूरे पडतील, अर्थात येशूने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा दिलेला अधिकार.

आम्ही येथे येशूचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, त्यास प्रगट करण्यासाठी, त्याचे राज्य वाढविण्यासाठी, त्याच्या मंडळीची उभारणी करण्यासाठी, लोकांची सेवा करण्यासाठी, पित्याचे गौरव करण्यासाठी आणि त्याच्या नावात त्याची कामे करण्यासाठी आहोत. त्याने आम्हास त्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिला आहे.

आम्ही पवित्र शास्त्रात जाणतो की मंडळी, पवित्र लोक, या सांप्रत युगात (ज्याला “चर्च युग” म्हटले जाते) आणि सहस्त्राब्धीकाळात (येशूच्या 1000 वर्षांचा राज्यात) येशूचे प्रतिनिधित्व करील. म्हणून आमचे अधिकारपत्र लवकरच समाप्त होणार नाही!

येशूने प्रत्येक विश्वासणाऱ्याला, लहानापासून तो मोठ्या प्रौढापर्यंत त्याच्या नावाचा उपयोग करण्याचे अधिकारपत्र, विशेषाधिकार, आणि अधिकार दिलेला आहे. आमच्यापैकी प्रत्येक जण त्या सामर्थ्यात आणि अधिकारात चालू शकतो ज्याचे प्रतिनिधित्व त्याचे नाव करते. आमच्याजवळ कसा उत्तम विशेषाधिकार आहे! आमची अंतःकरणे हे समजून घेतील तर किती बरे होतील! चला आपण उठून येशूच्या

पराक्रमी नावात आम्हास लाभलेल्या अधिकारात आणि सामर्थ्यात चालू या!

येशूने प्रत्येक विश्वासणाऱ्याला,
लहानापासून तो मोठ्या प्रौढापर्यंत
त्याच्या नावाचा उपयोग करण्याचे अधिकारपत्र,
विशेषाधिकार, आणि अधिकार दिलेला आहे.

## चिंतन

1) या प्रकरणात दिलेल्या शास्त्रवचनांचा आढावा घ्या जे स्पष्टपणे दर्शवितात की प्रत्येक विश्वासणाऱ्यास येशूच्या नावाचा उपयोग करून पराक्रमाची कार्ये आणि प्रार्थना करण्याचा विशेष अधिकार देण्यात आला आहे.

2) जर विश्वासणाऱ्यांचे अधिकारपत्र अद्यापी अमलात आहे, तर असे म्हणणे योग्य आहे का की मंडळीसाठी अद्‌भुत कार्य करण्याचे दिवस प्रारंभिक मंडळीच्या शेवटीच समाप्त झाले (किंवा शेवटच्या प्रेषितास मृत्यू आला)? येशूने कोठेही असे दर्शविले आहे का की अधिकारपत्राची व्याप्ती पवित्र शास्त्राचे लेखन झाल्यानंतर बदलली?

# 6
# परमेश्वर पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात उपस्थित आहे

**योहान 14:16-18,26**

**16 मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; अशासाठी की, त्याने तुमच्याबरोबर सदासर्वदा राहावे.**

**17 जग त्याला ग्रहण करू शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही अथवा त्याला ओळखत नाही; तुम्ही त्याला ओळखता, कारण तो तुमच्याबरोबर राहतो व तो तुमच्यामध्ये वस्ती करील.**

**18 मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही, मी तुमच्याकडे येईन.**

**26 तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांला आठवण करून देईल.**

**योहान 14:26 (एम्प्लिफाईड बायबल, क्लासिक)**

**परन्तु सांत्वना देणारा (सल्ला देणारा, सहायक, मध्यस्थ, वकील, बल देणारा, पक्षास उभे राहणारा) पवित्र आत्मा, ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील (माझ्या जागी, माझे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि माझ्या वतीने कार्य करण्यासाठी), तो मला सर्व गोष्टी शिकवील. आणि मी सांगितलेल्या सर्व गोष्टींचे तुम्हाला स्मरण घडवून देईल (आठवण करून देईल).**

पवित्र आत्म्याचा उल्लेख करतांना, येशूने म्हटले की पवित्र आत्मा "दुसरा सहायक" (योहान 14:16) अथवा *'अँलोस पॅराक्लेटोस'* आहे. *'अँलोस'* या शब्दाचा अर्थ "एकाचा प्रकारचा दुसरा'' (**उदाहरणार्थ:** दोन सफरचंद), *'हेटेरॉस'* शब्दाच्या विरुद्ध जो "वेगळ्या प्रकारचा दुसरा आहे" (**उदाहरणार्थ:** सफरचंद आणि नारंगी). पवित्र आत्मा परमेश्वर आहे आणि त्रिएक परमेश्वरापैकी एक व्यक्ती आहे (1 योहान 5:7). पवित्र आत्मा पित्याचे आणि पुत्राचे पूर्ण प्रतिनिधित्व करतो, पवित्र

आत्मा अगदी येशूसारखा आहे, म्हणून, पवित्र आत्म्यास पाठवितांना येशूने म्हटले *"मी तुमच्याकडे येईन."* पवित्र आत्मा इतक्या पूर्णपणे येशूचे प्रतिनिधित्व करतो की पवित्र आत्म्यास *"ख्रिस्ताचा आत्मा"* (रोमकरांस पत्र 8:9; 1 पेत्र 1:11) आणि *"त्याच्या पुत्राचा आत्मा"* देखील म्हटले जाते (गलतीकरांस पत्र 4:6).

पवित्र आत्म्यास येशूच्या नावाने पाठविण्यात आले आहे. ॲम्लिफाईड बायबल, क्लासिक आवृत्ती *"आपल्या नावाने"* चा काय अर्थ आहे ते स्पष्ट करते. त्यात म्हटले आहे की *"माझ्या जागी, माझे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि माझ्या वतीने काम करण्यासाठी."* पवित्र आत्मा येथे येशूच्या जागी, त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि त्याच्या वतीने काम करण्यासाठी आहे. याचा अर्थ हा आहे की पवित्र आत्मा येशूला प्रगट करील, त्याच्याविषयी कळवील, आणि येशू जर स्वतः येथे असता तर तो ज्या गोष्टी बोलला असता आणि ज्या गोष्टी त्याने केल्या असत्या, त्या गोष्टी तो बोलेल आणि करील.

पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात आहे.
तो येथे येशूच्या जागी आहे,
तो त्याचे पूर्ण प्रतिनिधित्व करीत आहे
आणि त्याच्या वतीने कार्य करीत आहे.

**योहान 15:26,27**

**26 परंतु जो पित्यापासून निघतो, ज्याला मी पित्यापासून तुमच्याकडे पाठवीन तो कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो माझ्याविषयी साक्ष देईल;**
**27 आणि तुम्हीही साक्ष द्याल, कारण तुम्ही माझ्याबरोबर आरंभापासून आहात.**

पवित्र आत्मा येशूची साक्ष देतो, त्यास प्रमाणित करतो, त्याच्याविषयी बोलतो आणि त्याला प्रगट करतो. आणि आम्हालाही

येशूची साक्ष देण्याचे, त्यास प्रमाणित करण्याचे, त्याच्याविषयी बोलण्याचे आणि त्याला प्रगट करण्याचे काम देण्यात आले आहे.

**योहान 16:14**
**तो माझा गौरव करील; कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला कळवील.**

पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात आहे आणि म्हणून अशाप्रकारे बोलतो आणि कार्य करतो ज्याद्वारे येशूचे गौरव होते. आणि हे आमचे कामसुद्धा आहे, जगात येशूचे गौरव करणे.

लक्षात ठेवावयाचे महत्वाचे सत्य हे आहे की पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांद्वारे कार्य करतो. म्हणून त्याच्या क्षमतेत येशूच्या नावाने येऊन पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांसोबत सहकार्य करून आपले कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

ज्याप्रमाणे पवित्र आत्मा येशूच्या नावाने आला आहे, त्याचप्रमाणे आपल्यालाही येशूच्या नावाने पाठवले गेले आहे. म्हणून जेव्हा आपण "येशूच्या नावाने" म्हणतो तेव्हा आपण एकटे उभे राहत नाही. जेव्हा आपण येशूच्या नावाने बोलतो आणि कार्य करतो तेव्हा परमेश्वराचा आत्मा आपल्याबरोबर असतो. आपण येशूच्या नावाने करतो त्या प्रत्येक गोष्टीत तो आपल्यासोबत असतो. येशूच्या नावाने कार्य करणाऱ्या विश्वासणाऱ्यास ही खात्री करून देता येते की परमेश्वराचा आत्मा त्याच्यासोबत आहे. परमेश्वराचा आत्मा आमच्यामध्ये आणि आमच्याद्वारे अशाप्रकारे कार्य करील ज्याद्वारे येशूचे गौरव व्हावे आणि येशूला पूर्णपणे प्रगट करावे. देवाचा आत्मा येशूचे गौरव करण्यासाठी आणि आपल्याद्वारे येशूला पूर्णपणे प्रकट करण्यासाठी, अशा प्रकारे आपल्यामध्ये आणि त्याच्याद्वारे कार्य करेल. खरे म्हणजे आपण खात्री बाळगू शकतो की हे करण्यास तो आपल्यापेक्षा अधिक उत्सुक आहे! आम्ही येथे येशूच्या नावाने पवित्र आत्म्यासह एकत्र आहोत!

जसे प्रेषितांनी म्हटले: *“ह्या गोष्टींविषयी आम्ही साक्षी आहोत आणि देवाने आपल्या आज्ञा पाळणाऱ्यांना जो पवित्र आत्मा दिला आहे तोही साक्षी आहे”* (प्रेषितांची कृत्ये 5:32).

## चिंतन

1) पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात आहे. विश्वासणाऱ्यांस येशूच्या नावात पाठविण्यात आले आहे. विश्वासणाऱ्यांसाठी या सर्व गोष्टींचा विचार करा. याच्या प्रकाशात, आपण पवित्र आत्म्याच्या व्यक्तीशी आपली प्रतिबद्धता, आपला संवाद आणि सहकार्य कसे बदलले पाहिजे?

# 7
# जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो तेव्हा काय होते

ऱ्या जेव्हा आपण घोषित करतो की आपण येशूच्या नावाने काहीतरी बोलत आहोत किंवा करीत आहोत, तेव्हा आपण नेमके काय करीत आहोत? उदाहरणार्थ, जर आपण एखाद्या आजारी व्यक्तीवर हात ठेवला किंवा एखाद्या आजारी व्यक्तीची सेवा इतर कोणत्याही प्रकारे, येशूच्या नावाने केली, तर आपण नेमके काय करीत आहोत? जेव्हा आपण भुतांना येशूच्या नावाने निघून जाण्याची आज्ञा देतो तेव्हा ते आध्यात्मिक क्षेत्रात नेमके काय सूचित करते? जेव्हा आपण येशूच्या नावाने वादळ (ही परिस्थिती असू शकते) किंवा डोंगराशी (हा एक अडथळा, आव्हान असू शकते) बोलतो तेव्हा आपण काय अपेक्षा करावी? जेव्हा आपण प्रार्थना करतो, येशूच्या नावाने पित्याला काहीतरी करावे अशी विनंती करतो, तेव्हा पिता ही विनंती त्याच्यासमोर कशी ठेवल्यासारखे पाहतो? आध्यात्मिक क्षेत्रात, जेव्हा आपण विश्वासणारे म्हणून, येशूच्या नावाचा उपयोग करतो तेव्हा कोणते सामर्थी कार्य अमलात येते?

जेव्हा आम्ही विश्वासणारे म्हणून येशूचे नाव वापरतो तेव्हा आम्ही येशूने आम्हाला दिलेल्या मुखत्यारपत्राचा अर्थात अधिकारपत्राचा उपयोग करीत असतो. आम्ही असे काहीतरी करीत आहोत ज्यासाठी आम्हाला प्रभू येशूने अधिकार दिला आहे. वाहतूक पोलिसाचा विचार करा. रस्त्यावर वाहनांची गर्दी होऊ शकते. पण जेव्हा त्याच्या वाहतूक पोलिसाच्या गणवेशातील माणूस हात वर करून “थांबा” असे सूचित करतो तेव्हा सर्व वाहने थांबतात. शारीरिकदृष्ट्या, त्याला वाहने

थांबवणे अशक्य होईल. परंतु त्याला स्थानिक सरकारने अधिकार दिला आहे आणि तो त्याच्या गणवेशात त्याच्या अधिकाराचा वापर करीत असल्यामुळे (त्याला जे करण्यास अधिकृत केले आहे ते करीत आहे), वाहनचालक त्याचा अधिकार ओळखतात आणि त्यांची वाहने थांबवतात. तुलनात्मकदृष्ट्या, आपण असे म्हणू शकतो की जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो, आध्यात्मिकरित्या, आपण आपल्या गणवेशात, आपल्या स्वर्गीय अधिकृततेमध्ये पाऊल ठेवतो आणि आध्यात्मिक क्षेत्र आम्हास समजते आणि आम्हास प्रतिसाद देते असे फर्मान जारी करतो.

जेव्हा आपण “येशूच्या नावाने” म्हणतो तेव्हा आपण धैर्याने सूचित करतो की आपण जे करीत आहोत ते आपण येशूचे प्रतिनिधी म्हणून, त्याच्या जागी, त्याच्या वतीने करीत आहोत, येशू जर येथे उपस्थित असता तर त्याच्या सर्व अधिकाराने आणि सामर्थ्याने आम्हास पाठिंबा देत त्याने जे केले असते ते करीत.

जेव्हा आपण “येशूच्या नावाने” म्हणतो
तेव्हा आपण धैर्याने सूचित करतो की आपण जे करीत आहोत
ते आपण येशूचे प्रतिनिधी म्हणून, त्याच्या जागी,
त्याच्या वतीने करीत आहोत,
येशू जर येथे उपस्थित असता तर त्याच्या
सर्व अधिकाराने आणि सामर्थ्याने
आम्हास पाठिंबा देत त्याने जे केले असते ते करीत.

त्याचे नाव त्याला तेथे घेऊन येते. येशू आता तेथे आहे. तो येशू त्याच्या नावात आहे. त्याच्या नावात, तो उपस्थित आहे (मत्तय 18:20). आता ते असे आहे जणू काही ज्याच्यावर आम्ही हात ठेवीत आहोत त्या

आजारी व्यक्तीवर तो हात ठेवीत आहे. जणू काही येशू त्या आज्ञा देत होता ज्या आपण त्याच्या नावात देत आहोत. येशू आमच्याद्वारे कार्य करीत आहे. तो जे काही आहे, ते त्या परिस्थितीत लागू होत आहे.

त्याचे नाव स्वर्गाचा सर्व अधिकार त्या परिस्थितीत आणते. त्याच्या नावामागे जे राजपद आहे, राज्याचे सामर्थ्य, प्रभुत्व आणि अधिकार जे त्याच्या नावाच्या मागे आहे, आता त्या परिस्थितीवर लागू आहे. आता काहीही अशक्य नाही. सर्व अधिकार त्याच्या नावात आहे. जेव्हा आम्ही रोगाविरुद्ध येशूच्या नावाचा उपयोग करतो, तेव्हा रोगास काहीही अधिकार राहत नाही. जेव्हा आपण दुरात्म्यांच्या शक्तीविरुद्ध येशूच्या नावाचा उपयोग करतो, तेव्हा दुरात्म्यांजवळ कुठलाही अधिकार राहत नाही. त्या नावाविरुद्ध ते निर्बळ ठरतात. येशूच्या नावात राज्याची सत्ता त्या परिस्थितीत लागू केली जाते.

त्याच्या नावात त्याचे सामर्थ्य उपस्थित आहे (1 करिंथ 5:4). जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो, तेव्हा पवित्र आत्मा, ख्रिस्ताचा आत्मा, ज्याला त्याच्या नावात पाठविण्यात आले आहे, येथे उपस्थित आहे. सर्वसमर्थ परमेश्वराचे सामर्थ्य मुक्त होते. आत्म्याचे सामर्थ्य आज्ञेच्या त्या वचनांसोबत मुक्त केले जाते जे आम्ही येशूच्या नावात जारी केले आहे.

जेव्हा आम्ही येशूच्या नावात प्रार्थना करतो, आम्ही त्याच्या जागी, त्याच्या वतीने उभे आहोत, आणि पित्यास विनंती करतो. जणू काही येशू स्वतः ते निवेदन करीत होता. हे दुसऱ्या पद्धतीने होऊ शकत नाही. आता आमच्या प्रार्थनेत आमच्या नावासोबत त्याचे नाव देखील आहे. येशूच्या नावात प्रार्थना करणे आणि हे अपेक्षा करणे की त्यात त्याचे नाव नसावे हे निरर्थक आहे! जेव्हा आम्ही आमच्या प्रार्थनेत येशूच्या नावाचा उल्लेख करतो, तेव्हा आम्ही हे व्यक्त केले आहे की आम्ही येशूचे प्रतिनिधी म्हणून, त्याच्या जागी, त्याच्या वतीने ही प्रार्थना करीत

आहोत, येशू जर त्याच्या सर्व सामर्थ्यानिशी आणि अधिकारानिशी आम्हास पाठिंबा देण्यासाठी उभा असता, तर त्याने जे मागितले असते ते मागण्यासाठी!

## त्याचे योग्यप्रकारे प्रतिनिधित्व करणे

त्याच्या नावात आम्ही ते बोलण्यासाठी आणि करण्यासाठी त्याचे प्रतिनिधित्व करतो जे तो बोलला असता आणि जे ज्याने केले असते. म्हणून हे महत्वाचे आहे की येशू जे बोलला असता आणि त्याने जे केले असते ते बोलण्याद्वारे आणि करण्याद्वारे आम्ही त्याचे योग्य प्रतिनिधित्व करतो.

म्हणून हे जाणणे महत्वाचे आहे की कोणत्या परिस्थितीत येशू काय म्हणेल अथवा करेल. आम्ही आपल्या बुद्धीचे नवीकरण केले पाहिजे, अर्थात आमच्या विचाराचे येशूसमान विचार करण्यासाठी जसे आम्ही त्याला शुभवर्तमानात पाहतो. उदाहरणार्थ, येथे काही गोष्टी आहेत ज्या स्पष्ट करतात की येशू कसा विचार करीत असे, कसा बोलत असे आणि कसा चालत असे, जसे शुभवर्तमानांत दिसून येते.

अशा वादळात जेव्हा त्यांचे तारू बुडण्याच्या स्थितीत होते, येशू शांत होता. जेव्हा तो जागे झाला, तेव्हा त्याने वादळास तोंड दिले, वाऱ्यास आणि लाटांस आज्ञा दिली की त्यांनी शांत व्हावे.

जेव्हा परिस्थिती वाईटापासून अतिशय वाईट होऊ लागते, जसे याईराच्या मुलीच्या बाबतीत घडले, येशू याईराच्या घरी जाण्याच्या मार्गावर असतांना ती मेली, तेव्हा येशू फक्त म्हणाला, *“भिऊ नकोस, फक्त विश्वास मात्र धर.”* आणि ती मुलगी जिवंत झाली.

जेव्हा पाच हजारांपेक्षा जास्त स्त्री, पुरुष आणि मुलांच्या बाबतीत त्याच्यापुढे गरज उभी ठाकली, तेव्हा येशूने त्याच्या शिष्यांस त्यांना काहीतरी खावयास द्यावे असे सांगितले. ही एक स्वाभाविक अशक्यता

होती, आणि तरीही त्याने पुढे वाढून प्रार्थना केली, लहान मुलाच्या डब्यातील पाच भाकरी आणि दोन मासे वाढविले आणि त्यांचे वाटप केले.

जेव्हा त्याची भेट अशा व्यक्तीशी झाली ज्याने येशूच्या शिष्यांसोबत आध्यात्मिक अपयशाचा अनुभव घेतला होता, जे त्याच्या मुलातून भूत घालवू शकले नाही, त्याला येशूने म्हटले, *"विश्वास बाळगणाऱ्याला सर्वकाही शक्य आहे"* (मार्क 9:23).

लाजर मेला आणि तो चार दिवसांपासून कबरेत पडला होता, अशा निराशाजनक परिस्थितीला तोंड देत असतांना, येशूने म्हटले, *"तू विश्वास ठेवशील तर देवाचा गौरव पाहशील"* (योहान 11:40).

हे ख्रिस्ताचे मन आहे. हा येशूचा दृष्टीकोन आहे. येशूने अशाप्रकारे कार्य केले आणि परिस्थितींस प्रतिसाद दिला. पित्याकडून त्याने हेच पाहिले आणि ऐकले.

## पवित्र आत्म्याचे ऐका

**योहान 16:13-15**

**13 तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल; कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही; तर जे काही ऐकेल, तेच सांगेल; आणि होणाऱ्यां गोष्टी तुम्हांला कळवील.**

**14 तो माझा गौरव करील; कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला कळवील.**

**15 जे काही पित्याचे आहे ते सर्व माझे आहे; म्हणून मी म्हणालो की, जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला कळवील.**

पवित्र आत्मा येथे येशूच्या नावात आहे. तो आमच्यामध्ये आहे. तो सर्व सत्याकडे आमचे मार्गदर्शन करतो. येशू जे म्हणत आहे ते घेऊन तो आमच्याशी बोलतो. म्हणून, आम्ही येशूचे योग्य प्रतिनिधित्व करावे, म्हणून आपण परमेश्वराच्या आत्म्याचे ऐकावयास शिकले पाहिजे. तो

आम्हास ख्रिस्ताची बुद्धी प्रगट करतो (1 करिंथ 2:9-16) जेणेकरून आम्ही जाणू की काय बोलावे आणि काय करावे यासाठी की आम्हास येशूचे योग्य प्रतिनिधित्व करता येईल.

## चिंतन

1) जेव्हा आम्ही "येशूच्या नावाने" प्रार्थना करतो, बोलतो, अथवा कार्य करतो, तेव्हा ज्या आत्मिक गोष्टी घडून येतात त्यावर मनन करा. हे प्रकटीकरण आपण ज्याप्रकारे प्रार्थना करता, वैय्यक्तिक जीवन परिस्थितींना तोंड देता, आणि ज्याप्रकारे गरजवंताची सेवा करता त्यात कसा बदल घडवून आणील?

2) ख्रिस्ताचे योग्य प्रतिनिधित्व करण्यासाठी, जेव्हा आम्ही त्याच्या नावाने प्रार्थना करतो, बोलतो, अथवा कार्य करतो, तेव्हा आम्हाला या गोष्टींद्वारे ख्रिस्ताचे मन जाणून घेण्याची गरज आहे

- शुभवर्तमानांत जवळून त्याचे निरीक्षण करण्याद्वारे आणि
- पवित्र आत्म्याचे ऐकण्याद्वारे.

या दोन्ही क्षेत्रांत स्वतःचे मूल्यमापन करा.

- शुभवर्तमानांत आमच्यासाठी लिहिल्याप्रमाणे वेगवेगळ्या परिस्थितींविषयी येशू कसा विचार करीत असे आणि त्यांस कसा प्रतिसाद देत असे याची उत्तम समज आपणास आहे काय?
- दैनंदिन जीवन परिस्थितींत पवित्र आत्म्यास विनंती करण्याबाबत, त्याचे ऐकण्याबाबत, आपणास सहज (निपुण) वाटते काय?

**“देवाचे मार्गदर्शन प्राप्त करणे,” “पवित्र आत्म्याची कृपादाने,” “अन्य भाषेत बोलण्याचे अद्‌भुत फायदे”** या पत्त्यावर विनामूल्य डाऊनलोड करून आपण ए.पी.सी. प्रकाशनाद्वारे उपलब्ध करण्यात आलेले हे पुस्तक आपण वाचू शकता: **apcwo.org/books**

# 8
# येशूच्या नावावर विश्वास ठेवा

येशूच्या नावाचा उपयोग करणे हे गुड लक म्हणजे सद्भाग्य आणणारे ताबिज नाही, “तिळा, तिळा दार उघड” या सारखे जादुचे शब्द किंवा मंत्र, विधी किंवा आध्यात्मिक परंपरा नाही ज्यांचा उपयोग चांगल्या गोष्टी घडवण्याचे साधन म्हणून केला जातो. ते नाव निरर्थक पुनरावृत्ती म्हणून, अर्थहीन पद्धतीने त्याचे उच्चारण करण्याद्वारे, आपल्याला परमेश्वराने काय वचन दिले आहे हे पाहण्याचे सामर्थ्य देणार नाही. ते नाव प्रभावीपणे बोलण्यासाठी आपण येशू या व्यक्तीवर विश्वास ठेवला पाहिजे आणि त्याच्या नावाच्या अधिकारावर विश्वास ठेवला पाहिजे.

## त्याच्यावर विश्वास ठेवा, त्याच्या नावात विश्वास ठेवा

पवित्र शास्त्रात अशी अनेक ठिकाणे आहेत जेथे आपल्याला येशूच्या नावावर, तसेच येशू ख्रिस्त या व्यक्तीवर विश्वास ठेवण्यास सांगितले गेले आहे.

त्यापैकी काहींवर विचार करू या:

**योहान 1:12**
**परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.**

**योहान 3:18 (योहान 20:31; 1 योहान 5:13 भी देखें)**
**जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही.**

**योहान 6:28,29**
**28 ह्यावरून ते त्याला म्हणाले, “देवाची कामे आमच्या हातून व्हावीत म्हणून**

**आम्ही काय करावे?”**
**29 येशूने त्यांना उत्तर दिले, “देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठवले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.”**

आपण मागील प्रकरणात पाहिल्याप्रमाणे येशूच्या नावात विश्वास ठेवणे म्हणजे त्याच्याठायी, त्याच्या व्यक्तिमत्वात विश्वास ठेवणे आहे. येशूच्या नावात विश्वास ठेवण्यासाठी, आम्ही येशू या नावाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती येशूस आम्ही जाणले पाहिजे आणि त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

## त्या नामात विश्वास ठेवून त्या नावाचा उपयोग करणे

विश्वासासोबत येशूच्या नावाचा उपयोग आला पाहिजे. या पवित्र शास्त्र वचनांवर विचार करा जे आम्हास येशूच्या नावाचा उपयोग करीत असतांना विश्वासाचे महत्व शिकवितात.

**मत्तय 17:19-21**
**19 नंतर शिष्य एकान्ती येशूजवळ येऊन म्हणाले, “आम्हांला ते का काढता आले नाही?”**
**20 तो त्यांना म्हणाला, “तुमच्या अल्पविश्वासामुळे; कारण मी तुम्हांला खचीत सांगतो की, जर तुमच्यामध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला तर ह्या डोंगराला ‘इकडून तिकडे सरक’ असे तुम्ही म्हटल्यास तो सरकेल; तुम्हांला काहीच असाध्य होणार नाही.**
**21 तरीपण प्रार्थना व उपास ह्यांवाचून असल्या जातीचे भूत निघत नाही.”**

आपण यापूर्वी प्रकरण 5 मध्ये हे सिद्ध केले आहे, की प्रेषित येशूच्या नावाने कार्य करीत होते, रोग्यांस बरे करीत होते, भूते काढीत होते आणि अद्‌त कृत्ये करीत होते. ते उत्तम परिणाम पाहत होते. तथापि, येथे मत्तय 17 मध्ये एक अशी परिस्थिती आहे जेथे शिष्यांना एका मुलातून भूत काढता आले नाही. निश्चितच त्यांनी येशूच्या नावाचा उपयोग केला होता, जसे त्यांनी यापूर्वी अनेकदा केले होते. तरी हा मुलगा स्वतंत्र झाला नव्हता. येशूने नंतर येऊन त्या मुलाला सुटका

दिली. जेव्हा शिष्यांनी याचे कारण विचारले की त्यांना भूतास का काढता आले नाही, तेव्हा येशूने एका मुख्य समस्येकडे अंगुली निर्देश केला – **अविश्वास**. याचे समाधान म्हणून त्याने केवळ मोहरीच्या दाण्याच्या आकाराच्या विश्वासाकडे संकेत केला. विश्वासासोबत येशूच्या नावात प्रतिनिधी स्वरूपात मिळालेल्या अधिकाराचा उपयोग असला पाहिजे. प्रार्थना आणि उपवास अविश्वासास दूर करतात, जेणेकरून आमच्या हृदयांत विश्वासाचा उदय होतो आणि अशाप्रकारच्या दुरात्म्यांस तोंड देतो.

विश्वासासोबत येशूच्या नावात
प्रतिनिधी स्वरूपात मिळालेल्या अधिकाराचा
उपयोग असला पाहिजे.

सुंदर नावाच्या फाटकाजवळ जेव्हा पेत्र आणि योहानाने 40 वर्षांपासून लंगडा असलेल्या इसमास बरे केले, पूर्ण आरोग्य दिले, तेव्हा सर्व लोक चकित झाले. मंदिराजवळ आपल्या संदेशात पेत्राने असे म्हटले:

**प्रेषितांची कृत्ये 3:16**
**त्याच्याच नावावरील विश्वासामुळे त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तिमान केले आहे. त्याच्या द्वारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हा सर्वांसमक्ष ही शरीरसंपत्ती प्राप्त झाली आहे.**

पेत्राने येशूच्या नावाकडे आणि येशूच्या नावातील विश्वासाकडे संकेत केला ज्यामुळे लंगड्या व्यक्तीस आरोग्य प्राप्त झाले होते. यावरून आपण या गोष्टीवर जोर देऊ शकतो की येशूचे नाव त्याच्या व्यक्तित्वावरील विश्वासासह घेतले जावे, तो कोण आहे आणि त्या परिस्थितीत तो जे करावयास पूर्णपणे समर्थ आहे.

याकोबाच्या पत्रात पुन्हा एकदा आमच्यासाठी याची पुनरावृत्ती करण्यात आली आहे.

**याकोब 5:14,15**
**[14] तुमच्यापैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी.**
**[15] विश्वासाची प्रार्थना दुखणाइताला वाचवील आणि प्रभू त्याला उठवील आणि त्याने पापे केली असतील तर त्याला क्षमा होईल.**

आम्हास येशूच्या नावात रोग्यांची सेवा करावयाची आहे, आणि विश्वासाची प्रार्थना करावयाची आहे. विश्वासाने केलेली प्रार्थना आणि येशूच्या नावात केलेली प्रार्थना त्या रोग्यास बरे करील. पुन्हा एकदा आम्हास हे स्पष्टपणे शिकविण्यास येते की जेव्हा आपण रोग्याची सेवा करतो तेव्हा प्रार्थनेत येशूच्या नावाचा उपयोग करीत असतांना आपण विश्वास कामी लावला पाहिजे. आठवण करून देण्याची बाब ही आहे की ज्या प्रकारच्या विश्वासाचे याकोबाने आमच्यासाठी 1 ल्या अध्यायात वर्णन केले आहे, संशय नसलेला, विचलित न होणारा, एकचित्त, पूर्ण खात्री असलेला, अशाप्रकारचा विश्वास: *"पण त्याने काही संशय न धरता विश्वासाने मागावे; कारण संशय धरणारा वाऱ्याने लोटलेल्या व उचंबळलेल्या समुद्राच्या लाटेसारखा आहे. असा माणूस द्विबुद्धीचा असून आपल्या सर्व कार्यांत चंचल असतो. आपल्याला प्रभूपासून काही मिळेल असे त्याने समजू नये"* (याकोब 1:6-8).

जेव्हा आपण येशूच्या नावाचा प्रार्थनेत उपयोग करतो, अथवा जेव्हा परिस्थितींवर, रोगांवर, भूतांवर, निसर्गाच्या तत्वांवर आपण अधिकाराचा उपयोग करतो, तेव्हा आपण तसे येशूठायी **"संशय न धरता, विचलित न होता, एक मनाने, पूर्ण खात्री असलेल्या अशा विश्वासाने"** ते केले पाहिजे.

जेव्हा आपण येशूच्या नावाचा प्रार्थनेत उपयोग करतो,
अथवा जेव्हा परिस्थितींवर, रोगांवर, भूतांवर, निसर्गाच्या तत्वांवर
आपण अधिकाराचा उपयोग करतो,
तेव्हा आपण तसे येशूठायी 'संशय न धरता, विचलित न होता,
एक मनाने, पूर्ण खात्री असलेल्या अशा विश्वासाने' ते केले पाहिजे.

## चिंतन

1) कल्पना करा की आपण मत्तय 17:14-21 मधील प्रेषितांपैकी एक आहात, आणि आपण त्या मुलातून भूत काढण्याचा प्रयत्न करीत आहात. यापूर्वी कित्येकदा नासरेथकर येशू ख्रिस्ताच्या नावात आपणास मिळालेल्या प्रतिनिधित अधिकाराचा उपयोग करून इतर प्रेषितांसोबत आपण असे केले आहे. पण या घटनेत आपणास सकारात्मक परिणाम दिसून येत नाही. अशाप्रकारच्या परिस्थितीत, विश्वास विफल करणाऱ्या अविश्वासाची कोणती कारणे असू शकतात?

2) आपण येशूच्या व्यक्तिमत्वात आणि त्याच्या नामात आमच्या विश्वासाचा कसा विकास करू शकतो आणि त्यास कशी बळकटी आणू शकतो?

# 9
# येशूच्या नावाने

विश्वासणारे या नात्याने प्रभूने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्यासाठी अधिकार देऊन त्याच्या नावात  बाहेर पाठवतांना जी आज्ञा आम्हाला दिली ती आपण समजून घेतली पाहिजे आणि त्यात चालले पाहिजे. आम्हास अधिकार देणारा प्रभू आहे, त्याने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा विशेष अधिकार आणि हक्क दिला आहे, म्हणून त्याच्या नावाचा उपयोग करण्याची आणि आम्ही जे केले पाहिजे असे त्याला वाटते ते करण्याची जबाबदारी आमची आहे. त्याच्या नावात काम करण्यासाठी, त्याचे यथार्थपणे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाऊल टाकण्यासाठी, त्याच्या जागी कार्य करण्यासाठी, जर तो उपस्थित असता तर त्याने जे केले असते ते त्याच्या वतीने करण्यासाठी आम्ही कुठलीही सबब सांगता कामा नये. “येशूसमान बनण्याचा प्रयत्न करण्यात” आम्हास लाज वाटण्यासारखे काहीही नाही कारण आम्हास तेच करण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे! *“जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहोत”* (1 योहान 4:17). आम्ही येशूसारखे जीवन जगतो – जसे जीवन येशू जगला तसे जगतो - आम्ही येशूसमान विचार करतो, बोलतो, कार्य करतो, उत्तर देतो, आणि वागतो (1 योहान 2:6). आणि आम्ही हे येशूच्या नावात करतो!

प्रारंभिक मंडळीला ते समजले. हे साधेभोळे साधारण लोक होते पण येशूच्या नावात कार्य करण्याचा काय अर्थ आहे ते त्यांना माहीत होते. विश्वासणारे म्हणून आज, आम्ही देखील हे समजले पाहिजे की जेव्हा येशूने आम्हाला त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार दिला तेव्हा त्यात आमच्यासाठी त्याचा काय हेतू होता.

# येशूच्या नावात आपणास काय लाभले आहे हे जाणणे आणि त्यावर कार्य करणे

**प्रेषितांची कृत्ये 3:6,7**

**6 मग पेत्र म्हणाला, "माझ्याजवळ सोनेरुपे काही नाही; पण जे आहे ते तुला देतो; नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लाग."**

**7 आणि त्याने त्याचा उजवा हात धरून त्याला उठवले, तेव्हा त्याची पावले व घोटे ह्यांत तत्काळ बळ आले.**

पेत्र म्हणाला, *"जे आहे ते तुला देतो."* पेत्राला माहीत होते की त्याच्याजवळ काहीतरी आहे. त्याला माहीत होते की त्याच्याजवळ नासरेथकर येशूचे नाव होते. पेत्राला माहीत होते की त्याला ज्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार देण्यात आला होता त्या नावात काय होते. त्याला माहीत होते की त्या नावात आरोग्य आहे. त्याला माहीत होते की त्या नावात जन्मापासून, चाळीस वर्षांपासून लंगडा असलेल्या या माणसाला बरे करण्याचे सामर्थ्य होते आणि त्या विशिष्ट दिवशी, पेत्राने जाणले की प्रभूची इच्छा होती की त्याने या लंगड्या व्यक्तीस सेवा द्यावी आणि येशूच्या नावात जे काही होते ते त्याला द्यावे.

तरीही, पेत्राला काहीतरी करावयाचे होते. त्याला येशूच्या नावात बोलावयाचे होते आणि कार्य करावयाचे होते. अन्यथा, पेत्राजवळ जे नाव होते, आणि त्या नावात जे काही होते, त्याचे त्या लंगड्या व्यक्तीसाठी काहीही मोल नसते. म्हणून पेत्र धैर्याने उभा राहिला, तो येशूच्या नावात बोलला आणि त्याने त्या लंगड्या व्यक्तीला जो पूर्वी कधी उठून चालला नव्हता, त्याला उठून चालण्याची आज्ञा दिली. त्याने येशूच्या नावात धैर्याने कार्य केले आणि त्या माणसाला उभे केले. ते नाव विफल ठरले नाही. त्या नावातील सामर्थ्याने या मनुष्यास बरे केले.

**प्रेषितांची कृत्ये 4:7,10**

**7आणि त्यांनी त्यांना मध्ये उभे करून विचारले, "तुम्ही हे कोणत्या सामर्थ्याने किंवा कोणत्या नावाने केले?"**

**10तर तुम्हा सर्वांना व सर्व इस्राएल लोकांना हे कळावे की, ज्याला तुम्ही**

**वधस्तंभावर खिळून मारले, ज्याला देवाने मेलेल्यांतून उठवले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे.**

हे पाहणे मजेदार होईल की कशाप्रकारे पेत्र आणि योहानास धार्मिक पुढाऱ्यांद्वारे त्या लंगड्या व्यक्तीच्या चमत्कारिकरित्या बरे होण्याविषयी विचारपूस करण्यात आली. त्यांना विचारण्यात आले की तुम्ही हे कोणत्या *"सामर्थ्याने"* अथवा *"कोणत्या नावाने"* केले आहे? *"सामर्थ्य"* या शब्दासाठी दिलेला ग्रीक शब्द आहे *'डुनामिस'* आणि याचा उपयोग अलौकिक सामर्थ्याचा उल्लेख करण्यासाठी केला जातो. या शब्दाचा उपयोग पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा उल्लेख करण्यासाठी देखील केला जातो (प्रेषितांची कृत्ये 1:8). *"कोणत्या नावाने"* हे विचारण्याची दुसरी पद्धत ही आहे की हे करीत असतांना आपण कोणाच्या अधिकाराचे अथवा कोणाचे प्रतिनिधित्व करीत आहात. पेत्राचा प्रतिसाद अतिशय स्पष्ट आहे. अधिकार आणि सामर्थ्य *"नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने"* प्राप्त झाला. येशूच्या नावात आमच्यासाठी उपलब्ध सामर्थ्य आणि अधिकार आम्हास माहीत असला पाहिजे. परमेश्वराचे सामर्थ्य आणि अधिकार तेव्हा मुक्त होतो जेव्हा आपण येशू आम्हास जे करावयास सांगतो ते करण्यासाठी धैर्याने येशूच्या नावात पाऊल टाकतो.

परमेश्वराचे सामर्थ्य आणि अधिकार तेव्हा मुक्त होते
जेव्हा आपण येशू आम्हास जे करावयास सांगतो
ते करण्यासाठी धैर्याने येशूच्या नावात पाऊल टाकतो.

## आपण ख्रिस्तामध्ये कोण आहोत हे जाणून घ्या

आम्हास प्रतिनिधी म्हणून देण्यात आलेल्या अधिकाराचा उपयोग करण्यासाठी धैर्याचा विकास करण्यात अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे ख्रिस्तामधील आमची ओळख जाणणे. दुरात्म्यांवर, रोगावर,

आणि परिस्थितींवर वर्चस्व गाजविण्यासाठी आत्मिक अधिकाराचा उपयोग करण्याची आमची योग्यता ख्रिस्तामधील आमच्या आत्मिक ओळखीच्या आमच्या समजाशी अगदी जवळून निगडीत आहे. ख्रिस्तामध्ये आम्हास प्राप्त असलेल्या इतर सर्व गोष्टीमध्ये आम्ही हे जाणले पाहिजे की परमेश्वराची मुले म्हणून आम्हास *"देवाचे वारीस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारीस"* (रोमकरांस पत्र 8:17) असे करण्यात आले आहे. परमेश्वराने आम्हास *"ख्रिस्त येशूबरोबर स्वर्गात बसविले"* (इफिसकरांस पत्र 2:6). परमेश्वराची विपुल कृपा आणि ख्रिस्ताठायी नीतिमत्वाचे कृपादान प्राप्त झालेले म्हणून आम्हास या जीवनात राज्य करण्याचे, शासन करण्याचे, आणि प्रभूत्व गाजविण्याचे स्थान लाभले आहे (रोमकरांस पत्र 5:17). जेव्हा आम्ही येशूच्या नावात कार्य करतो, तेव्हा आपण सर्वात उंच राजासनावर पित्याच्या उजव्या हातास येशूसोबत आमच्या स्थानाहून कार्य करतो.

आम्ही ही सत्ये अंगी बाणली पाहिजेत आणि त्यानुसार कार्य केले पाहिजे. येशूच्या नावात बाहेर पाऊल टाकत असतांना आम्ही धैर्यवान आणि निर्भय असले पाहिजे!

## बाकीचे पुस्तक

या पुस्तकात या बिंदूपर्यंत आपण येशूच्या नावाच्या उपयोगात आणि उपयोगाद्वारे आमच्यासाठी जे काही उपलब्ध आहे त्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. आपण एक मजबूत आत्मिक पाया स्थापित करण्यावर बराच वेळ घालविला आहे जेणेकरून आम्ही हे जाणावे की येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा विशेषाधिकार दिला जाण्याचा काय अर्थ आहे.

बाकीचे पुस्तक संक्षिप्त, वाचावयास सोप्या अशा प्रकरणांत संकलित करण्यात आले आहे, जे नवा करार आम्हास येशूच्या नावाचा कसा उपयोग करावा त्याविषयी शिकविते. आपण आमच्या जीवनाच्या

सर्व पैलूंमध्ये येशूच्या नावाचा उपयोग करू या, जसे आमच्यासाठी नव्या करारात मांडण्यात आले आहे.

## चिंतन

1) काही अडखळण आणणारी कारणे ओळखा – आपल्या वैय्यक्तिक जीवनात किंवा इतरांची सेवा करीत असतांना धैर्याने पाऊल टाकण्यापासून आपणास रोखून धरणाऱ्या गोष्टी. आपण यावर कसा विजय मिळवू शकता?

# 10
# येशूच्या नावात क्षमा

**लूक 24:47**
**आणि यरुशलेमेपासून आरंभ करून सर्व राष्ट्रांना त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी.**

**प्रेषितांची कृत्ये 10:43**
**त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात."**

**1 योहान 2:12**
**मुलांनो, मी तुम्हांला लिहितो, कारण त्याच्या नावामुळे तुमच्या पापांची तुम्हांला क्षमा झाली आहे.**

येशूच्या नावात पापांची क्षमा प्राप्त होते.

सर्वप्रथम सर्व वैय्यक्तिक पातळीवर, मला माहीत आहे की त्याच्या नावासाठी अथवा त्याच्या नावामुळे आम्हाला क्षमा मिळाली आहे. "येशू" हे नाव त्या व्यक्तीचे नाव आहे ज्याने आमच्या सर्व पापांचा दंड सहन केला. त्याने नेहमीसाठी, पापाचे पूर्ण बलिदान केले. जेव्हा आम्ही त्याच्याठायी विश्वास ठेवितो आणि त्याच्या नावात पापांची क्षमा प्राप्त करतो, तेव्हा पापांची क्षमा मिळविण्यासाठी आम्हास काहीही करण्याची गरज नाही. त्याने जे काही केले आहे त्यात, तो जो कोणी आहे त्यात आणि त्याच्या नावात फक्त विश्वास ठेवण्याची गरज आहे.

हे अगदी सोपे आणि तरीही चित्तथरारक आहे, की येशूच्या नावात पापांची क्षमा प्राप्त होते. विश्वासणारे म्हणून जर आपण पाप करतो, आपण ते येशूच्या नावात कबूल करावे आणि क्षमा प्राप्त

करावी. जेव्हा आपण म्हणतो, "पित्या, कृपा करून मला येशूच्या नावात क्षमा कर," तेव्हा आपण त्या येशूच्या नावात आपली विनंती करीत आहोत ज्याने आधीच आमच्या पापांसाठी किंमत चुकविली. पश्चाताप महत्वाचा आहे, तरीही परमेश्वर आमच्या अश्रूंमुळे, दुःखामुळे किंवा दोषभावनेमुळे आम्हास क्षमा करीत नाही, तर त्या प्रभूमुळे क्षमा करतो ज्याच्या नावात आपण क्षमा मागितली आहे. ज्याने आमच्या सर्व पापांची किंमत चुकविली, आमच्या वतीने पित्याच्या सान्निध्यात तेथे उभा आहे (1 योहान 2:1,2). *"जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील"* (1 योहान 1:9), कारण *"...त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते"* (1 योहान 1:7).

दुसरे म्हणजे, आम्हास येशूच्या नावात पश्चातापाविषयी आणि पापांच्या क्षमेविषयी प्रचार करावयाचा आहे (इतरांस सांगावयाचे आहे). जेव्हा आपण सुवार्ता सांगतो तेव्हा आपण इतरांस हे कळवितो की त्यांना येशूच्या नावात  आणि जे काही त्याने वधस्तंभावर केले त्यावरील विश्वासाद्वारे पापांची क्षमा मिळू शकते. आमच्या स्थानिक मंडळीत येण्यासाठी आम्ही इतर कुठलीही अट मांडता कामा नये अथवा असे काहीही करावयास सांगू नये ज्यामुळे त्यांस त्यांची क्षमा विकत घ्यावी लागेल. त्याच्याठायी विश्वास ठेवणाऱ्यांस त्याच्या नामाद्वारे पापांची क्षमा प्राप्त होते.

(**चिंतन** अध्याय 14 नंतर दिले गेले आहे.)

# 11
# येशूच्या नावात तारण

**मत्तय 1:21**
**तिला पुत्र होईल, आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील."**

आम्ही पहिल्याच अध्यायात पाहिले आहे की "येशू'' या नावाचा अर्थ "तारणारा'' किंवा "परमेश्वर जो तारण'' आहे असा आहे. आपण हे देखील स्पष्ट केले की, नवीन करारामध्ये "तारण" हा 'सोझो' असा सर्वसमावेशक शब्द आहे, ज्यामध्ये सार्वकालिक तारण, पापांची क्षमा, पापावर विजय, आजारातून बरे होणे, संघर्षात विजय, शत्रूच्या प्रत्येक कार्यातून सुटका, हानीपासून बचावे, धोक्यापासून संरक्षण आणि संपूर्ण परिपूर्णता यांचा समावेश होतो. याचा अर्थ "जतन करणे, बरे करणे, सुटका प्राप्त करणे, विजयी होणे, बचावणे, सांभाळणे आणि संपूर्ण करणे असा आहे." येशूच्या नावात तारण आहे.

**प्रेषितांची कृत्ये 4:12**
**आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही."**

केवळ येशूच्या नावानेच तारण आहे याविषयी बायबलमध्ये खूप जोर देण्यात आला आहे. म्हणूनच आपण येशूविषयी सांगितले पाहिजे जेणेकरून लोक त्याला जाणतील आणि त्याचे नाव घेतील.

**रोमकरांस पत्र 10:13**
**कारण "जो कोणी प्रभूचे नाव घेऊन त्याचा धावा करील त्याचे तारण होईल."**

चांगली बातमी अशी आहे की कोणीही येशूच्या नावाचा धावा

करू शकतो आणि त्याचे तारण होऊ शकते.

लक्षात ठेवा की तारणात फक्त पापांची क्षमा नाही तर त्यापेक्षा बरेच काही समाविष्ट आहे. विश्वासणारे म्हणून आपण बरे होण्यासाठी, सुटकेसाठी, सुरक्षिततेसाठी, संरक्षणासाठी – त्या नावात असलेल्या सर्व गोष्टींसाठी – त्याच्या नावाचा धावा करू शकतो आणि पवित्र शास्त्र सांगते की आपले तारण होईल. त्या नामातच तारण आहे हे लक्षात ठेवा. येशूवर विश्वास ठेवून आपण त्याचा धावा करू शकतो, उल्लेख करू शकतो, धैर्याने त्या नावाची घोषणा करू शकतो आणि आपले तारण होईल.

(**चिंतन** अध्याय 14 नंतर दिले गेले आहे.)

# 12
# येशूच्या नावात सार्वकालिक जीवन

**योहान 1:12**
**परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला;**

**योहान 3:18**
**जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही.**

**योहान 20:30,31**
**30 ह्या पुस्तकात लिहिली नाहीत अशी दुसरीही पुष्कळ चिन्हे येशूने आपल्या शिष्यांदेखत केली.**
**31 येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेवून तुम्हांला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे म्हणून ही लिहिली आहेत.**

**1 योहान 5:13**
**देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लिहिले आहे. आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवीत राहावे.**

जेव्हा आम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, तेव्हा आमचा नव्याने जन्म होतो, आम्ही त्याची मुले आणि मुली म्हणून परमेश्वराच्या कुटूंबात जन्म घेतो, तो जो आहे असे त्याने म्हटले यासाठी आणि त्याच्या नावाचा स्वीकार करण्यासाठी. जेव्हा आम्ही त्याच्या नावावर विश्वास ठेवतो तेव्हा आम्हास येथे आणि आता सार्वकालिक जीवन प्राप्त होते. आम्ही जाणू शकतो, निश्चित जाणू शकतो, आत्मविश्वास ठेवू शकतो, तेव्हा आम्हास सार्वकालिक जीवन प्राप्त होते. आणि परमेश्वर आम्हाला हेच

करावयाची, त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याच्या नावात विश्वास ठेवण्याची आज्ञा देतो (1 योहान 3:23).

"येशू" हे नाव आमच्यासाठी सार्वकालिक जीवन घेऊन येते, स्वतः परमेश्वराचे जीवन, (ग्रीक *'झोए'*) परमेश्वरासमान जीवन. येशू आम्हास विपुलतेने सार्वकालिक जीवन देण्यास आला (योहान 1:4,5) "येशूच्या" नावाचा उल्लेख येशूस, जीवनास त्या ठिकाणी घेऊन येतो. जेथे जीवन आहे, तेथून मरणाशी संबंधित सर्व गोष्टी पळ काढतात. जेथे जीवन आहे, तेथून अंधकाराशी संबंधित सर्व गोष्टी पळ काढतात. ते नाव बोला, त्या नावाची घोषणा करा, त्या नावाचे गीत गा, आणि मृत्यूस व अंधकारास पळ काढतांना पाहा, कारण त्याचे नाव जीवन आणि प्रकाश आहे, परमेश्वरासमान जीवन आणि परमेश्वराचा प्रकाश.

(**चिंतन** अध्याय 14 नंतर दिले गेले आहे.)

# 13
# येशूच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले, आणि नीतिमान ठरलेले

**1 करिंथ 6:9-11**

**9 अनीतिमान माणसांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही हे तुम्हांला ठाऊक नाही काय? फसू नका; जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, स्त्रीसारखा संभोग देणारे, पुरुषसंभोग घेणारे,**
**10 चोर, लोभी, मद्यपी, चहाड व वित्त हरण करणारे ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही.**
**11 आणि तुमच्यापैकी कित्येक तसे होते; तरी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात व आपल्या देवाच्या आत्म्यात धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरवलेले असे झालात.**

**प्रेषितांची कृत्ये 22:16**

**तर आता उशीर का करतोस? ऊठ, प्रभूच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या पातकांचे क्षालन कर.’**

करिंथ येथील विश्वासणाऱ्यासमान, आम्हा सर्वांच्या भूतकाळात अशा गोष्टी आहेत ज्या परमेश्वरास अप्रसन्न करणाऱ्या आहेत. अद्भुत वार्ता ही आहे की आता आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात आणि आमच्या परमेश्वराच्या आत्म्याद्वारे धुतले गेलो आहोत, पवित्र आणि नीतिमान ठरविण्यात आलो आहोत.

“धुतलेले” (ग्रीक *‘एपोलुओ’*) हा “शब्द म्हणजे धुऊन काढणे, पूर्ण व्यक्तीस धुऊन टाकणे.” जेव्हा आपण प्रभू येशूच्या नावाचा धावा करतो तेव्हा परमेश्वराच्या दयेने येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे आम्ही आपल्या पापांपासून धुतले जातो. आम्ही येशूच्या नावात शुद्ध आहोत. आमच्या कोणत्याही पापांचा डाग आमच्यावर दिसत नाही!

"पवित्र केलेले" (ग्रीक *'हॅग्गीअँझो'*) या "शब्दाचा अर्थ आहे पवित्र मानणे, वेगळे काढणे, समर्पित करणे, परमेश्वरासाठी पापापासून वेगळे करणे." आम्ही जगापासून आणि परमेश्वरासाठी वेगळे, दूर करण्यात आलो आहोत, आणि येशूच्या नावात त्याचे स्वतःचे ठरविले गेले आहोत.

"नीतिमान ठरविलेले" (ग्रीक *'डिकाईओ'*) या "शब्दाचा अर्थ आहे नीतिमान घोषित करणे, सर्व अपराध, लज्जा, न्याय आणि दंडाज्ञेपासून मुक्त." येशूच्या नावात विश्वासाद्वारे परमेश्वराच्या कृपेने आम्हास नीतिमान ठरविण्यात आले आहे.

आम्ही धैर्याने ही घोषणा केली पाहिजे की आम्ही येशूच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले, आणि नीतिमान ठरविलेले आहोत. सैतानाच्या रणनीतिपैकी एक आहे आम्ही स्वतःस अस्वच्छ, पापी, अपवित्र, अयोग्य, दोषी, अपराधी, आणि लज्जित असे समजावे. जर शत्रू आमच्या मनात यापैकी एखादा विचार टाकू शकला तर मी परमेश्वराची सेवा करण्यासाठी दुर्बळ ठरू आणि आम्हाला अयोग्य असल्यासारखे वाटू लागेल. पण आम्हाला धैर्याने हे जाहीर करण्याची गरज आहे की येशूच्या नावात आम्हाला काय मिळालेले आहे. स्वतः प्रभू येशूने आमच्यासाठी ही तरतूद केली की आम्ही धुतले जावे, पवित्र केले जावे, आणि नीतिमान ठरावे.

जेव्हा आम्ही लोकांस पापात रूजलेले पाहतो, तेव्हा आम्ही नेहमी त्यांच्याकडे आशेच्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे. प्रभू येशू त्यांना धुऊ शकतो, पवित्र करू शकतो, आणि नीतिमान ठरवू शकतो, जसे त्याने आमच्यासाठी केले! प्रार्थना करा आणि त्यांच्यासोबत असे घडावे अशी अपेक्षा करा. लोकांस सर्व प्रकारच्या पापांतून बाहेर काढता येते – ते येशूच्या नावात आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे – धुतलेले, पवित्र केलेले, आणि नीतिमान असे ठरू शकतात. अपेक्षेने त्यांच्यावर येशूच्या नावाची घोषणा करा.

(**चिंतन** अध्याय 14 नंतर दिले गेले आहे.)

# 14
# येशूच्या नावात बापतिस्मा

**मत्तय 28:19**
**तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.**

**प्रेषितांची कृत्ये 2:38**
**पेत्र त्यांना म्हणाला, "पश्चात्ताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.**

महान आज्ञेत प्रभू येशूने आम्हास शिकविले की आम्हास जाऊन *"पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावात बापतिस्मा द्यावा"*. इतर गोष्टींमध्ये, पाण्याचा बापतिस्मा ही त्या व्यक्तीसोबत तादात्म्य होण्याची आणि ज्यामध्ये आपण बापतिस्मा घेत आहोत त्याच्याप्रत आधीन होण्याची एक सामर्थ्यवान अभिव्यक्ती आहे. या बाबतीत आपण स्वतःचे बायबलच्या परमेश्वराशी, त्रिएक परमेश्वराशी, पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याशी तादात्म्य स्थापित करीत आहोत आणि त्याच्या आधीन होत आहोत.

प्रभूच्या स्वर्गारोहणानंतर, पेंटेकॉस्टच्या दिवशी सुरूवात झाल्यापासून (प्रेषितांची कृत्ये 2:28) आमच्याजवळ शमरोनातील नवीन विश्वासणाऱ्यांची (प्रेषितांची कृत्ये 8:16), कर्नेलियसच्या घराण्याची (प्रेषितांची कृत्ये 10:48), इफिस येथील मंडळीची (प्रेषितांची कृत्ये 19:5) आणि आणखी अनेक लोकांची नोंद आहे ज्यांनी येशूच्या नावात बापतिस्मा घेतला. त्यांनी "बापतिस्म्याच्या या सूत्राचे" खरोखर अनुसरण केले किंवा नाही याची नोंद नाही, अर्थात "पित्याच्या आणि

पुत्राच्या, आणि पवित्र आत्म्याच्या नावात" बापतिस्मा. अर्थात हा मोठ्या चिंतेचा विषय आहे. तथापि, आपण सुरक्षितपणे अशी ठरवू शकतो की प्रेषितांनी आणि त्यांच्यानंतरच्या लोकांनी सूचनांचे सख्तीने पालन केले आणि खरोखर प्रभू येशूने शिकविल्याप्रमाणे "बापतिस्मा सूत्रानुसार'' बापतिस्मा दिला.

प्रेषितांनी नव्या विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावात बापतिस्मा घेण्यासाठी निमंत्रण दिल्याची आणि नंतर त्यांना येशूच्या नावात बापतिस्मा दिल्याची नोंद आहे हे आपणास समजून येते ज्याद्वारे दोन महत्वाच्या गोष्टी कळून येतात.

- पहिले म्हणजे, नवीन विश्वासणाऱ्यांस येशू ख्रिस्ताने स्वतःविषयी जे म्हटले त्यावर विश्वास ठेवावयाचा होता आणि स्वतःस त्याच्यासोबत एक समजावयाचे होते की तो खरोखर देहधारी परमेश्वर, परमेश्वराचा पुत्र आहे, जो पित्यापासून आला, ज्याने आमच्या तारणाची पूर्ण किंमत चुकविली, पवित्र आत्म्याद्वारे मरणांतून उठविला गेला, आणि पित्याच्या उजव्या हातास बसलेला आहे.
- दुसरे म्हणजे, लोकांस येशूच्या नावात बापतिस्मा देतांना, पाण्याच्या बापतिस्मा देणारा येशूचा प्रतिनिधी म्हणून, त्याच्या जागी, त्याच्या वतीने कार्य करीत आणि त्याच्या इच्छेनुसार कार्य करीत असतो. म्हणून आज, जेव्हा आपण पाण्याचा बापतिस्मा देतो तेव्हा आपण ही घोषणा करतो ''येशूच्या नावात, मी तुला पित्याच्या, पुत्राच्या, आणि पवित्र आत्म्याच्या नावात बापतिस्मा देतो'' आणि मग त्या व्यक्तीस पूर्णपणे पाण्यात बुडवितो.

जेव्हा आपण येशूच्या नावात पाण्याचा बापतिस्मा घेतो तेव्हा आपण येशू ख्रिस्तासोबत आमच्या आध्यात्मिक तादात्म्यतेची सार्वजनिक घोषणा करतो (आत्मिकरित्या त्याच्यासोबत बुडविले जात आहोत, आणि त्याच्यासोबत एक केले जात आहोत). गलतीकरांस

पत्र 3:27 मध्ये म्हटल्याप्रमाणे, *"कारण तुमच्यामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे."* आम्ही ख्रिस्तास परिधान केले आहे आणि येशू आमच्याद्वारे पूर्णपणे दिसला पाहिजे. पॅशन आवृत्तीत या वचनाचे भाषांतर असे करण्यात आले आहे: *"तुम्हाला येशूमध्ये, अभिषिक्तामध्ये बुडविणारा तुमचा विश्वास आहे, आणि आता आपण त्याच्या अभिषेकाने झाकलेले आणि ल्यालेले आहात".* सरळ शब्दांत, ख्रिस्त जसा जगतो, बोलतो आणि करतो तसे या जगात येशू ख्रिस्ताचे पूर्णपणे आणि यथार्थपणे प्रतिनिधित्व करण्याच्या पाचारणास आम्ही 'होय' म्हटले आहे. आम्ही येथे त्याच्या नावात आहोत.

---

येशूच्या नावात क्षमा, तारण आणि सार्वकालिक जीवन आहे.
आपण येशूच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले आणि
नीतिमान ठरविलेले आहोत. आ
पणास येशूच्या नावात बापतिस्मा मिळाला आहे.

---

## चिंतन

हे 10 ते 14 प्रकरणांसाठी आहे.

1) येशूच्या नावाने पापाची क्षमा, तारण आणि सार्वकालिक जीवन आहे या सत्यावर चिंतन करा. याचा आपणासाठी वैयक्तिकरित्या काय अर्थ आहे? आपण इतरांना सेवा देताना या सत्याचा वापर कसा करता?

2) आपण येशूच्या नावाने धुतलले, पवित्र केलेले आणि नीतिमान ठरलेले आहात या सत्यावर चिंतन कराल. याचा आपणासाठी

वैयक्तिकरित्या काय अर्थ आहे? इतरांना सेवा देताना आपण हे सत्य कसे लागू करता?

3) महान आज्ञेमध्ये येशूने आम्हाला दिलेल्या शिकवणीनुसार *"पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने"* (मत्तय 28:19) "बाप्तिस्म्याचे सूत्र" उच्चारले जात असतांना येशूच्या नावाने पाण्यात बाप्तिस्मा घेण्याचा (आत्मिक महत्त्व) अर्थ काय आहे?

# 15
# येशूच्या नावाने प्रार्थना करा

**योहान 14:13,14**

**13 पुत्राच्या ठायी पित्याचा गौरव व्हावा म्हणून तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन.**

**14 तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन.**

**योहान 15:7,16**

**7 तुम्ही माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुमच्यामध्ये राहिली तर जे काही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हांला प्राप्त होईल.**

**16 तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे; ह्यात हेतू हा की, तुम्ही जाऊन फळ द्यावे, तुमचे फळ टिकावे आणि जे काही तुम्ही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांला द्यावे.**

**योहान 16:23,24,26,27**

**23 त्या दिवशी तुम्ही मला काही प्रश्न विचारणार नाहीत. मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, तुम्ही पित्याजवळ काही मागाल तर तो ते तुम्हांला माझ्या नावाने देईल.**

**24 तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे तुम्हांला मिळेल, ह्यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.**

**26 त्या दिवशी तुम्ही माझ्या नावाने मागाल. आणि मी तुमच्यासाठी पित्याजवळ विनंती करीन, असे मी तुम्हांला म्हणत नाही;**

**27 कारण पिता स्वतः तुमच्यावर प्रीती करतो, कारण तुम्ही माझ्यावर प्रीती केली आहे आणि मी पित्यापासून आलो असा विश्वास धरला आहे.**

येशूने आपल्याला त्याच्या नावाचा उपयोग करावयास शिकविले त्या क्षेत्रांपैकी एक आहे प्रार्थना. त्याने आम्हास सांगितले की आम्ही त्याच्या नावात, सरळ पित्यास विनंती करावी. त्याने आम्हास आश्वासन दिले की जेव्हा आपण असे करू तेव्हा आम्ही जे काही मागितले आहे

ते आम्हास मिळेल, यासाठी की आमचा आनंद परिपूर्ण व्हावा.

आता येशूच्या नावात प्रार्थना करण्याचा काय अर्थ आहे त्यावर आपण विचार करू या. जेव्हा आपण येशूच्या नावात प्रार्थना करता, तेव्हा जणू काही येशू स्वतः येथे पृथ्वीवर प्रार्थना करीत होता. आपण त्याच्या जागी, त्याचे प्रतिनिधित्व करीत, त्याच्या वतीने कार्य करीत आणि प्रार्थना करीत उभे आहोत, येशू जर येथे पृथ्वीवर असता तर त्याने त्या प्रार्थना केल्या असत्या. आणि स्वर्गात, जणूकाही येशू स्वतः पित्यापुढे ही विनंती मांडत होता, असे काही ज्यास पिता कधीही नाकार देणार नाही. हे प्रार्थनेस अगदी वेगळ्या स्तरावर ठेवते, येशूच्या नावात आमच्या प्रार्थनांस इतके महत्व देते. आम्ही येशूच्या नावात करीत असलेल्या प्रत्येक प्रार्थनेवर येशूची स्वाक्षरी आहे. आम्हास हे आश्वासन दिले गेले आहे की आम्ही येशूच्या नावात जे काही मागू ते तो आम्हास देईल. “प्रार्थनेतील सामर्थ्याचे” असे रहस्य हे आहे की त्याचे वचन आमच्याठायी राहते आणि आम्ही त्याच्यासोबत महत्वाच्या ऐक्यात राहतो (योहान 15:7). येशूच्या नावात आमच्या प्रार्थना त्याच्यासोबत आमच्या पूर्ण ऐक्यातून प्रवाहित झाल्या पाहिजेत. पिता अशा प्रार्थनांस कधीही नाकार देणार नाही.

आम्ही वर यादीबद्ध केलेल्या शास्त्रवचनात, उत्तरित प्रार्थना आमच्या जीवनांत पित्याच्या गौरवाशी जुळलेली आहे, ज्यात आम्ही टिकाऊ फळ आणू आणि आमचा आनंद उसळून येईल. पित्याची आमच्यासाठी अशी इच्छा आहे की येशूच्या नावात त्यास उद्देशून प्रार्थना करीत असतांना आमच्या सर्व प्रार्थनांची उत्तरे मिळण्याद्वारे आम्ही या विशेषाधिकारांचा आनंद अनुभव करावा.

(**चिंतन** अध्याय 17 नंतर दिले गेले आहे.)

# 16
# येशूच्या नावात धन्यवाद द्या आणि उपासना करा

**1 करिंथ 1:2**
**करिंथ येथील देवाच्या मंडळीस, म्हणजे ख्रिस्त येशूमध्ये पवित्र केलेल्या व पवित्र जन होण्यास बोलावलेल्या लोकांना, आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त म्हणजे त्यांचा व आपलाही प्रभू, ह्याचे नाव सर्व ठिकाणी घेणाऱ्या सर्वांना.**

**इफिसकरांस पत्र 5:18-21**
**18 द्राक्षारसाने मस्त होऊ नका; द्राक्षारसात बेतालपणा आहे; पण आत्म्याने परिपूर्ण व्हा;**
**19 स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक प्रबंध ही एकमेकांना म्हणून दाखवा; आपल्या अंतःकरणात प्रभूला गायनवादन करा;**
**20 आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याची उपकारस्तुती करीत जा.**
**21 ख्रिस्ताचे भय बाळगून एकमेकांच्या अधीन असा.**

**कलस्सै 3:16,17**
**16 ख्रिस्ताचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो; परस्परांना सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा; आपल्या अंतःकरणात देवाला स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा;**
**17 आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल, ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा; आणि त्याच्या द्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा.**

**इब्री 13:15**
**म्हणून त्याचे नाव पत्करणाऱ्या 'ओठांचे फळ' असा 'स्तुतीचा यज्ञ' आपण त्याच्या द्वारे 'देवाला नित्य अर्पण करावा.'**

आम्हास असे सांगण्यात आले आहे की आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात आपली उपकारस्तवने, आपली स्तवने आणि

आपली उपासना परमेश्वरासमोर उंचवावी. जेव्हा आपण उपासना करावयास सुरूवात करतो तेव्हा आपण म्हणतो, "पित्या, आम्ही येशूच्या नावात तुझी उपासना करतो." हेच नाव आम्हाला पित्याच्या सान्निध्यात प्रवेश मिळवून देते. याच नावाने आम्हाला परमेश्वराच्या सान्निध्यात स्वीकारणीय ठरविले आहे, धुतलेले, पवित्र आणि नीतिमान ठरविले आहे. हेच नाव आमची बलिदाने परमेश्वरासमोर ग्रहणीय आणि मान्य ठरविते. हे नाव त्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करते ज्याने आम्हास स्वतःच्या रक्ताने धुतले आणि आम्हाला परमेश्वरापुढे राजे आणि याजक असे केले. हे नाव त्याचे प्रतिनिधित्व करते ज्याने आमच्यासाठी वधस्तंभावर त्याच्या बलिदानाद्वारे नवा आणि जिवंत मार्ग उघडला, आणि ज्याचे रक्त आम्हाला महापवित्र स्थानी प्रवेश करण्यासाठी धैर्य देते. याच नावात आणि केवळ याच नावात आपण आपले स्तवन, उपासना, आणि उपकारस्तवने परमेश्वरास अर्पण करतो.

म्हणून, जेव्हा आम्ही आमच्या परमेश्वराचे स्तवन आणि उपासना करतो, तेव्हा आपण या सत्यामध्ये विसावतो. आमची बलिदाने आमच्या गुणांमुळे ग्रहणीय ठरत नाहीत, आमच्या स्वतःच्या नीतिमत्वामुळे नव्हे अथवा आम्ही केलेल्या एखाद्या मोठ्या कामामुळे नव्हे. स्तुती, उपासना, आणि उपकारस्तवनाची आमची बलिदाने परमेश्वरापुढे जीवनसूचक गंध आहेत, कारण ती येशू ख्रिस्ताच्या नावात अर्पण करण्यात आली आहेत.

जुन्या करारात, याजक पवित्र स्थानाचे सेवक होते, जे लोकांद्वारे अर्पण करण्यात आलेली बलिदाने घेऊन ती परमेश्वरापुढे अर्पण करीत. हे याजक मनुष्य होते, स्वतः पतीत होते आणि परमेश्वराद्वारे नाकारले जाऊ शकत होते. तथापि, येशू आमचा महायाजक आहे, स्वर्गीय पवित्र स्थानाचा सेवक. *"सांगण्याचा मुख्य मुद्दा हा आहे की, स्वर्गामध्ये राजवैभवाच्या सिंहासनाच्या 'उजवीकडे बसलेला' असा प्रमुख याजक आपल्याला आहे. तो पवित्रस्थानाचा म्हणजे माणसाने*

*नव्हे तर 'प्रभूने घातलेल्या' खऱ्या 'मंडपाचा' सेवक आहे"* (इब्री 8:1,2). जेव्हा आपण स्तुती, उपासना, उपकारस्तवन, आपले दशमांश आणि अर्पणें येशूच्या नावात अर्पण करतो, तेव्हा ते आमच्यापासून आमच्या थोर महायाजकास, स्वर्गीय पवित्र स्थानाच्या सेवकास प्राप्त होते आणि पित्यासमोर अर्पण केले जाते. जेव्हा आम्ही येशूच्या नावात आपली आध्यात्मिक बलिदाने अर्पण करतो, तेव्हा असेच घडते!

(**चिंतन** अध्याय 17 नंतर दिले गेले आहे.)

# 17
# सर्वकाही येशूच्या नावात करा

**कलस्सै 3:16,17**

**16 ख्रिस्ताचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो; परस्परांना सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा; आपल्या अंतःकरणात देवाला स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा;**
**17 आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल, ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा; आणि त्याच्याद्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा.**

जे काही आपण करतो, प्रत्येक कार्य, प्रत्येक तपशील, पवित्र शास्त्र सांगते की आम्ही सर्वकाही आमच्या प्रभू येशूच्या नावात करावे! आपण करू या. लक्षात ठेवा जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो तेव्हा जे काही घडते त्याविषयी आपण प्रकरण 7 मध्ये चर्चा केली आहे. जेव्हा आपण "येशूच्या नावात'' घोषणा करतो, तेव्हा ते येशूला त्या परिस्थितीत घेऊन येते. त्याचे सान्निध्य, त्याचे सामर्थ्य, त्याचा अधिकार आणि त्याचा आत्मा आता या बाबीत सहभागी आहे. तो जे काही आहे ते आता या परिस्थितीस लागू आहे कारण आपण त्याच्या नावाचा धावा केला आहे, घोषित केले आहे की आम्ही त्याच्या नावात कार्य करीत आहोत.

- जेव्हा आपण पहाटे उठता, जमीनीवर पाऊल ठेवता, घोषणा करता "मी आजच्या दिवस येशूच्या नावात घालवितो. मी येशूच्या नावात विजय, आशीर्वाद, शांती, आनंद, बुद्धी आणि समृद्धी यांची माझ्या सर्व मार्गांत घोषणा करतो."

- जेव्हा आपण स्वयंपाकघरात स्वयंपाक करता तेव्हा आपण घोषणा करता, "मी आज माझा स्वयंपाक येशूच्या नावात करते."

- जेव्हा आपण आपल्या गाडीत बसून गाडी चालवू लागता, तेव्हा आपण घोषणा करता "मी येशूच्या नावात आज गाडी चालवत आहे."
- जेव्हा आपण व्यावसायिक सभेस जाता तेव्हा आपण घोषणा करता "मी या सभेत येशूच्या नावात जात आहे."
- जेव्हा आपण कोणाची तरी मदत करता, कोणीची सेवा करता, कोणासाठी प्रार्थना करता, त्यांच्या गरजा पुरविता, त्यांच्या गरजा दूर करण्यासाठी देता, आरोग्यदानाची अथवा सुटकेची सेवा करता, तेव्हा ते येशूच्या नावात करा.

आपण जे काही करता, ते येशूच्या नावात करण्याची घोषणा करा. मग येशूचे यथार्थपणे प्रतिनिधित्व करा. येशू काय करेल याविषयी विचार करा, बोला आणि करा. पवित्र आत्म्यास विनंती करा की त्याने हे करण्यासाठी आपली मदत करावी. *"आपल्या जीवनाचे प्रत्येक कार्य आणि मुखातून निघणारा प्रत्येक शब्द आमच्या प्रभू येशूच्या, अभिषिक्त प्रभूच्या सौंदर्याने संतृप्त असावा"* (कलस्सै 3:17, पॅशन भाषांतर).

---

आमच्या प्रार्थनांची उत्तरे येशूच्या नावात दिली जातात.
स्तुती, उपासना, आणि उपकारस्तवनाची आमची अर्पणे
येशूच्या नावात ग्रहणीय आहेत.
आम्ही जे काही म्हणतो आणि करतो,
ते आपण येशूच्या नावात करतो.

---

# चिंतन

हे प्रकरण 15 ते 17 साठी आहे.

1) येशूच्या नावात पित्याजवळ प्रार्थना करण्याच्या महत्वावर मनन करा. आपल्या सर्व प्रार्थनांची उत्तरे पाहण्यासाठी आणि आपल्या प्रार्थनाजीवनासाठी जे आपले होऊ शकते असे येशूने म्हटले त्यात चालण्यासाठी आपण "प्रार्थनेत सामर्थ्य" कसे वाढवू शकता?

2) जेव्हा आपण येशूच्या नावात आपली आध्यात्मिक बलिदाने अर्पण करता तेव्हा काय होते? आपण परमेश्वरास जे अर्पण करीत आहात त्यात परमेश्वर प्रसन्न आहे किंवा नाही याविषयीचे सर्व प्रश्न आणि शंका दूर करण्यात यामुळे कशी मदत मिळते?

3) जेव्हा आपण ही घोषणा करता की आपण येशूच्या नावात काहीतरी करीत आहात त्याचा काय अर्थ आहे यावर चिंतन करा, मग ते काहीही असो, मग ते घरी असो, कामाच्या ठिकाणी असो वा आणखी कोठे. प्रकरण 7 मधील माहिती लागू करा जेथे आपण हे स्पष्ट केले आहे की जेव्हा आपण येशूच्या नावाचा उपयोग करतो तेव्हा काय घडते.

# 18
# आपण येशूच्या नावाने एकत्र जमतो

**मत्तय 18:18-20**
**18 मी तुम्हांला खचीत सांगतो, जे काही तुम्ही पृथ्वीवर बांधाल ते स्वर्गात बांधले जाईल आणि जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल.**
**19 मी आणखी तुम्हांला खचीत सांगतो, पृथ्वीवर तुमच्यापैकी दोघे कोणत्याही गोष्टीविषयी एकचित्त होऊन विनंती करतील तर ती माझ्या स्वर्गातील पित्याकडून त्यांच्यासाठी केली जाईल.**
**20 कारण जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने जमले आहेत तेथे त्यांच्यामध्ये मी आहे.**

**1 करिंथ 5:4**
**आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याने युक्त असा माझा आत्मा ह्यांनी एकत्र मिळून आपला प्रभू येशू ह्याच्या नावाने....**

प्रभु येशूने प्रकट केले की जेव्हा दोघे किंवा तिघे त्याच्या नावाने एकत्र होतात तेव्हा तो तेथे उपस्थित असतो. आम्ही आधी सांगितल्याप्रमाणे, त्याचे नाव त्याला आणते! तो, येशू त्याच्या नावात उपस्थित आहे. जेव्हा आपण विश्वासणारे या नात्याने त्याच्या नावाने एकत्र येतो तेव्हा आपण अनेक गोष्टी एकत्र करू शकतो. आपण उपासना करू शकतो, प्रार्थना करू शकतो, त्याच्या वचनाचा अभ्यास करू शकतो, सहभागित्व करू शकतो, प्रोत्साहन देऊ शकतो आणि एकमेकांची सेवा करू शकतो. वरील संदर्भित मत्तयमधील परिच्छेदात, आपण विशेषतः पाहतो की जेव्हा प्रभू आपल्यामध्ये उपस्थित असतो, तेव्हा आपण त्याच्या अधिकाराचा आणि सामर्थ्याचा उपयोग करतो आणि सहमतीच्या प्रार्थनेद्वारे (लोक येशूच्या नावाने एकत्र जमलेले आपसात सहमत होतात) आणि "बांधण्याद्वारे" आणि "मोकळे करण्याद्वारे"

पृथ्वीवरील बाबींवर परिणाम घडवून आणू शकतो.

प्रेषित पौल याला पुष्टी देतो जेव्हा तो म्हणतो की जेव्हा विश्वासणारे आपल्या प्रभू येशूच्या नावाने एकत्र जमतात, तेव्हा आपल्या प्रभू येशूचे सामर्थ्य देखील तेथे उपस्थित असते.

जेव्हा आपण येशूच्या नावात विश्वासणारे म्हणून एकत्र जमतो, मग दोघे जण असोत, तिघे असोत अथवा अनेक असोत, येशू तेथे उपस्थित असतो. त्याचे सामर्थ्य आमच्यासाठी उपलब्ध आहे की आम्ही त्यातून प्राप्त करावे आणि आमच्याशी संबंधित असलेल्या बाबींत त्यांचा परिणाम घडवून आणावा. आम्ही आपसात सहमत झाले पाहिजे, एकमत आणि एकचित्त असले पाहिजे आणि सहमतीच्या प्रार्थनेद्वारे आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याने आपण ज्या परिस्थितींबद्दल प्रार्थना करतो त्यावर कार्य करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे. आम्ही पित्याच्या इच्छेनुसार पृथ्वीवरील गोष्टींना परवानगी देत आणि त्यांची मनाई करीत पृथ्वीवर बांधतो आणि सोडतो, आणि स्वर्ग याचे समर्थन करतो. जेव्हा आपण येशूच्या नावाने एकत्र जमतो तेव्हा आपल्यासाठी सामर्थ्य, वर्चस्व आणि अधिकाराची महान क्षेत्रे उपलब्ध आहेत. येशूने आपल्याला काय उपलब्ध करून दिले आहे ते आपण पाहू या.

(**चिंतन** अध्याय 19 नंतर दिले गेले आहे.)

# 19
# येशूच्या नावात एकमेकाचा स्वीकार करा, मान राखा आणि आशीर्वाद द्या

**मत्तय 10:41,42**

**41 संदेष्ट्याला संदेष्टा म्हणून जो स्वीकारतो त्याला संदेष्ट्याचे प्रतिफळ मिळेल आणि नीतिमानाला नीतिमान म्हणून जो स्वीकारतो त्याला नीतिमानाचे प्रतिफळ मिळेल.**

**42 आणि ह्या लहानांतील एकाला शिष्य म्हणून जो कोणी केवळ गार पाण्याचा एक प्याला पाजतो तो आपल्या प्रतिफळाला मुकणारच नाही असे मी तुम्हांला खचीत सांगतो."**

**मार्क 9:37 (मत्तय 18:5; लूक 9:48 पाहा)**

**"जो कोणी माझ्या नावाने अशा बालकांपैकी एकाला स्वीकारतो तो मला स्वीकारतो, व जो कोणी मला स्वीकारतो तो मला नाही तर ज्याने मला पाठवले त्याला स्वीकारतो."**

**इब्री 6:10**

**कारण तुमचे कार्य व तुम्ही पवित्र जनांची केलेली व करीत असलेली सेवा आणि तुम्ही देवावर दाखवलेली प्रीती, ही विसरून जाण्यास तो अन्यायी नाही.**

**3 योहान 1:5-8**

**5 प्रिय बंधो, अनोळखी बंधुजनांसाठी तू जे काही करतोस ते विश्वासूपणाने करतोस;**

**6 त्यांनी मंडळीसमोर तुझ्या प्रीतीविषयी साक्ष दिली; देवाला आवडेल अशा रीतीने तू त्यांना वाटे लावशील तर बरे करशील.**

**7 कारण ते परराष्ट्रीय लोकांपासून काहीएक न घेता ख्रिस्ताच्या नावासाठी बाहेर पडले आहेत.**

**8 म्हणून आपण अशांचा पाहुणचार करावा, म्हणजे आपण सत्यामध्ये त्यांचे सहकारी होऊ.**

जेव्हा आपण येशूच्या नावामुळे एखाद्याचा आदर करतो तेव्हा आपण स्वतः येशूचा आदर करतो. तो दुसरा शिष्य असेल, लहानसे मूल देखील असू शकतो, अथवा सुवार्तेचा सेवक, जेव्हा आपण येशूच्या नावामुळे त्याचा आदर करतो तेव्हा आपण स्वतः प्रभू येशूचा आणि पित्याचा आदर करतो. येशूच्या नावात आपण जे सत्कार्य करतो, थंड पाण्याचा एक प्याला देण्यासारखी सोपी गोष्ट, किंवा आणखी काही काम आणि प्रेमाखातर केलेले श्रम, ते आपण स्वतः प्रभूसाठी करतो. जेव्हा आपण प्रभू येशूच्या नावात सेवेसाठी बाहेर जाणाऱ्यांचा आदर करतो, त्यांस आशीर्वाद देतो आणि त्यांची मदत करतो, तेव्हा आपण परमेश्वराच्या राज्यासाठी त्यांच्या कार्यात सहभागी होतो. आणि परमेश्वर याचे स्मरण करील आणि आम्हास प्रतिफळ देईल.

येशूच्या नावाने एकमेकांना स्वीकारण्याचे आणि त्यांचा आदर करण्याचे महत्त्व आपण समजून घेतले पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे की आपण भेटत असलेली प्रत्येक व्यक्ती आपल्याला नेहमीच ‘पसंत’ नसते. आपण प्रत्येक व्यक्तीशी प्रत्येक गोष्टीवर सहमत असू शकत नाही. पण तरीही आपण येशू ख्रिस्ताच्या नावाने एकमेकांशी प्रेमाने, आदराने वागू शकतो आणि एकमेकांस आशीर्वादित करू शकतो.

पवित्र शास्त्र आम्हाला शिकविते की *“जे उपदेश व शिक्षण ह्या बाबतींत”* श्रम घेतात त्यांस *“दुप्पट सन्मानास योग्य”* (1 तीमथ्य 5:17) गणिले जावे, सर्वात लहान संतांना / पवित्र जनांना आशीर्वाद देणे हे आपण कमी महत्त्वाचे समजू नये. येशूने जे म्हटले आहे ते लक्षात ठेवा: *“मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे”* (मत्तय 25:40). आपण जे काही करतो, लहान किंवा मोठे, जेव्हा आपण ते येशूच्या नावाने करतो, परमेश्वराच्या लहान संतासाठी किंवा प्रभूच्या प्रसिद्ध सेवकासाठी, तेव्हा आपण ते येशूसाठी करीत असतो. हेच महत्त्वाचे आहे. जेव्हा आपण हे करतो तेव्हा आपण येशूचे अचूक प्रतिनिधित्व

करीत असतो.

(**टीप:** सावधगिरीची नोंद म्हणून, आपण देखील “सापांसारखे चतुर” असले पाहिजे आणि इतरांना आपल्या दयाळूपणाचा गैरवापर करू देऊ नये आणि “शिष्याच्या नावात” परमेश्वराने दिलेली आपली वेळ, शक्ती आणि पैसा वाया घालवू नये.)

जेव्हा आपण येशूच्या नावाने एकत्र जमतो,
तेव्हा येशू तेथे असतो आणि त्याचे सामर्थ्य उपलब्ध असते!
जेव्हा आपण येशूच्या नावात, एकमेकाचा आदर करतो,
तेव्हा आपण येशूचा आणि पित्याचा आदर करतो!

## चिंतन

हे प्रकरण 18 आणि 19साठी आहे.

1) या सत्यावर मनन करा की जेव्हा आपण येशूच्या नावात एकत्र होतो, तेव्हा येशू आणि त्याचे सामर्थ्य उपस्थित असते. येशूने मत्तय 18:18-20 मध्ये आम्हास ज्या गोष्टी शिकविल्या त्या आम्हास शिकवितात की आम्ही त्याच्या उपस्थितीमधून आणि सामर्थ्यामधून काढले पाहिजे आणि त्याचा उपयोग पृथ्वीवरील गोष्टींस प्रभावित करण्यासाठी केला पाहिजे?

2) येशूच्या नावाने आपण इतरांना आदर आणि आशीर्वाद देणे हा आपल्या जीवनशैलीचा एक सामान्य, नैसर्गिक आणि सुसंगत भाग कसा बनवू शकता? जर काही अंतर्गत समस्या असतील (उदा. क्षमा न करणे, द्वेष, पूर्वग्रह, कलह, मत्सर, स्पर्धा,

असुरक्षितता, इ.) जे आपणास एक किंवा अधिक लोकांचा आदर करण्यापासून रोखत असतील तर ते परमेश्वरासमोर कबूल करा आणि आपणास त्यातून मुक्त करण्यासाठी विनंती करा. येशूच्या नावाने सर्व लोकांचा आदर करण्यासाठी आणि त्यांस आशीर्वादित करण्यासाठी आपले अंतःकरण स्वच्छ आणि तयार ठेवा.

# 20
# येशूच्या नावात सुवार्ता गाजवा, शिकवा आणि सेवा करा

**प्रेषितांची कृत्ये 4:17,18**
**17 तरी ते लोकांमध्ये अधिक पसरू नये म्हणून त्यांना अशी ताकीद द्यावी की, ह्यापुढे तुम्ही ह्या नावाने लोकांपैकी कोणाबरोबरही बोलू नये."**
**18 मग त्यांनी त्यांना बोलावून असे निक्षून सांगितले की, 'येशूच्या नावाने अगदी बोलू नका अथवा शिकवूही नका.'**

**प्रेषितांची कृत्ये 5:28**
**"ह्या नावाने शिक्षण देऊ नका असे आम्ही तुम्हांला निक्षून सांगितले होते की नाही? तरी पाहा, तुम्ही आपल्या शिकवणीने यरुशलेम भरून टाकले आहे आणि ह्या मनुष्याच्या रक्तपाताचा दोष आमच्यावर आणू पाहत आहात."**

सुरुवातीच्या मंडळीविषयी धार्मिक पुढाऱ्यांना ज्या एका गोष्टीची भीती होती ती म्हणजे त्यांचे सुवार्ता सांगणे आणि येशू ख्रिस्ताच्या नावात सेवा करणे, प्रार्थना करणे. त्यांना त्या नावाची भीती होती! हे आमच्या दिवसांतही तितकेच खरे आहे. लोकांना त्या नावाचा, येशू ख्रिस्ताच्या नावाचा उल्लेख जर आपण केला नाही तर आमच्या लहानश्या उपदेशाची, संदेशाची आणि प्रेरणादायक भाषणाची काहीच हरकत नाही. तथापि बाहेरील धमक्यांमुळे प्रेषितांनी येशूच्या नावात सुवार्ता सांगणे, शिकविणे आणि सेवा करणे थांबविले नाही. ते त्या नावाने सेवा करीत राहिले आणि आम्ही सुद्धा तसेच केले पाहिजे. जो प्रचार आम्ही करतो आणि जे शिकवितो त्या नावात आमच्या जीवनाचा आणि सेवेचा आधार आहे.

येशूच्या नावात सुवार्ता सांगितल्याने जीवन बदलते, आरोग्य प्राप्त

होते, चमत्कार होतात आणि मुक्ती मिळते. त्या सुरुवातीच्या दिवसांत यरूशलेमात हेच घडले

**प्रेषितांची कृत्ये 8:5-8,12**
**5 आणि फिलिप्पाने शोमरोन शहरात जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली.**
**6 तेव्हा फिलिप्पाचे भाषण ऐकून व तो करीत असलेली चिन्हे पाहून लोकसमुदायांनी त्याने सांगितलेल्या गोष्टींकडे एकचित्ताने लक्ष दिले.**
**7 कारण ज्यांना अशुद्ध आत्मे लागले होते त्यांच्यातील पुष्कळांतून ते मोठ्याने ओरडून निघून गेले; पुष्कळ पक्षाघाती व पांगळी माणसे बरी झाली.**
**8 आणि त्या नगरात आनंदीआनंद झाला.**
**12 तरीपण फिलिप्प देवाचे राज्य व येशू ख्रिस्ताचे नाव ह्यांविषयीची सुवार्ता सांगत असता लोकांचा विश्वास बसला आणि पुरुष व स्त्रिया ह्यांचा बाप्तिस्मा झाला.**

फिलिप्पाचे पोषण, संवर्धन आणि प्रशिक्षण यरूशलेमातील स्थानिक मंडळीत झाले होते. शमरोनात त्याने ख्रिस्ताचा प्रचार केला, ज्यात परमेश्वराच्या राज्याविषयीच्या आणि येशू ख्रिस्ताच्या नावाच्या प्रचाराचा समावेश होता. फिलिप्पाने प्रेषितांस जे करतांना पाहिले होते ते त्याने केले आणि त्याचे सारखेच परिणाम घडून आले. लोक येशूकडे वळले, चमत्कार घडून आले, भुते निघाली, लोकांस आरोग्य प्राप्त झाले आणि त्यांनी मोठा आनंद अनुभव केला! येशू ख्रिस्ताच्या नावाची सुवार्ता हेच घडवून आणेल.

आज जेव्हा आपण प्रचार करतो, शिकवितो आणि सेवा करतो, तेव्हा ते आपण येशूच्या नावात केले पाहिजे. याचा अर्थ हा की आपण असे येशूचे प्रतिनिधित्व करीत आणि खरोखर येशूला तो जो कोणी खरोखर आहे ते प्रगट करण्याच्या हेतूने करतो. येशूच्या नावाचे सामर्थ्य गमावलेले नाही, आणि जर आपण त्याच्या नावात योग्यप्रकारे सुवार्ता गाजवू, शिकवू आणि सेवा करू, तर आपण प्रारंभिक मंडळीसारखेच परिणाम पाहू.

आम्ही येशूच्या नावात आमच्या प्रचारात धैर्यवान असले पाहिजे. शाऊल उच्च शिक्षित परूशी होता जो पूर्णपणे येशू ख्रिस्ताच्या नावाच्या विरोधात होता. दमिश्काच्या वाटेवर येशूशी सामर्थ्यवान भेट घेतल्यानंतर लगेच त्याने *"येशूच्या नावाने दिमिष्कात धैर्याने कसे भाषण केले"* (प्रेषितांची कृत्ये 9:27,29).

आमच्यापैकी प्रत्येकाने हे ओळखले पाहिजे की आम्हास जी कृपा आणि पाचारण देण्यात आले आहे ते म्हणजे त्याच्या नावासाठी राष्ट्रास स्पर्श करणे. जसे प्रेषित पौलाने रोमकरांस पत्र 1:5 मध्ये लिहिले *"त्याच्या द्वारे आम्हांला कृपा व प्रेषितपद मिळाले; अशासाठी की, त्याच्या नावाकरता सर्व राष्ट्रांमध्ये विश्वासाने आज्ञापालन व्हावे."*

प्रभू येशू, जो मंडळीचे मस्तक आहे तो आम्हास सुवार्ता सांगताना, उपदेश देतांना आणि त्याच्या नावात सेवा करतांना, प्रार्थना करतांना पाहतो. तो त्याच्या नावासाठी आमची चिकाटी, धैर्य आणि आम्ही करीत असलेले अथक परिश्रम पाहतो (प्रकटीकरण 2:3).

म्हणून आपल्या प्रचारात, उपदेशात आणि सेवेत येशूच्या नावास खरे राहा. जर आपण त्याची आणि त्याच्या नावाची उंच आवाजात, धैर्याने आणि दृढतेने घोषणा करीत नाही, जर आम्ही त्यास चुकतो, ज्याने आम्हास त्याच्या नावाचा उपयोग करण्याचा विशेषाधिकार दिला आहे.

(**चिंतन** अध्याय 24 नंतर दिले गेले आहे.)

# 21
# येशूच्या नावात रोग बरे करा

**मार्क 16:17,18**

**[17] आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील, नवनव्या भाषा बोलतील,**
**[18] सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील."**

**प्रेषितांची कृत्ये 3:6,12,16**

**[6] मग पेत्र म्हणाला, "माझ्याजवळ सोनेरुपे काही नाही; पण जे आहे ते तुला देतो; नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लाग."**
**[12] हे पाहून पेत्राने लोकांना म्हटले, "अहो इस्राएल लोकांनो, ह्याचे आश्चर्य का करता? अथवा आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालायला लावले आहे असे समजून आमच्याकडे निरखून का पाहता?**
**[16] त्याच्याच नावावरील विश्वासामुळे त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तिमान केले आहे. त्याच्या द्वारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हा सर्वांसमक्ष ही शरीरसंपत्ती प्राप्त झाली आहे.**

**प्रेषितांची कृत्ये 4:7,10**

**[7] आणि त्यांनी त्यांना मध्ये उभे करून विचारले, "तुम्ही हे कोणत्या सामर्थ्याने किंवा कोणत्या नावाने केले?"**
**[10] तर तुम्हा सर्वांना व सर्व इस्राएल लोकांना हे कळावे की, ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले, ज्याला देवाने मेलेल्यांतून उठवले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे.**

**याकोब 5:14,15**

**[14] तुमच्यापैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी.**
**[15] विश्वासाची प्रार्थना दुखणाइताला वाचवील आणि प्रभू त्याला उठवील आणि**

**त्याने पापे केली असतील तर त्याला क्षमा होईल.**

येशू थोर वैद्य, सामर्थ्यवान आरोग्यदाता आहे, आणि त्याच्या नावात आरोग्य आहे. येशूने सर्व विश्वासणाऱ्यांस त्याच्या नावात रोग्यांस बरे करण्यासाठी त्याच्या नावाचा उपयोग करण्याची आज्ञा दिली आहे. अलौकिक आरोग्य देण्याची एकच पद्धत नाही. आपण रोग्यांवर हात ठेवत असू, त्यांस दुरून सेवा देत असू, फोनद्वारे त्यांच्यासाठी प्रार्थना करीत असू, प्रार्थना वस्त्र पाठवीत असू (ज्या वस्त्रासाठी प्रार्थना करण्यात आली), तेलाने अभ्यंग करीत असू, इत्यादी. महत्वाची गोष्ट ही आहे की आपण येशूच्या नावात सेवा करीत आहोत. "येशूचे" नाव येशूला घेऊन येते. जेव्हा आपण येशूच्या नावात रोगास व आजारास निघून जाण्याची आणि रोग्यास बरे होण्याची आज्ञा देतो, तेव्हा आपण हे जाणले पाहिजे आपण येशूच्या जागी उभे आहोत, त्याचे प्रतिनिधित्व करीत आहोत, आणि त्या व्यक्तीची सेवा करणे येशूची सेवा करण्यासारखेच आहे. जर त्या व्यक्तीस बरे करण्यासाठी येशू शारीरिकरित्या उपस्थित असता तर जे घडले असते त्यापेक्षा कमीची आपण अपेक्षा करता कामा नये. येशूच्या नावात रोग्यास बरे करण्याचा हाच अर्थ आहे. आम्ही आपल्या स्वतःच्या सामर्थ्याच्या अथवा पवित्रतेच्या आधारे सेवा करीत नाही. येशूच्या नावात जे सामर्थ्य आणि अधिकार आहे त्यात आम्ही सेवा करीत आहोत.

(**चिंतन** अध्याय 24 नंतर दिले गेले आहे.)

# 22
# येशूच्या नावात अद्‍भुत कार्ये करा

**मार्क 9:38,39**
**38 योहान त्याला म्हणाला, “गुरूजी, आपला अनुयायी नसलेल्या कोणाएकाला आम्ही आपल्या नावाने भुते काढताना पाहिले, तेव्हा आम्ही त्याला मना केले, कारण तो आपला अनुयायी नव्हता.”**
**39 येशू म्हणाला, “त्याला मना करू नका, कारण जो माझ्या नावाने महत्कृत्ये करून लगेचच माझी निंदा करू शकेल असा कोणी नाही.**

**मार्क 16:17,18**
**17 आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील, नवनव्या भाषा बोलतील,**
**18 सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील.”**

**प्रेषितांची कृत्ये 4:29-31,33**
**29 तर हे प्रभो, आता तू त्यांच्या धमकावण्याकडे पाहा;**
**30 आणि बरे करण्याकरता तू आपला हात लांब करीत असता आपल्या दासांनी पूर्ण धैर्याने तुझे वचन सांगावे असे कर; तुझा पवित्र सेवक येशू ह्याच्या नावाने चिन्हे व अद्‍भुते घडावीत असेही कर.”**
**31 त्यांनी प्रार्थना केल्यावर ज्या जागेत ते जमले होते ती हादरली आणि ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन देवाचे वचन धैर्याने बोलू लागले.**
**33 प्रेषित मोठ्या सामर्थ्याने प्रभू येशूच्या पुनरुत्थानाविषयी साक्ष देत होते; आणि त्या सर्वांवर मोठी कृपा होती.**

येशूच्या नावात चमत्कार, चिन्हे आणि अद्‍भुत कृत्ये आहेत. येशूच्या नावाने अलौकिक, असामान्य, अनपेक्षित आणि अशक्य गोष्टी घडू शकतात. नैसर्गिक नियम तात्पुरते निलंबित केले जाऊ शकतात; नैसर्गिक क्षेत्रातील सजीव आणि निर्जीव गोष्टी येशूच्या नावाच्या

अधिकाराच्या अधीन आहेत. सर्व विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाने चमत्कार, चिन्हे आणि अद्‌भुत कृत्यांचा लाभ आहे.

नैसर्गिक क्षेत्रातील परिस्थिती, स्थिती, भौतिक गोष्टी इ. आम्ही येशूच्या नावाने जारी केलेल्या आज्ञेला प्रतिसाद देतील. अर्थात आम्ही आपल्या लहरीनुसार या गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि आमच्या इच्छा आणि इच्छांनुसार स्वैरपणे किंवा अनियंत्रितपणे बोलत नाही. अशा गोष्टी आपण करू शकत नाही. पण जेव्हा आम्हाला आमच्या स्वतःच्या जीवनात अथवा आणखी कोणासाठी पित्याच्या इच्छेची अमलबजावणी करावयाची असते, तेव्हा आपण आपल्या अंतःकरणात विश्वासाने उठून उभे राहू शकता, आणि येशूच्या नावात आज्ञा देऊ शकता, अथवा प्रार्थना करू शकता आणि चमत्कार घडतांना पाहू शकता. येशू हा चमत्कार करणारा आहे. तोच आहे जो चमत्कार, अद्‌भुत कृत्ये आणि चिन्हें करतो. तो जर येथे असता तर त्याने जे केले असते ते त्याच्या नावाचा उपयोग करून करण्याचा अधिकार त्याने आम्हास दिला आहे. सुरूवातीची मंडळी यासाठी प्रार्थना करीत असे. त्यांनी येशूच्या नावात चिन्हें आणि अद्‌ते पाहण्याची विनंती केली. आणि त्यांनी असे केले. आता आपली पाळी आहे!

(**चिंतन** अध्याय 24 नंतर दिले गेले आहे.)

# 23
# येशूच्या नावात भुते काढणे

**लूक 10:17-19**

**17 नंतर ते बाहत्तर जण आनंदाने परत येऊन म्हणाले, “प्रभूजी, आपल्या नावाने भुतेदेखील आम्हांला वश होतात.”**

**18 तेव्हा त्याने त्यांना म्हटले, “सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले.**

**19 पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू ह्यांना तुडवण्याचा व शत्रूच्या सर्व शक्तीवरचा अधिकार दिला आहे, तुम्हांला काहीएक बाधणार नाही.**

**मार्क 16:17,18**

**17 आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील, नवनव्या भाषा बोलतील,**

**18 सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील.”**

**प्रेषितांची कृत्ये 16:16-18**

**16 मग असे झाले की, आम्ही प्रार्थनास्थळाकडे जात असता कोणीएक मुलगी आम्हांला आढळली. तिच्या अंगात येत असे. ती दैवप्रश्न सांगून आपल्या धन्यांना पुष्कळ मिळकत करून देत असे.**

**17 ती पौलाच्या व आमच्या मागे येऊन मोठ्याने म्हणाली, “हे लोक परात्पर देवाचे दास आहेत; हे तुम्हांला तारणाचा मार्ग कळवतात.”**

**18 असे ती पुष्कळ दिवस करीत असे; मग पौलाला अतिशय वाईट वाटले व मागे वळून तो त्या पिशाच्चाला म्हणाला, “येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तुला आज्ञा करतो की, तू हिच्यामधून निघून जा.” आणि ते तत्काळ निघून गेले.**

येशूच्या नावात, प्रत्येक विश्वासणाऱ्यास दुरात्म्यांवर (“सर्प आणि विंचू”) आणि सैतानाच्या सर्व सामर्थ्यावर (ग्रीक *‘डुनामिस’* ज्याचा अर्थ अलौकिक सामर्थ्य) अधिकार (ग्रीक *‘एक्सुसिया’* अर्थात “प्रतिनिधित

अधिकार") आहे. शत्रूच्या सर्व सामर्थ्यावर आपल्याला अधिकार आहे. येशूने आपल्याला त्याच्या नावाने मिळालेल्या अधिकाराचा वापर करून भुते काढण्याची जबाबदारी दिली आहे. प्रेषितांची कृत्ये 16 मध्ये आपण हे कसे करतो याचे उदाहरण पाहतो. आम्ही येशू ख्रिस्ताच्या नावाने दुष्टात्म्याला (त्यांना) बाहेर येण्याची, किंवा सोडून जाण्याची किंवा ते जे करीत आहेत ते करणे थांबवण्याची आज्ञा देतो. आणि ते आज्ञा पाळतील.

अशी वेळ येईल जेव्हा दुरात्मे आमच्या जीवनात ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करतील, ते आमच्या जीवनात त्रास देण्याचा, छळण्याचा, दबाव आणण्याचा अथवा जीवनाच्या काही क्षेत्रात आम्हाला दुःख देण्याचा प्रयत्न करतील. आपण येशूच्या नावात कठोर शब्दांत आणि धैर्याने त्यांच्या कामास फटकारावे, त्यांस निघून जाण्याची आज्ञा द्यावी. जेव्हा आपण परमेश्वराच्या अधीन होतो आणि सैतानाला तोंड देतो, तेव्हा पवित्र शास्त्र सांगते की तो आमच्यापासून घाबरून दूर पळ काढील (याकोब 4:7). जेव्हा आम्ही दुरात्म्यांद्वारे त्रस्त अशा इतरांची सेवा करतो तेव्हा आम्ही तेच करतो.

जेव्हा आपण येशूच्या नावात दुरात्म्यांस तोंड देता तेव्हा आध्यात्मिक जगात काय घडत याची कल्पना करण्याचा प्रयत्न करा. आध्यात्मिक जगात, आपण ख्रिस्ताठायी आहात, परमेश्वराचे वारस आणि ख्रिस्ताचे सह-वारस, आपण पित्याच्या उजव्या हातास बसलेले आहात, सैतान आणि प्रत्येक दुरात्मा आपल्या पायाखाली आहेत. आपण येशूच्या रक्ताने झाकले गेले आहात आणि पवित्र आत्म्याद्वारे अभिषिक्त आहात. आपल्या हातात आत्म्याची तरवार आहे आणि आपल्या रक्षणासाठी परमेश्वराची शस्त्रे आहोत. आपल्या मदतीसाठी देवदूतांना नेमण्यात आले आहे. आणि आता आपण येशूच्या नावात पाऊल पुढे टाकता. आपण घोषणा करीत आहा की आपण येशूचे प्रतिनिधित्व करीत आहा, त्याच्या जागी काम करीत आहा, जर तो तेथे

असता तर त्याने जे केले असते त्याच्या वतीने ते करण्यासाठी. जेव्हा आपण येशूच्या नावाने घोषणा करता तेव्हा येशू तेथे आहे. पवित्र आत्मा तेथे आहे. आणि मग आपण दुरात्म्यास सोडून जाण्याची आज्ञा देता. दुरात्मे अथवा भुते तेथे टिकू शकतात काय? ते हट्टी असतील आणि प्रतिकार करण्याचा प्रयत्न करू शकतात, पण आपणास चांगल्याप्रकारे माहीत आहे की ते टिकाव धरू शकत नाहीत. मुळीच नाही! येशूच्या नावात कोणीही आपणास थांबवू शकत नाही. त्यांना पळ काढावाच लागेल.

जोपर्यंत विश्वासणाऱ्यांचा संबंध आहे, जेव्हा आपण येशूच्या नावाने आपला आध्यात्मिक अधिकार ओळखतो आणि त्यानुसार कार्य करतो तेव्हा दुरात्मे आपल्याला घाबरतात. विश्वासणारे या नात्याने आम्हाला ही भिती बाळगता कामा नये की भुतांस काढल्यामुळे आमचा सूड घेण्यासाठी ते आमच्यावर आक्रमण करतील आणि आमच्यावर वर्चस्व करण्याचा प्रयत्न करतील. दुरात्म्यांचा सामना करताना येशूने स्पष्टपणे सांगितले की *"तो त्यांना मुळीच बाधणार नाही"* (लूक 10:19) या बाबतीत हा शेवटचा शब्द आहे. कोणताही दुरात्मा आम्हास इजा करावयास समर्थ आहे अशी आम्ही अपेक्षा करू शकत नाही. *"जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करीत नाही, हे आपल्याला ठाऊक आहे; जो देवापासून जन्मला तो (ख्रिस्त) त्याला सुरक्षित ठेवतो आणि त्या दुष्टाचा संपर्क त्याला होत नाही"* (1 योहान 5:18).

*"पाप करणारा सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला"* (1 योहान 3:8). येशूने आपल्याला त्याच्या नावाने तेच करण्यासाठी पाठवले आहे. येशूच्या नावाने भूतांवर धैर्याने अधिकार वापरा आणि त्यांची कामे नष्ट करा.

(**चिंतन** अध्याय 24 नंतर दिले गेले आहे.)

# 24
# येशूच्या नावात महत्कृत्ये करा

**योहान 14:11-14**
**11 मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना; नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना.**
**12 मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मी जी कृत्ये करतो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यांपेक्षा मोठी करील, कारण मी पित्याकडे जातो.**
**13 पुत्राच्या ठायी पित्याचा गौरव व्हावा म्हणून तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन.**
**14 तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन.**

प्रभू येशूने पित्याच्या नावाने केलेल्या अद्‌भुत कृत्यांवर खूप जोर दिला. त्याला खरोखर पित्याने पाठविले आहे याचा पुरावा म्हणून त्याने रोग बरे करणे, सुटका, चिन्हे आणि अद्‌भुत कृत्ये याकडे लक्ष वेधले. पेत्राने पेन्टेकॉस्टच्या दिवशी उद्‌घाटनाच्या वेळी उपदेश केल्याप्रमाणे *"अहो इस्राएल लोकांनो, ह्या गोष्टी ऐका; नासोरी येशूच्या द्वारे देवाने जी महत्कृत्ये, अद्‌ते व चिन्हे तुम्हांला दाखवली त्यांवरून देवाने तुमच्याकरता पाठवलेला असा तो मनुष्य होता, ह्याची तुम्हांला माहिती आहे"* (प्रेषितांची कृत्ये 2:22).

प्रभू येशूने ही घोषणा केली की त्याचे विश्वासणारे त्याने केलेली अद्‌भुत कृत्ये आणि त्याहूनही मोठी कृत्ये करतील. आणि या घोषणेनंतर लगेचच तो त्याच्या नावाने विनंती करणाऱ्या विश्वासणाऱ्यांबद्दल बोलला. त्याचे नाव वापरण्याचा आपला विशेषाधिकार वापरून आपण त्याने केलेले चमत्कार आणि त्याहूनही मोठे चमत्कार करू.

'त्यापेक्षा मोठी' सूचित करतात की आपण केवळ बायबलमध्ये

आपल्यासाठी नोंदवलेल्या चमत्कारांपुरते मर्यादित नाही. उदाहरणार्थ, लोकांच्या शरीरातील धातूचे रोपण गायब झाल्याची किंवा लोकांच्या शरीरातून बाहेर काढलेले अवयव त्यांच्या शरीरात पुन्हा दिसू लागल्याची कोणतीही नोंद नाही, लोकांच्या शरीरात रासायनिक असंतुलन पुनर्संचयित केले जात आहे, इत्यादी. मुद्दा हा आहे की बायबलमध्ये साम्य किंवा समांतर नसलेले चमत्कार आज घडताना पाहण्यासाठी आपण तयार असले पाहिजे. येशूने *"मोठी कृत्ये"* (योहान 14:12) म्हटले आणि हे सर्व प्रकारचे चमत्कार, चिन्हे आणि अद्‌भुत कृत्यांचे क्षेत्र उघडते जे परमेश्वर आपल्याद्वारे, येशूच्या नावाने करेल.

आपण धैर्यवान बनू या! आपण येशूच्या नावात महत्कृत्ये करण्याची अपेक्षा करू या! येशूने म्हटले की आम्ही असे करू शकतो!

---

येशूच्या नावाचे सामर्थ्य कमी झालेले नाही.

येशूच्या नावात आरोग्य, चमत्कार आणि मुक्ती आहे.

येशूच्या नावात मोठमोठे चमत्कार घडू शकतात.

---

## चिंतन

हे 20 ते 24 प्रकरणांसाठी आहे.

1) आज येशूच्या नावात सुवार्ता गाजविण्याचे आणि सेवा करण्याचे सारखेच परिणाम आहेत जे प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात आहेत, कारण येशूच्या नावाचे सामर्थ्य कमी झालेले नाही. जेव्हा आम्ही येशूच्या नावात सुवार्ता सांगतो आणि शिकवितो तेव्हा आणखी चमत्कार, आरोग्यदान, सुटका, चिन्हें व अद्‌भुते पाहण्यासाठी आम्ही कोणते बदल केले पाहिजेत?

2) विश्वासणारा या नात्याने, आपण येशूच्या नावात आपल्या सभोवतालच्या लोकांसाठी अलौकिक आरोग्यदान, मुक्तता आणि चमत्काराची सेवा करण्यासाठी आपल्या अधिकाराचा आणि विशेषाधिकाराचा कसा उपयोग करू शकतो?

# 25
# येशूच्या नावाचा अनधिकृत वापर

**मत्तय 7:21-23**

**21 मला 'प्रभूजी, प्रभूजी' असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल.**

**22 त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, 'प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला, तुझ्या नावाने भुते घालवली व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?'**

**23 तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, 'मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा!'**

**मत्तय 24:5**

**कारण पुष्कळ जण माझ्या नावाने येऊन 'मी ख्रिस्त आहे' असे म्हणतील व अनेकांना फसवतील.**

**प्रेषितांची कृत्ये 19:11-20**

**11 देवाने पौलाच्या हातून असाधारण चमत्कारही घडवले;**

**12 ते असे की, रुमाल किंवा फडकी त्याच्या अंगावरून आणून रोग्यांवर घातली म्हणजे त्यांचे रोग दूर होत असत व दुष्ट आत्मे त्यांच्यातून निघून जात असत.**

**13 तेव्हा कित्येक पंचाक्षरी फिरस्ते यहूदी, दुष्ट आत्मे लागलेल्या लोकांवर प्रभू येशूचे नाव उच्चारून म्हणू लागले, "ज्या येशूची पौल घोषणा करतो त्याची मी तुम्हांला शपथ घालतो."**

**14 एक यहूदी मुख्य याजक स्किवा ह्याला सात मुलगे होते, ते असे करीत होते.**

**15 त्यांना दुष्ट आत्म्याने उत्तर दिले, "येशूला मी ओळखतो व पौलाची मला माहिती आहे; पण तुम्ही कोण आहात?"**

**16 मग ज्या माणसाला दुष्ट आत्मा लागला होता त्याने त्यांच्यावर उडी घालून दोघांना हटवले आणि त्यांच्यावर इतकी जरब बसवली की ते त्या घरातून घायाळ व उघडेनागडे होऊन पळून गेले.**

**17 मग इफिसात राहणारे यहूदी व हेल्लेणी ह्या सर्वांना हे कळले, तेव्हा ते**

**भयभीत झाले आणि प्रभू येशूच्या नावाचा महिमा झाला.**
**[18] विश्वास ठेवणाऱ्या लोकांपैकी पुष्कळ जणांनी येऊन आपली कृत्ये उदारपणे पदरात घेतली.**
**[19] जादूटोणा करणाऱ्यांपैकी बऱ्याच जणांनी आपली पुस्तके जमा करून सर्वांदेखत जाळून टाकली; आणि त्यांच्या किमतीची बेरीज केली तेव्हा ती पन्नास हजार रुपये झाली.**
**[20] ह्याप्रमाणे प्रभूच्या सामर्थ्याचे वचन वाढत जाऊन प्रबल झाले.**

प्रभु येशूने त्याच्या नावाचा अनधिकृतरित्या उपयोग करण्याबद्दल चेतावणी दिली. प्रथम, असे लोक आहेत ज्यांच्याकडे आध्यात्मिक सामर्थ्य आहे, परंतु चुकीच्या माध्यमापासून मिळालेले. दुरात्मे अशा लोकांना फसवणूक करणारी चिन्हे आणि चमत्कार निर्माण करण्याचे सामर्थ्य देतात (1 तीमथ्य 4:1; 2 थेस्सल 2:9; 2 करिंथकर 11:13-15). लोकांची फसवणूक करण्यासाठी ते येशूच्या नावाने असे करू शकतात (लक्षात ठेवा की नकली अर्थात बनावटी खऱ्यासारखे दिसते). खरी परीक्षा ही आहे की येशू ख्रिस्ताचे खरोखर गौरव झाले आहे का, लोकांनी येशू ख्रिस्तावर वैयक्तिक विश्वास ठेवला का, या लोकांचे खरोखरच प्रभू येशू ख्रिस्तासोबत वैयक्तिक नातेसंबंध आहेत का आणि ते ईश्वरीय जीवनशैली पाळतात का (अधर्माचे पालन करण्याच्या विरूद्ध). आम्ही त्यांना त्यांच्या फळांवरून ओळखू (मत्तय 7:16). दुसरे म्हणजे, स्किव्हाच्या सात मुलांप्रमाणे, असे काही लोक आहेत ज्यांना येशूच्या नावाचा उपयोग फक्त काही लाभ प्राप्त करण्यासाठी करायचा आहे परंतु येशूशी संबंध न ठेवता, आणि ते तसे करू शकत नाहीत.

नकली किंवा बनावटी चमत्कार असतील या गोष्टीमुळे आपण घाबरता कामा नये. जेव्हा एखादी गोष्ट खूप मौल्यवान असते तेव्हाच त्यांची नकली प्रत आढळते. बनावट किंवा नकली वस्तूची ओळख करण्यासाठी आम्हाला पूर्णपणे खऱ्याची माहिती असली पाहिजे आणि त्यात आपण पूर्णपणे मग्न असले पाहिजे. बनावटीच्या भीतीने आम्ही

खऱ्या गोष्टी टाकून देत नाही. याउलट आपण सत्यामध्ये दृढ होतो. आम्ही स्वतः येशूच्या नावाच्या अधिकारात आणि सामर्थ्यात चालू लागतो. आपण येशूबरोबरच्या आपल्या जवळिकीच्या ठिकाणी वाढू शकतो जेणेकरून आपण त्याच्याशी एकरूप होऊन त्याचे अचूक प्रतिनिधित्व करू शकू. आम्ही आमच्या हेतूंचे रक्षण करतो आणि त्याच्या नावाच्या उपयोगाद्वारे येशूला प्रकट करण्याचा आणि त्याचे गौरव करण्याचा प्रयत्न करतो.

(**चिंतन** अध्याय 29 नंतर दिले गेले आहे.)

# 26
# येशूच्या नावासाठी छळ

**मत्तय 10:22**
**आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील; तथापि जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल.**

**लूक 21:12,17**
**12 परंतु हे सर्व होण्यापूर्वी ते तुमच्यावर हात टाकतील व तुमचा छळ करतील; तुम्हांला सभास्थाने व तुरुंग ह्यांच्या स्वाधीन करतील, आणि राजे व अधिकारी ह्यांच्यापुढे माझ्या नावासाठी नेतील.**
**17 आणि माझ्या नावामुळे सर्व तुमचा द्वेष करतील.**

प्रभु येशूने आम्हाला चेतावणी दिली की त्याच्या नावासाठी आपला द्वेष केला जाईल आणि छळ केला जाईल. जे आपला छळ करतात त्यांना वाटेल की आपण काहीतरी उदात्त आणि चांगले करीत आहोत.

**प्रेषितांची कृत्ये 5:40-42**
**40 "तेव्हा त्यांनी त्याचे सांगणे मान्य केले; त्यांनी प्रेषितांना बोलावून त्यांना मारहाण केली आणि 'येशूच्या नावाने बोलू नका' अशी ताकीद देऊन त्यांना सोडून दिले.**
**41 ते तर त्या नावासाठी आपण अपमानास पात्र ठरवण्यात आलो म्हणून आनंद करीत न्यायसभेपुढून निघून गेले.**
**42 आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकवण्याचे व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजवण्याचे त्यांनी सोडले नाही."**

येशूच्या स्वर्गारोहणानंतर फार काळ लोटला नाही की प्रेषितांना धार्मिक नेत्यांच्या धमक्या, विरोध आणि छळाचा सामना करावा लागला. तथापि, प्रेषितांना वाटले की त्याच्या नावासाठी लाज सहन करणे हा सन्मान आहे. प्रभू येशू आणि त्याच्या नावावर त्यांचे किती प्रेम

आहे. सुरुवातीच्या मंडळीला / चर्चला तीव्र छळाचा सामना करावा लागला तरीही ते त्यांच्या विश्वासात स्थिर राहिले आणि येशू ख्रिस्ताची सेवा करीत राहिले.

उदाहरणार्थ, प्रभू येशू आणि येशूच्या नावाप्रत असलेल्या पौलाच्या वचनबद्धतेचा विचार करा, जेव्हा तो यरूशलेमास गेल्यावर काय होईल याविषयी अत्यंत चिंतित असलेल्या कैसरियातील विश्वासणाऱ्यांशी बोलला: *"तेव्हा पौलाने उत्तर दिले, 'तुम्ही रडून माझे मन खचवता, हे काय? मी नुसता बंधनात पडायलाच नाही, तर प्रभू येशूच्या नावासाठी यरुशलेमेत मरायलादेखील तयार आहे'"* (प्रेषितांची कृत्ये 21:13).

आपण प्रभू येशूवर इतके प्रेम करावे आणि त्याच्या नावावर इतके प्रेम करावे की आपण आपल्या प्रभूच्या नावासाठी छळ आणि उपहास सहन करण्यास लज्जित होता कामा नये किंवा घाबरता कामा नये. प्रेषित पेत्राने छळ झालेल्या विश्वासणाऱ्यांना लिहिले आणि त्यांना कळविले की *"ख्रिस्ताच्या नावामुळे तुमची निंदा होत असल्यास तुम्ही धन्य आहात; कारण गौरवाचा आत्मा म्हणजे 'देवाचा आत्मा' तुमच्यावर येऊन 'राहिला आहे.' त्यांच्याकडून त्याची निंदा होते, पण तुमच्याकडून तो गौरविला जातो"* (1 पेत्र 4:14). जेव्हा आपण प्रभू येशूच्या नावाला धरुन राहतो आणि छळ होत असताना त्याच्यावरील आमच्या विश्वासाचा आणि त्याच्या नावाचा अव्हेर करण्यास नाकार देतो तेव्हा प्रभू येशूचे त्याकडे लक्ष असते (प्रकटीकरण 2:13; प्रकटीकरण 3:8).

(**चिंतन** अध्याय 29 नंतर दिले गेले आहे.)

# 27
# येशूच्या नावासाठी त्याग

**मत्तय 19:29**
**आणखी ज्या कोणी घरे, भाऊ, बहिणी, बाप, आई, मुले किंवा शेते माझ्या नावाकरता सोडली आहेत त्याला शंभरपटीने मिळून सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल.**

**प्रेषितांची कृत्ये 9:16**
**आणि त्याला माझ्या नावासाठी किती दुःख सोसावे लागेल हे मी त्याला दाखवीन."**

**प्रेषितांची कृत्ये 15:26**
**आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाकरता जिवावर उदार झालेले आपले प्रिय बंधू बर्णबा व पौल ह्यांच्याबरोबर काही निवडलेली माणसे तुमच्याकडे पाठवावीत.**

काही वेळा असे होते की आपण प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावासाठी स्वेच्छेने त्याग करावयाची निवड केली पाहिजे. काही लोक ऐहिक लाभासाठी सोडून जातात. काही लोक पृथ्वीवरील नातेसंबंधासाठी सोडून जातात. तर काही लोक प्रभूने त्यांना नेमून दिलेले काम पूर्ण करण्यासाठी त्रास सहन करतात. काही लोक येशूची सेवा करण्यासाठी आपला जीव धोक्यात घालू शकतात. राज्याचे कार्य पुढे नेण्यासाठी काही लोक मोठी जबाबदारी स्वीकारू शकतात. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावासाठी अनेक प्रकारचा त्याग किंवा बलिदान करण्यासाठी आम्ही प्रेरित होऊ शकतो किंवा आमचे मार्गदर्शन केले जाऊ शकते किंवा आम्हास पाचारण करण्यात येईल.

या सर्वांमध्ये आपण येशूवरील आपल्या प्रेमाने, त्याच्या नावावरील

आपल्या प्रेमाने आणि परमेश्वराने आपल्याला सेवा करण्यासाठी बोलाविलेल्या लोकांबद्दलच्या प्रेमाने प्रेरित होतो. *"कारण ख्रिस्ताची प्रीती आम्हाला आवरून धरते. आम्ही असे समजतो की, एक सर्वांसाठी मेला तर सर्व मेले; आणि तो सर्वांसाठी ह्याकरता मेला की, जे जगतात त्यांनी पुढे स्वतःकरता नव्हे, तर त्यांच्यासाठी जो मेला व पुन्हा उठला त्याच्याकरता जगावे"* (2 करिंथ 5:14,15). आपले हेतू शुद्ध असले पाहिजेत. आम्ही लोकांसमोर पवित्र दिसण्यासाठी किंवा खोट्या नम्रतेने किंवा लोकांसमोर ढोंग करण्यासाठी त्याग करीत नाही. परमेश्वर आपले हृदय पाहतो आणि तो आपल्याला आवडत असलेले जीवन पाहतो.

जेव्हा आपण त्याच्या नावासाठी त्याग करतो, तेव्हा प्रभूने सांगितले की या जन्मात आपल्याला शंभरपट (मार्क 10:29,30) प्राप्त होईल आणि आपणास पुढील जगात आशीर्वाद प्राप्त होईल. परमेश्वर हा मनुष्याचा ऋणी नाही आणि तो आपल्याला या जीवनात पैशाने जे काही विकत घेता येते त्याहून अधिक देईल.

आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावासाठी बलिदान करणे हा निव्वळ आनंद आणि एक मोठा विशेषाधिकार मानू या, कारण प्रत्येकाला आपल्या प्रभूने पाचारण केले आहे.

(**चिंतन** अध्याय 29 नंतर दिले गेले आहे.)

# 28
# आपण येशूचे नाव धारण करतो

**प्रेषितांची कृत्ये 9:15**
**परंतु प्रभूने त्याला म्हटले, "जा; कारण परराष्ट्रीय, राजे व इस्राएलाची संतती ह्यांच्यासमोर माझे नाव घेऊन जाण्याकरता तो माझे निवडलेले पात्र आहे..."**

**प्रेषितांची कृत्ये 15:14**
**परराष्ट्रीयांतून आपल्या नावाकरता काही लोक काढून घ्यावेत म्हणून देवाने त्यांची भेट कशी घेतली, हे शिमोनाने सांगितले आहे...**

विश्वासणारे म्हणून आम्हाला केवळ त्याचे नाव वापरण्याचा विशेषाधिकार आणि अधिकार नाही तर आम्हाला त्याचे नाव धारण करण्यासाठी देखील पाचारण करण्यात आले आहे. जुन्या कराराप्रमाणे, परमेश्वराने आपल्याला, नव्या करारातील मंडळीला *"त्याच्या नावाकरता काढलेले लोक"* म्हणून बोलावले आहे. आपल्यापैकी प्रत्येकाने त्याचे नाव धारण केले आहे, आणि याकोब म्हणतो त्याप्रमाणे *"जे उत्तम नाव तुम्हांला प्राप्त झाले आहे"* (याकोब 2:7). विश्वासणारे म्हणून आपण येशूच्या त्या अद्‌भुत, सुंदर, योग्य, सन्माननीय आणि गौरवी नावाने ओळखले जातो.

**2 थेस्सल 1:12**
**ह्यासाठी की, आपला देव व प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्या कृपेने आपला प्रभू येशू ह्याच्या नावाला तुमच्या ठायी व तुम्हांला त्याच्या ठायी गौरव मिळावा.**

आपली जीवनशैली, आपले वागणे, आपले बोलणे, आपले आचरण, आपले वर्तन असे असावे की आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावाचा गौरव होईल. लोकांनी आपल्या जीवनाचे निरीक्षण केले पाहिजे आणि येशूच्या नावाची स्तुती केली पाहिजे. विश्वासणारे म्हणून आपण

पापात जगू शकत नाही किंवा अशा गोष्टी करू शकत नाही ज्या परमेश्वराला अप्रिय वाटतील. पवित्र शास्त्रातील सूचना स्पष्ट आणि सरळ आहे *"जो कोणी प्रभूचे नाव घेतो त्याने अनीतीपासून दूर राहावे"* (2 तीमथ्य 2:19).

उदाहरणार्थ, आपल्या कामाच्या ठिकाणी आपण असे वर्तन केले पाहिजे जेणेकरून येशूच्या नावाचा आदर होईल. पौलाने लिहिले: *"जे दास म्हणून जोखडाखाली आहेत त्या सर्वांनी आपापले धनी सर्व प्रकारच्या सन्मानास योग्य आहेत असे मानावे; ह्यासाठी की देवाच्या नावाची व शिक्षणाची निंदा होऊ नये"* (1 तीमथ्य 6:1)।

आपण त्याचे नाव धारण करतो हे जाणून, आणि त्याच्यावर असलेल्या तीव्र प्रेमामुळे आपण त्याच्या योग्य आणि अतुलनीय नावाला गौरव, सन्मान आणि स्तुती प्राप्त होईल अशा पद्धतीने जगावे.

(**चिंतन** अध्याय 29 नंतर दिले गेले आहे.)

# 29
# येशूच्या नावात समजवा

**1 करिंथ 1:10**

**बंधुजनहो, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे; म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.**

**2 थेस्सल 3:6**

**बंधुजनहो, आम्ही आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने तुम्हांला आज्ञा करतो की, अव्यवस्थितपणे वागणाऱ्या व आमच्यापासून प्राप्त झालेल्या संप्रदायांप्रमाणे न चालणाऱ्या प्रत्येक बंधूपासून तुम्ही दूर व्हावे.**

नवीन करारातील मंडळीत आपण पाहतो की पौलाने, एक आध्यात्मिक नेता म्हणून, प्रभु येशूच्या नावाने, ज्यांच्यावर त्याची आध्यात्मिक जबाबदारी होती, त्या विश्वासणाऱ्यांना फटकारले, सुधारले आणि उपदेश दिला. अर्थात त्याने हे प्रेमापोटी केले. त्याने हे त्यांच्या भल्यासाठी आणि त्यांच्या उन्नतीसाठी केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याने ते येशू ख्रिस्ताच्या नावाने केले, त्याने हे मंडळीचे मस्तक येशू ख्रिस्त याच्या वतीने केले. म्हणून पौल विश्वासणाऱ्यांना स्वामीच्या हृदयाची कल्पना देत होता. याचा अर्थ असाही होता की पौलाच्या आध्यात्मिक नेतृत्वाखाली ज्यांना ही सुधारणा किंवा सूचना मिळाली त्यांनी ती आदराने ग्रहण केली पाहिजे आणि त्याला हलक्याने वागवता कामा नये. आपल्यापैकी जे आध्यात्मिक नेतृत्वात आहेत त्यांची ही पवित्र जबाबदारी आहे की येशूच्या नावात विश्वासणाऱ्यांना प्रेमाने ताकीद द्यावी.

[**टीप:** आपण येथे सावध असले पाहिजे आणि कोणत्याही आध्यात्मिक पुढाऱ्याला आध्यात्मिक अधिकार वापरण्याच्या बहाण्याने येशूच्या

नावाचा वापर करून, आपल्यावर नियंत्रण ठेवण्यास, हाताळण्यास किंवा गैरवर्तन करण्यास परवानगी देऊ नये. अशा गैरवर्तनामुळे अनेक जण दुखावले गेले आहेत (1 पेत्र 5:2-4).]

---

जेव्हा आपला छळ केला जातो
किंवा येशूच्या नावासाठी बलिदान देण्यासाठी
आम्हास पाचारण केले जाते
तेव्हा आम्ही त्याला सन्मान समजतो.
आम्ही त्याच्या नावाने ओळखले जातो
आणि म्हणून त्याचे नाव सन्मानाने धारण करावे.

---

## चिंतन

हे अध्याय 25 ते 29 साठी आहे.

1) विचार करा की जे प्रत्यक्षात प्रभू येशूचे नाव वापरतात परंतु ज्यांना दुरात्म्यांद्वारे सामर्थ्य लाभले आहे त्यांच्यासाठी सैतान नकली प्रत का निर्माण करेल? विश्वासणारे म्हणून आपण येशूच्या नावाचा असा बनावटी उपयोग कसा ओळखू शकतो आणि शोधू शकतो?

2) प्रभू येशूच्या नावासाठी आपणास छळ सहन करावा लागला आहे का? त्यातून आपला प्रवास कसा झाला? आपल्या जिवाला धोका असलेल्या छळाचा सामना करतानाही आपण विश्वासाला कधीही नकार देणार नाही आणि त्याचे नाव कधीही नाकारणार नाही असा आपला संकल्प आहे का?

3) आपणास प्रभूने त्याच्या नावासाठी, त्याच्या राज्याच्या कार्यासाठी बलिदान करण्यासाठी किंवा कुठल्या पद्धतीने त्याची सेवा करण्यासाठी पाचारण केले आहे का? त्यातून आपला प्रवास कसा झाला? आपण येशूच्या इतके प्रेमात आहात का की, त्याच्या नावासाठी तो आपणास जो कोणताही त्याग करण्यास पाचारण करील त्यासाठी तयार आहात?

4) आम्हाला त्याच्या नावाने ओळखले जाणारे लोक म्हणून पाचारण केले गेले आहे. आपल्या जीवनात अशी काही क्षेत्रे आहेत का जेथे आपणास माहीत आहे की प्रभू येशूचा आदर आणि गौरव केला जातो? आपल्या जीवनात अशी काही क्षेत्रे आहेत का ज्यात येशूच्या नावाचा आदर किंवा गौरव होत नाही? सकारात्मक गोष्टींसाठी परमेश्वराचे आभार मानण्यासाठी थोडा वेळ घ्या आणि नकारात्मक गोष्टींत बदल घडवून आणण्याची त्याला विनंती करा, जेणेकरून आपल्या जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये येशूच्या नावाचा गौरव होईल.

5) अध्याय 3 मध्ये वर्णन केलेल्या जुन्या करारातील दैनंदिन जीवनात परमेश्वराच्या नावाचे पुनरावलोकन करा आणि नवीन करारामध्ये (अध्याय 10 ते 29) आपण शोधलेल्या सर्व गोष्टींचा आढावा घ्या. परमेश्वराच्या नावाच्या वापरामध्ये आपण कोणत्या समांतरता पाहत आहा?

# 30
# येशूचे नाव युगानुयुग आहे

बायबलचे सर्वात शेवटचे पुस्तक, प्रकटीकरणाचे पुस्तक या विधानाद्वारे आरंभ होते की हे येशू ख्रिस्ताद्वारे देण्यात आलेले प्रकटीकरण आहे. या पुस्तकाचा शेवट आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात आशीर्वचनाने होतो. प्रकटीकरणाच्या पुस्तकाद्वारे आपण अनेक नावे आणि पदव्या पाहतो ज्याद्वारे आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचा उल्लेख करण्यात आला:

- *विश्वासू साक्ष, मेलेल्यांतून प्रथम उठलेला, अधिपती* (प्रकटीकरण 1:5),
- *अल्फा आणि ओमेगा, आरंभ आणि शेवट* (प्रकटीकरण 1:8),
- *पहिला आणि शेवटला* (प्रकटीकरण 1:11),
- *यहूदा वंशाचा सिंह, दाविदाचे मूळ* (प्रकटीकरण 5:5),
- *कोंकरा* (प्रकटीकरण 5:12),
- *देवाचा शब्द* (प्रकटीकरण 19:13),
- *राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू* (प्रकटीकरण 19:16),

इत्यादी.

हे पाहणे खरोखर अद्‌भुत वाटते की येशू असा उल्लेख करतो की त्याला एक नवीन नाव लाभले आहे:

**प्रकटीकरण 3:12**
**जो विजय मिळवतो त्याला मी माझ्या देवाच्या मंदिरातील स्तंभ करीन; तो तेथून कधीही बाहेर जाणार नाही; त्याच्यावर माझ्या देवाचे नाव, स्वर्गातून**

**माझ्या देवापासून उतरणारे नवे यरुशलेम, म्हणजे माझ्या देवाची 'नगरी, हिचे नाव,' आणि माझे 'नवे नाव' लिहीन.**

*"माझे नवे नाव"* काय आहे? हे एक गूढ आहे. हे येशूचे नाव आहे का, असे नाव जे त्याला देहधारणाच्या आधी नव्हते आणि जे त्याला त्याच्या जन्माच्या वेळी दिले गेले आणि त्याने जे काही साध्य केले त्याबद्दल त्याला बहाल केले गेले? त्याला बहाल करण्यात येणारी ही दुसरी पदवी पवित्र शास्त्र या वेळी प्रकट करीत नसलेली पदवी आहे का? आम्हाला माहीत नाही. आपण असे म्हणू शकतो की वचन 12 (ग्रीक *'कैनोस'*) मध्ये वापरलेला "नवा" हा शब्द वर्ण, स्वभाव, गुणवत्ता, ताजेपणा या बाबत "नवा" (ग्रीक *'निओस'*) पासून वेगळा आहे आणि नव्या समयाचा, अलीकडील समयाचा उल्लेख करतो.

"युगानुयुगच्या नगरात" नव्या यरूशलेमातील परमेश्वराच्या सर्व लोकांच्या कपाळावर त्याचे नाव आहे. हे एक चिन्ह आहे की आपण त्याचे, आपला प्रभु येशू ख्रिस्त याचे सदैव आहोत.

**प्रकटीकरण 22:1-5**

**1 नंतर त्याने देवाच्या व कोकर्याच्या राजासनातून 'निघालेली' नगरीच्या मार्गावरून वाहणारी 'जीवनाच्या पाण्याची' स्फटिकासारखी नितळ 'नदी' मला दाखवली.**

**2 नदीच्या 'दोन्ही बाजूंना' बारा जातींची फळे देणारे जीवनाचे झाड होते, ते 'दर महिन्यास आपली फळे' देते आणि त्या झाडाची 'पाने' राष्ट्रांच्या 'आरोग्यासाठी' उपयोगी पडतात.**

**3 'पुढे काहीही शापित असणार नाही;' तर तिच्यामध्ये देवाचे व कोकर्याचे राजासन असेल; आणि त्याचे दास त्याची सेवा करतील.**

**4 'ते त्याचे मुख पाहतील' व त्याचे नाव त्यांच्या कपाळांवर असेल.**

**5 पुढे रात्र असणार नाही आणि त्यांना दिव्याच्या अथवा 'सूर्याच्या प्रकाशाची' गरज नाही; कारण प्रभू देव त्यांच्यावर 'प्रकाश पाडील; आणि ते युगानुयुग राज्य करतील.'**

त्याचे नाव सदैव आम्हासोबत असण्याचा बहुमान आम्हास लाभेल!

त्याचे नाव सदैव
आपल्यासोबत घेऊन वावरण्याचा
विशेषाधिकार आम्हास लाभेल! ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले,
आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले;
ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली
प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा,
आणि देवपित्याच्या गौरवासाठी
प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे.
फिलिप्पैकरांस पत्र 2:9-11

आमेन!

## चिंतन

1) आपण हे पुस्तक वाचून पूर्ण केले आहे. शाब्बास! आपण या पुस्तकाचे वाचन करताना येशूच्या नावाविषयी जे काही जाणले आहे त्याचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि त्यावर मनन करण्यासाठी कृपया वेळ काढा. आपल्या आध्यात्मिक जीवनात आपण कोणते महत्त्वाचे शिक्षण आत्मसात केले आहे? परमेश्वरासोबत चालण्याचा कायमचा भाग म्हणून आपण कोणती सत्ये स्वीकारली आहेत?

2) आपण एखाद्या विषयाचे वारंवार पुनरावलोकन करीत असताना आपल्याला अनेक गोष्टी आढळून येतात, आपण सत्याचे नवीन पैलू उलगडतो, आपल्याला आणखी प्रकटीकरण प्राप्त होते आणि आपण आधीच जे शिकलो आहोत त्यामध्ये आपल्याला बळकटी

मिळते. **“येशूचे पराक्रमी नाव”** यावर या सत्याची वारंवार उजळणी करीत राहा. लवकरच हे पुस्तक पुन्हा वाचण्याची योजना तयार करा. आपल्या कॅलेंडरमध्ये त्याची नोंद करा.

3) सत्याचा अनुभव घेतल्यावर ते उत्तमप्रकारे शिकता येते. येशूच्या पराक्रमी नावाच्या सामर्थ्याखाली आपल्या अनुभवात वाढत राहा.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखववायास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# विषयी ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word–The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Interpreting Scripture
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses–Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work–Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक/भावनिक अडचणी** |
| **शैक्षणिक क्षेत्रात यशाची उणीव** | **तणाव/आघात** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **आध्यात्मिक समस्या** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church<br>
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058<br>
**IFSC क्रमांक:** HDFC0004367<br>
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,<br>
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवाः*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# निःशुल्क ऐप डाउनलोड करें:

**ऐप स्टोर या प्ले स्टोर में खोजें**
**“ऑल पीपुल्स चर्च (APCWO)”/**
**All Peoples Church Hindi**

Available on the App Store

ANDROID APP ON Google Play




*विश्वास को मजबूत करने और सुसमाचार साझा करने के लिए विभिन्न विषयों पर आधारित वचनों के टूलकिट।*
*उपदेशों, टीवी कार्यक्रमों, पुस्तकों, संगीत और बहुत कुछ से भरे संसाधन।*
*अगर आपको यह पसंद आए, तो*
***दूसरों को भी इसके बारे में बताएं!***

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

प्रत्येक विश्वासणाऱ्याला येशूच्या पराक्रमी नावाचा धावा करण्याचा, त्या नावाने बोलण्याचा आणि त्याचा उपयोग करण्याचा अद्‌भुत विशेषाधिकार मिळाला आहे. येशूचे शिष्य आणि सुरुवातीच्या मंडळीतील विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाच्या उपयोगाद्वारे त्यांच्याजवळ असलेला अधिकार समजला आणि ते त्यात चालले.

हे पुस्तक विश्वासणाऱ्यांना येशूच्या नावाचे सामर्थ्य पुन्हा शोधण्यात मदत करण्याचा प्रयत्न करते आणि दैनंदिन जीवनात त्या नावाच्या सामर्थ्यात कसे चालायचे ते शिकवते. जेव्हा आपण येशूच्या नावाच्या सामर्थ्याने चालावयास शिकतो तेव्हा आपण अधिकार आणि वर्चस्वात, परिपूर्ण शांततेत आणि देवाच्या सर्व तरतूदींमध्ये चालू शकतो.

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org